**( सभापतीस्थानी : माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्य सरकारच्या वाशी (नवी मुंबई) येथील आयटी पार्कच्या जागेचा वापर इतर उपक्रमासाठी होत असल्याबाबत**

**(१) * ३७८५६ श्रीमती मंदा म्हात्रे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारने जुलै, २००३ मध्ये आयटी उद्योगाबद्दल धोरण जाहिर केल्यानंतर त्याला अनुसरुन वाशी ( नवी मुंबई ) येथील आयटी पार्कच्या जागेचा भलत्याच उपक्रमांसाठी वापर केला जात आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सविस्तर चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वाशी येथील सिडकोने विकसीत केलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्योगातील बीएसईएल इन्फ्रास्ट्रक्चर रिॲलीटीजच्या विकासकाने अनुज्ञेय वापराव्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ आयटी पार्कमधील जागेचा वापर केल्याचे निर्दशनास आले आहे.
(२) व (३) विकासकाने आयटीव्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ वापर केल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई सुरु केली होती. सदर कारवाई विरोधात गाळेधारकांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील न्यायालयाच्या निदेशानुसार महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे :सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, विकासकाने अन्य प्रयोजनार्थ वापर केल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई सुरु केली आहे. ही कारवाई कधी पूर्ण होणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सध्या हे प्रकरण कोर्टात आहे. त्यामुळे कोर्टाने जे आदेश दिलेले होते त्यांचे पालन महानगरपालिकेने केलेले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यासंदर्भात लवकरात लवकर पाठपुरावा करुन ते प्रकरण निकाली काढण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येणार आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, ही पद्धत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सध्या सुरु आहे.पिंपरी - चिंचवड, व पुणे महानगरपालिकेमध्ये अशाच प्रकारची घटना घडलेली आहे. ज्या कारणासाठी जागा दिली जाते त्या ऐवजी ती जागा इतर कारणांसाठी वापरली जाते. जागा देताना





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.. ता.प्र.क्र. 37856..

सरकार खास बाब म्हणून काही सवलती देत असते. सध्या पिंपरी चिंचवड येथील जागेवर डायमंडसची दुकाने सुरु आहेत. तेथे दागिने विकली जातात. "मॅटर इज सब्जूडाईज्ड" असे म्हटले की विषय संपला. या संदर्भात कडक धोरण अवलंबिण्याकरिता कायद्यामध्ये बदल करण्यात येणार आहे काय ? इतर उपक्रमासाठी जागेचा वापर होत असल्यास ती जागा पुन्हा शासनाला दिली जाईल अशा प्रकारचे कलम करुन कायद्यामध्ये बदल केला जाणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी धोरणात्मक बदल करण्यात आला आहे. आयटी पार्कला 80 टक्के जागा देण्याबाबत परवानगी देण्यात आली होती. सन 2007 मध्ये उद्योग विभागाने धोरण ठरविले होते, त्यानुसार 50 टक्के जागेपैकी 30 टक्के जागा फायनान्शियल बाबींना देण्यात येणार असून उर्वरित 50 टक्के जागा आयटी पार्कसाठी द्यावी, असे ठरविण्यात आले आहे. या संदर्भात कायद्याचे उल्लंघन झाले असल्यास काय कार्यवाही करावी याबाबत विचार करण्यात आलेला आहे. तसेच 100 टक्के एफएसआय आहे, रेडी रेकनर प्रमाणे ॲडिशनल प्रिमियम घेण्यात यावा, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. बरवड..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37856 ..... श्री. राजेश टोपे ....

सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पूर्ण बांधकाम ताब्यात घ्यावे. यासंदर्भात धोरणामध्ये जर काही त्रुटी आहेत असे सन्माननीय सदस्यांना आणि सभागृहाला वाटत असेल तर ती बाब तपासून उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, त्या ठिकाणी आय.टी. पार्कसाठी त्या जागेचा वापर न होता अन्य प्रयोजनार्थ आय.टी. पार्कच्या जागेचा वापर केला त्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, विकासकाने आय.टी. व्यतिरिक्त अन्य प्रयोजनार्थ वापर केल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई सुरु केली होती. ही कायदेशीर कारवाई काय सुरु केली होती ? उत्तरामध्ये पुढे असे म्हटले आहे की, न्यायालयाच्या निदेशानुसार महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे. न्यायालयाचे निदेश काय आहेत ? न्यायालयाच्या निदेशानुसार आता काय कार्यवाही सुरु केली आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आय.टी. धोरणामध्ये असे होते की, बांधकामासाठी जो इंसेन्टिव्ह एफएसआय दिलेला आहे त्यामध्ये 80 टक्के आय.टी. आणि 30 टक्के कमर्शियल असावे. त्याचे उल्लंघन त्या ठिकाणी बीएसईएलने केले. त्यामुळे महानगरपालिकेकडून ताबडतोबीने ते सील करण्यात आले. महानगरपालिकेने पहिली ॲक्शन कोणती घेतली असेल तर ती म्हणजे सगळी दुकाने सील केली. त्यानंतर लोक कोर्टात गेले. कोर्टाने सांगितले की, नॅचरल जस्टीसप्रमाणे त्यांना हिअरींग दिले पाहिजे. तसेच न्यायालयाने सील उघडण्यास सांगितले. कोर्टाच्या आदेशाप्रमाण सगळे सील उघडले. त्या ठिकाणी बरीच दुकाने होती. त्यानंतर दोन महिन्यात प्रत्येकाचे हिअरींग झाले. त्यानंतर कोर्टाने सांगितले की, एमआरटीपीच्या ज्या तरतुदी आहेत त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. त्यादृष्टीकोनातून संगळ्यांना नोटिसेस देण्यात आलेल्या आहेत. यामध्ये महानगरपालिकेने जी कारवाई करावयीच होती ती 100 टक्के केलेली आहे. दुसरी बाब अशी की, उद्योग विभागाने इंडस्ट्रियल पॉलिसी बदलली. त्यामध्ये पूर्वी कमीतकमी 80 टक्के आय.टी. होते ते 50 टक्के केले आहे. कमीतकमी 50 टक्के आय.टी. आणि 30 टक्के फायनान्शियल सर्व्हिसेससाठी अलाऊ केले आहे. त्यामध्ये ज्या काही गोष्टी आहेत त्या तपासण्यात

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ता. प्र. क्र. 37856 ...... श्री. राजेश टोपे .....

येत आहेत. या इंडस्ट्रियल पॉलिसीच्या अनुषंगाने साधारणपणे त्यांनी 8 टक्के इतर वापर केलेला आहे. म्हणजे 100 टक्के एफ.एस.आय. होता तेवढाच वापरलेला आहे परंतु त्यातील 8 टक्के वापर जो अलाऊ नव्हता त्यासाठी केला आहे. इंडस्ट्रियल पॉलिसीमध्ये अशी तरतूद आहे की, 100 टक्के ॲडिशनल प्रिमियम घेऊन रेग्युलराईज करावे. त्यामुळे या पॉलिसीमध्ये काही त्रुटी असतील तर त्या दूर करण्यात येतील. या पॉलिसीच्या अनुषंगाने, ते नियमित करण्याच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेने जो निर्णय घ्यावयाचा आहे तो निर्णय जास्तीतजास्त एक महिन्याच्या आत घेतला जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, शासनाच्या धोरणात कशी पळवाट ठेवण्यात येते हे माननीय मंत्रिमहोदय सांगत आहे. आपण त्यांना विचारले की, आपण काय कारवाई केली ? कोर्टाने नंतर स्टे दिला. तो स्टे व्हॅकेट झाला. कोर्टाने सील काढण्यास सांगितले. शासनाच्या तत्कालीन तरतुदीनुसार कोर्टाचा निर्णय चुकीचा होता असे आपल्या निदर्शनास आल्यानंतर उच्च न्यायालयामध्ये जाऊन ती स्थगिती तशीच ठेवण्याचा प्रयत्न महानगरपालिकेने केला काय ? महानगरपालिका उच्च न्यायालयामध्ये का गेली नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, महानगरपालिकेने कोर्टात का जावे ? बीएसईएलने पॉलिसीचे उल्लंघन केल्यानंतर महापालिकेने कोणाचीही भीड न बाळगता किंवा कोणाच्याही दबावाखाली न येता ते सील केले. इंडस्ट्रियल पॉलिसीच्या नियमानुसार उल्लंघन झाले होते त्याप्रमाणे त्यांनी ते सील केले. महानगरपालिकेने तो धाडसी निर्णय घेतला. परंतु हायकोर्टाने सांगितले की, त्यांना नॅचरल जस्टीसप्रमाणे हिअरींग द्यावे आणि सील काढावे. त्यानंतर सील काढण्यात आले आणि नॅचरल जस्टीसप्रमाणे हिअरींग दिले. कोर्टाने पुढील कार्यवाही चालू ठेवावी असे सांगितले. इंडस्ट्रियल पॉलिसीमध्ये बदल झाला.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37856....... श्री.राजेश टोपे......

सभापती महोदय, औद्योगिक धोरणामध्ये पूर्वलक्षीप्रभावाने फायदा द्यावा लागतो, भविष्य काळासाठी फायदा दिला जात नाही. त्यामुळे 80 टक्के आय.टी. आहे, जे यूजमधील आय.टी. पार्क असतील त्यांना सुध्दा 50 टक्क्याची तरतूद लागू करावी असे ठरले. बीएसइएल इन्फ्रास्ट्रक्चरने या नवीन बदलेल्या धोरणाचा उपयोग करुन या जागेचा वापर नियमित करावा असा प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेकडे दाखल केला. त्याबाबतचा निर्णय 1 महिन्याच्या आत घेण्यात येईल आणि प्रस्तावात त्रुटी वाटत असेल तर निश्चितप्रमाणे उद्योग विभागाला सभागृहाचे म्हणणे कळविण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी हायकोर्टाचे निदेश काय आहेत असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला जोडून माझा प्रश्न असा आहे की, ओ.सी.देत असताना त्यांनी गाळे बांधले आहेत हे महानगरपालिकेच्या लक्षात आले नाही काय ? आय.टी.पार्क होण्यासाठी या विकासकाला जो एफ.एस.आय.दिला होता त्यापेक्षा त्यांनी जास्त बांधकाम करुन त्याचा वापर कमर्शिअल कारणासाठी केला आहे हे ओ.सी.देताना लक्षात आले नाही काय ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय ज्येष्ठ सदस्य यांना मी सांगू इच्छितो की, बिल्डिंग प्लॅननुसार पूर्ण झाली आहे किंवा नाही हे ओ.सी.देत असताना पाहिले जाते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सी.सी.दिल्यानंतर ओ.सी.देण्यात आली. त्यावेळी असे लक्षात आले की, त्या जागेचा वापर चुकीच्या पध्दतीने चालू आहे. त्यामुळे तातडीने गाळे सील करण्याचे काम नवी मुंबई महानगरपालिकेने केलेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने योग्य वेळी कार्यवाही केलेली आहे. त्यामध्ये चुकीचे काही नाही. शासनाच्या धोरणाप्रमाणे उचित निर्णय घ्यावा अशा सूचना महिन्याभरामध्ये महानगरपालिकेच्या आयुक्तांना दिल्या जातील.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सिहोरा परिसरातील (जि.भंडारा) शेतकऱ्यांच्या अल्पशा थकीत वीज बिलासाठी वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्याबाबत**

**(२) * ३९३६१ श्री.केशवराव मानकर , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील सिहोरा परिसरात शेतकऱ्यांच्या अल्पशा थकीत वीज बिलासाठी वीज पुरवठा खंडीत करण्यात आला असल्याचे माहे जानेवारी, २००८ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या परिसरातील शेतकऱ्यांनी सिंचनाची सोय व्हावी याकरिता शासकीय योजनांच्या माध्यमातून विहिरींचे बांधकाम केले असून, त्यासाठी वीज वितरण कंपनीला अनेक वर्षापासून डिमांड राशी आणि दर्जा देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीबाबत भारतीय किसान संघाने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या पाहता त्यांच्या मागण्या मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (१) हे खरे नाही, मात्र थकबाकीदार कृषीग्राहकांकडील थकबाकी वसूलीसाठी सदर परिसरातील विद्युत पुरवठा दि. २३ डिसेंबर, २००७ रोजी सांकेतिक स्वरुपात दोन तासासाठी बंद करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही. सिहोरा परिसर ता. तुमसर येथील कृषीपंप अर्जदारांपैकी ज्या अर्जदारांनी वर्ष २००६-०७ मध्ये विहित शुल्क भरुन चाचणी अहवाल सादर केले होते अशा सर्व ५९ अर्जदारांना विद्युत पुरवठा करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या परिसरातील एकूण ८२ अर्जदारांनी वर्ष २००७-०८ मध्ये विहित शुल्क भरुन चाचणी अहवाल सादर केला आहे. या पैकी अद्यापपर्यंत ४१ अर्जदारांना विद्युत पुरवठा करण्यात आला आहे. उर्वरित अर्जदारांना विद्युत पुरवठा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३),(४) व (५) अशा प्रकारचे निवेदन वितरण कंपनीचे क्षेत्रीय कार्यालयास प्राप्त झालेले नाही. सबब याविषयी कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, भारतीय किसान संघाने विद्युत पुरवठा बंद केल्याच्या कारणामुळे आंदोलन केले होते. उत्तरात असे म्हटले आहे की, "दिनांक २३.१२.२००७ रोजी सांकेतिक स्वरुपात दोन तासासाठी विद्युत पुरवठा बंद करण्यात आला होत." सांकेतिक स्वरुपात दोन तासासाठी विद्युत पुरवठा बंद करण्याचा वीज मंडळाचा उद्देश काय होता ? शेतकऱ्यांना त्रास देण्याचा उद्देश होत का ? तसेच ८२ अर्जदारांनी विजेच्या पुरवठयाची मागणी केलेली असताना केवळ ४१ अर्जदारांना विद्युत पुरवठा केला आहे. उर्वरित लोकांना अजूनही

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र.३९३६१..... श्री.केशवराव मानकर...

विद्युत पुरवठा का झाला नाही ? त्यांना किती कालावधीत विद्युत पुरवठा केला जाईल ? शेतक-यांवर अशाप्रकारे अन्याय करण्याचे धोरण शासन थांबविणार की नाही ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सिहोरा परिसरात दोन तास वीज पुरवठा बंद करण्यात आला होता हे खरे आहे. त्यापूर्वी त्या परिसरात दवंडी देण्यात आली होती. त्या भागात थकित असलेल्या बिलाची रक्कम नागरिकांनी भरावी यासाठी तशाप्रकारची कृती करण्यात आली होती. ग्राहकांना त्रास देण्याचा वीज वितरण कंपनीचा उद्देश नाही. त्या कृतीनंतर ९८ पैकी ८० कृषि पंप धारकांनी त्यांची थकित असलेली रक्कम भरली आहे आणि पैशाची वसुली झाली आहे. सन २००६-०७ मध्ये ज्यांनी चाचणी अहवाल दिला आहे त्या सर्वांना विजेचे कनेक्शन दिले आहे. सन २००७-०८ मध्ये ज्यांनी चाचणी अहवाल दिला आहे त्यापैकी ४१ जणांना कनेक्शन दिलेले आहे, उर्वरित लोकांना लवकरच विजेचे कनेक्शन देण्याची भूमिका घेतली आहे. विदर्भातील लोकांच्या अडचणी लक्षात घेऊन कोणत्याही टारगेटचा विचार न करता जेवढे शक्य आहे त्या सगळयांना प्राधान्याने विजेचे कनेक्शन देण्याची सूचना करण्यात आलेली आहे आणि त्यासाठी आवश्यक असणारे मटेरियल उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

------

तारांकित प्रश्न क्रमांक ३७५४६

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.खंदारे 11:15

**मिरारोड (मुंबई) येथील ५ मुलांना पल्स पोलिओचा डोस दिल्यानंतर त्यांची प्रकृती अस्वस्थ झाल्याबाबत**

**(४) * ३७३०५ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुधाकर गणगणे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. शरद रणपिसे , श्री.राजन तेली , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.सय्यद जामा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत मिरा रोड येथे ५ मुलांना पल्स पोलिओचे डोस दिल्यानंतर प्रकृती अस्वस्थ झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची घटना दिनांक ९ जानेवारी, २००८ वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) तसेच बालकांवर करण्यात आलेल्या औषधोपचाराचा खर्च देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(६) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विमल मुंदडा** : (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्राथमिक चौकशीत कोणीही कर्मचारी दोषी असल्याचे दिसून आले नाही. रासायनिक व न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेस पाठविलेल्या नमुन्यांचे अहवाल प्राप्त झालेले असून प्राप्त अहवालात विष पदार्थ नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) ५ बालकांपैकी ४ बालके भक्तीवेदांत रुग्णालय येथे दाखल होती त्यांचेवर विनामूल्य उपचार करण्यात आले आहेत. उर्वरित १ बालिकेस रोहित नर्सिंग होम दहिसर येथे दाखल करण्यात आले होते. तिच्या औषधोपचाराचा खर्च पालकांनी केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आपल्या परवानगीने एका महत्वाच्या प्रश्नाकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. मागील काही महिन्यामध्ये राज्यामध्ये ठिकठिकाणी पोलिओचे रुग्ण आढळून आलेले आहेत. मुंबई, ठाणे, कोल्हापूर अशा ठिकाणी हे रुग्ण आढळून आलेले आहेत. शासनाच्या पोलिओ अभियानासंदर्भात कोणालाच शंका नाही. प्रामाणिकपणे हे काम चालले आहे. आपण २१व्या शतकामध्ये आहोत. असे असताना पोलिओचे रुग्ण आपल्या राज्यामध्ये आढळून येत आहेत. तेव्हा याबाबतीत गंभीरपणे विचार करुन शासनाने काही पावले उचलली आहेत काय ? मिरा-भाईंदर या ठिकाणच्या मुलांची प्रकृती बिघडण्याचे कारण काय ? प्रयोगशाळेचा अहवाल कोणी तयार केला? त्या अहवालामध्ये कोणते घटक आढळून आले ?

==2==



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : पोलिओचा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चांगल्या प्रकारे राबविला जात आहे. 5 वर्षाखालील सर्व बालकांना पोलिओ डोस दिले जातात. आपण आता 21व्या शतकामध्ये आहोत असे माननीय सदस्यांनी सांगितले. हा नॅशनल प्रोग्रॅम आहे. त्याअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्र पोलिओमुक्त व्हावा यासाठी सातत्याने आम्ही प्रयत्न करीत आहोत. रल्वे स्टेशन्स, बस स्टेशन्स अशा लोकांच्या स्थलांतरीत जागांवरही हे पोलिओ डोस देण्याची व्यवस्था केली जाते. परराज्यातून येणा-या बालकांनाही हे डोस देण्याची तेथे व्यवस्था असते.या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे त्याबाबतीत असे उघडकीस आलेले आहे की पोलिओ डोस दिल्यानंतर त्या मुलांनी दोन चॉकलेट शिकवणीच्या काळात खाल्ली होती. तसेच पाणी आणि युरिन नमुन्यांची तपासणी सांताक्रूझ येथील फॉरेन्सिक प्रयोगशाळेमध्ये करण्यात आली असून तपासणी अहवालामध्ये असे काहीही आढळून आलेले नाही.

डॉ. दीपक सावंत : चॉकलेट खाल्ल्यामुळे ही प्रक्रिया झाल्याचे आढळून आले असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. तपासणी अहवाल प्राप्त झालेला आहे असेही त्यांनी सांगितले. प्रश्न असा आहे की, पोलिओचे आणखी काही रुग्ण मुंबईतील धारावी येथे आढळून आलेले आहेत. तेव्हा अशा प्रकारे वारंवार पोलिओ रुग्ण सापडण्याची नेमकी कारणे काय आहेत ? ही मोहीम तडफेने राज्यात राबविली जात आहे त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. ज्यावेळी हे पल्स पोलिओ डोस कॅरी केले जातात त्यावेळी त्यांचे तापमान व्यवस्थित राखले जात नाही. तेव्हा त्याबाबतीत प्रिकॉशनरी मेझर्स घेण्यात येतील काय ?

डॉ. विमल मुंदडा : गोवंडीमध्ये एक सस्पेक्टेड केस होती. त्यासंबंधीचे उत्तर मी मागे दिलेले आहे. त्या बालकाचे कुटुंबीय बिहार मधून आलेले होते. इतर राज्यातून आलेल्या कुटुंबियांच्या 5 वर्षाखालील मुलांना देखील हे डोस दिले जातात. महाराष्ट्रातील 5 वर्षाखालील कोणतेही बालक या डोसविना राहाणार नाही असा प्रयत्न आरोग्य विभागाकडून केला जातो. यापुढे अशा प्रकारच्या केसेस आढळून येणार नाहीत यादृष्टीने शासन प्रयत्नशील आहे. डोसचे तापमान व्यवस्थितपणे मेण्टेन केले जाते.

..2..



MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.खंदारे 11:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 37305....

डॉ. एन.पी.हिराणी : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या प्रश्नाशी संबंधित असलेला पूरक प्रश्न मी विचारतो. हा इतका धडक कार्यक्रम राबवून सुध्दा महाराष्ट्रामध्ये पोलिओचे पूर्ण निर्मूलन आपल्याला करता आलेले नाही. अजूनही काही केसेस आढळून येत आहेत. तेव्हा याबाबतीत पुन्हा एक्सपर्टचा सल्ला घेऊन पोलिओच्या टोटल इरॅडिकेशनकरिता शासन काही प्लॅन तयार करणार आहे काय ?

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.शिगम 11:20

ता.प्र.क्र.37305...

डॉ.एन.पी.हिराणी....

यासंदर्भात माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अनेक रुग्णालयांमध्ये लहान मुलांना पल्स पोलिओचा डोस दिल्यानंतर मुले अस्वस्थ होतात. सदरहू लहान मुलांमध्ये अस्वस्थता पल्स पोलिओचा डोस घेतल्यामुळे होते की कर्मचा-यांच्या हलगर्जीपणामुळे होते यासंबंधीची कसून तपासणी करण्यात येईल काय ? पल्स पोलिओचा डोस घेतल्यानंतर लहान मुलांना अस्वस्थता जाणवते हा त्रास निश्‍चित कशामुळे होतो या गोष्टीची देखील तपासणी करण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : महाराष्ट्रात पोलिओचे समूळ उच्चाटन व्हावे म्हणून राज्य शासनाकडून नेहमी मोहिम राबविली जाते. 2005 पर्यंत महाराष्ट्र पोलिओ मुक्त झाला पाहिजे होता, परंतु तसे झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, महाराष्ट्रात फ्लोटिंग पॉप्युलेशन आहे. या ठिकाणी अनेक राज्यातील माणसे नोकरी, व्यवसाय, मजुरीची कामे करण्यासाठी येतात. याही कुटुंबातील बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यासाठी आरोग्य विभागाकडून रेल्वे स्टेशन, बस स्थानके, एअर पोर्ट येथे केंद्र सुरु करीत असतो. त्या केंद्रावर येणा-या अथवा जाणा-या कुटुंबियातील बालकांना पोलिओचा डोस तात्काळ देण्यात येतो. साधारणत: पल्प पोलिओची मोहिम आरोग्य विभागाकडून वर्षातून पाच वेळा राबविली जाते. पर राज्यातून जे कुटुंब या शहरात मजुरी अथवा नोकरी, व्यवसाय करण्यासाठी येतात,त्याच्या कुटुंबियातील एखादा पोलिओचा रुग्ण आढळून येतो. यासंबंधीचा डिटेल सर्व्हे सुध्दा करण्यात आला आहे, त्या सर्व्हेमध्ये उत्तर प्रदेश, बिहार येथून जी कुटुंबे आपला उदरनिर्वाह करण्यासाठी मुंबईत आली आहेत, त्या कुटुंबियातील मुलांमध्ये पोलिओचे रुग्ण आढळून आले आहेत. आपला देश आणि आपले राज्य पूर्णपणे पोलिओमुक्त करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून फार मोठया प्रमाणात प्रयत्न करण्यात येत आहेत. या शहरात बाहेरुन येणा-या कुटुंबियांची संख्या मोठी असल्यामुळे पोलिओचा एखादा रुग्ण आढळून येतो.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, या देशात आणि या राज्यात पल्स पोलिओची मोहिम अतिशय चांगल्या प्रकारे राबविली जात आहे याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. ही मोहिम राबविण्यात एन.जो.ओ.चा मोठा सहभाग आहे. पल्स पोलिओची मोहिम राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. माझ्या माहिती प्रमाणे पल्स

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.शिगम 11:20

ता.प्र.क्र.37305...

डॉ. वसंत पवार.....

पोलिओची लस ही रशिया या देशातून मागविली जाते आहे. आपल्याकडे हाफकीन इन्स्टीटयूट आहे, त्या इन्स्टीटयूटच्या माध्यमातून पल्स पोलिओच्या लसीचे उत्पादन करण्यासंबंधी शासनाने काही कार्यक्रम आखलेला आहे काय ? पल्स पोलिओसाठी सध्या आपण ओरल व्हॅक्सीन वापरतो, अजून आपण इंजेक्शनाचा वापर करीत नाही. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन यांच्याकडून पूर्वी लहान बालकांना पल्स पोलिओचे 3 डोस दिले जात होते. परंतु आता 5 ते 7 डोस देण्याचे त्यांनी सांगितले आहे. सध्या महाराष्ट्रातील बालकांना पल्स पोलिओचे प्रत्यक्षात किती डोस देण्यात येत आहेत ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पल्स पोलिओची लस राज्य शासनास केंद्र सरकारकडून पुरविली जाते. त्यामुळे सदर लस उत्पादन करण्याचा प्रश्न येत नाही. परंतु मी या सदनाला सांगू इच्छितो की, आपल्याकडे हाफकीन इन्स्टीटयूट आहे, त्या इन्स्टीटयूटने देखील पल्स पोलिओ लसीचे उत्पादन केले आहे. त्या इन्स्टीटयूटमधून काही प्रमाणात उत्पादन होते. लहान बालकांना पल्स पोलिओचे पाच डोस देण्यात येतात. पल्स पोलिओच्या मोहिमेची आखणी वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन आणि केंद्रीय आरोग्य खात्याच्या मार्फत केली जाते आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे या राज्यात आम्ही पल्स पोलिओची मोहिम राबवित असतो. त्यांनी जर आम्हाला लहान मुलांना दहा डोस द्यावयास सांगितले की, आम्ही त्यांच्या सांगण्याप्रमाणे दहा डोस देऊ. पल्स पोलिओच्या कार्यक्रमाचे आयोजन त्यांच्याकडून आम्हाला कळविण्यात येते, त्याप्रमाणे आम्ही या राज्यात कार्यक्रम राबवित असतो. पल्स पोलिओ कार्यक्रम राबविण्यास आम्ही प्राधान्य देतो. महाराष्ट्र राज्य पोलिओमुक्त होत नाही तोपर्यंत आरोग्य विभागाचे प्रयत्न चालू राहणार आहेत.

यानंतर श्री. कानडे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ प्रथम श्री.गिते

11:25

ता.प्र.क्र.37305 पुढे सुरु.....

श्री. सय्यद जामा :सभापति महोदय, यह व्हॅक्सीन केन्द्रीय सरकार द्वारा सप्लाय की गई थी या राज्य सरकार द्वारा सप्लाय की गई थी, व्हॅक्सीन की जांच समय समय पर करने के लिए क्या कोई व्यवस्था है और क्या सरकार इन पांच बच्चों के इलाज का खर्च करेगी ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, औषधांचा 100 टक्के पुरवठा हा केंद्र शासनाकडून होतो. कासोडी,हिमाचल प्रदेश येथे लॅबोरेटरी आहे. जेव्हा पेशंटच्या संदर्भात अशा प्रकारची तक्रार येते त्यावेळी सॅम्पल तिकडे पाठवितो. यावेळी सुध्दा सॅम्पल पाठविले होते. त्यांचा स्टॅंडर्ड क्वॉलिटी रिपोर्ट आला . सरकारी रुग्णालयात उपचार घेतले तर पैशाचा प्रश्न येत नाही. परंतु एका विद्यार्थ्यानी दहिसर येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेतले होते. त्या उपचाराचे बिल 5920 रुपये एवढे झाले होते. या खर्चाची प्रतिपूर्ती मीरा-भाईंदर महानगरपालिकेने केली आहे.

श्री. मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, केंद्रीय आरोग्य मंत्री श्री. अंबुमणी रामदोस यांनी एक विधान केले होते की पोलिओ निर्मुलनासाठी जो डोस दिला जातो त्या व्हॅक्सीनमध्ये डेफीशीअन्सी असल्यामुळे डोस दिल्यानंतर सुध्दा पोलिओचा आजार झालेला आहे हे खरे आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे सत्य आहे. परंतु हे प्रमाणत अतिशय कमी म्हणजे मायक्रो मायक्रो परसेंटेजमध्ये आहे. पेशंटला वर्षाला 8/10 डोस दिल्यानंतरसुध्दा रोग होऊ शकतो. परंतु हे प्रमाण फारच अल्प म्हणजे मायक्रोमध्ये आहे.

-----

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे शहरात डेंग्यूची लागण झाल्याबाबत**

**(५) * ३७६७० श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री.राजन तेली , श्री. सुरेशदादा देशमुख** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात दिनांक २८ सप्टेंबर, २००७ रोजी डेंग्यूची लागण झालेले ६७ रुग्ण आढळून आल्याने पुणे शहरात भितीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे आढळून आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डेंग्यू या साथीला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता**: (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, प्रश्नाच्या चारही उत्तरामध्ये प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर दिलेले आहे.मूळ प्रश्न पुणे शहराच्या बाबतीत असला तरी हिंगोली जिल्हयामध्ये अडगांव येथे डेंग्युचा एक रुग्ण आढळून आला आहे. पुणे शहरातील डेंग्यू रुग्णांची तपासणी केव्हा करण्यात आली ? संपूर्ण पुणे शहरातील कोणकोणत्या विभागात डेंग्युच्या रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि त्या तपासणी त्यामध्ये काय आढळून आले ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, डेंग्यु हा व्हायरल फीव्हर आहे. या रोगामध्ये फक्त लक्षणे आढळून येतात. वेगवेगळया हॉस्पीटलमध्ये जे पेशंट येतात त्यांच्यामध्ये शरीरावर चट्टे उठणे, अंगदुखी आणि उलटया अशा प्रकारची लक्षणे आढळून येतात. शासनाच्या आरोग्य खात्याचे कर्मचारी जाऊन टेस्ट घेतात. एकूण १४ संशयित रुग्ण आढळून आले. पुण्यामध्ये टेस्टींगसाठी सॅम्पल पाठविले असता निगेटीव्ह रिपोर्ट आला. व्हायरल फीवर असल्यामुळे पेशंटला देखरेखीखाली ठेवण्यात येते आणि ८/१०दिवसात घरी पाठविले जाते. परंतु डेंग्युचा रुग्ण आढळून आला नाही.

------

नंतर श्री. भोगले

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिवंडी येथील मोती कारखान्यातून होत असलेली वीज चोरी पकडल्याबाबत**

**(६) * ३८६३७ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. सुधाकर गणगणे** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील मोती कारखान्यातून ८ लाख रुपयांची वीज चोरी पकडण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज चोरी प्रकरणी सदरहू कारखाना मालकावर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच दिवसेंदिवस वाढत असलेली वीज चोरी रोखण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) भिवंडी (जि.ठाणे) येथील मोती कारखान्यात दिनांक ८.१२.२००७ रोजी एकूण रु.८,२९,४०५/- (रुपये आठ लाख एकोणतीस हजार चारशे पाच फक्त) ची वीज चोरी पकडण्यात आली आहे.

(२) सदरहू मोती कारखान्याच्या मालकास महावितरण कंपनीचे विशेष पोलीस स्टेशन, कल्याण यांनी अटक करुन दिनांक २४.१.२००८ रोजी न्यायालयात हजर केले. मा.न्यायालयाने सदर व्यक्तीस पोलीस कस्टडीत आणि न्यायालयीन कस्टडीत ठेवून नंतर जामीन मंजूर केला आहे.

राज्यातील वीज चोरीची प्रकरणे त्वरित निकाली काढण्याकरिता विशेष पोलीस स्टेशन व अतिरिक्त भरारी पथके नेमली आहेत. त्याचप्रमाणे वीज चोरीचे खटले चालविण्यासाठी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिशांना विशेष न्यायालय म्हणून पद निर्देशित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, विजेची रक्कम रु.८.२० लाख मोती कारखान्याच्या मालकाकडून वसूल करण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली? रक्कम वसूल करण्याची कारवाई केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, ८.१२.२००७ रोजी ही वीज चोरी लक्षात आल्यानंतर संबंधित कारखान्याचे मालक श्री.बाळासाहेब निंबाळकर यांच्याविरुध्द एफआयआर दाखल करण्यात येऊन गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या संदर्भात त्यांना कोर्टामध्ये हजर करण्यात आले होते व दोन दिवसाची न्यायालयीन कस्टडी देऊन ठाणे कारागृहात ठेवण्यात आले होते. नंतर आरोपीची जामिनावर मुक्तता झाली. याबाबत न्यायालयाचा निर्णय येईल त्याप्रमाणे वसुली करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, भारनियमनाच्या संदर्भात ही एक महत्वाची अडचण आहे. वीज चोरीचे प्रकार वाढत आहेत. त्याचा निश्चित परिणाम होत आहे. वीज चोरीच्या

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........ ता.प्र.क्र.३८६३७....

प्रकरणामध्ये ज्या व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला त्यांनी जवळजवळ ८.५ लाख रुपयांची वीज चोरी केली. वीज चोरी करण्याची त्यांची पध्दत काय होती? संबंधित कारखान्यामध्ये मिटरची नोंद घेण्यासाठी वीज पुरवठा कंपनीचे प्रतिनिधी जात होते त्यांच्या ही बाब लक्षात आली नव्हती का?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, भिवंडीच्या वीज वितरणाची व्यवस्था टॉरेंट कंपनीकडे दिलेली आहे. टॉरेंट कंपनीकडे भिवंडीचा कारभार दिल्यापासून त्यांनी तेथे अतिशय मोठया प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या आहेत. जवळपास २७ हजार नवीन कनेक्शन्स देण्यात आली आहेत. १.२४ लाख ग्राहकांचे मीटर बदलून दिले आहेत. डिस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉर्मर फेल्युअरचे प्रमाण ४० टक्क्यावरुन २१ टक्क्यापर्यंत खाली आणले आहे. विजेच्या गळतीचे प्रमाण ४४ टक्क्यावरुन २४ टक्क्यावर आणले आहे. तेथील महसूल सुध्दा महावितरण कंपनी काम करीत होती त्यावेळेपेक्षा दरमहा ४.२७ कोटी रुपयांनी वाढला आहे. ऑन डिमांड कनेक्शन देण्याच्या संदर्भात पुरेसे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करीत नाही तोपर्यंत अनधिकृत कनेक्शन चोरीच्या उद्देशाने घेतात असे नसून उद्योगाच्या दृष्टीने ट्रान्सफॉर्मर लोड असत नाही अशा वेळी अनधिकृत कनेक्शन घेतली जातात. केवळ भिवंडी नव्हे तर संपूर्ण राज्यामध्ये वीज चोरीच्या विरोधात शासनाने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. त्यामध्ये भरारी पथके नेमले असून स्पेशल पोलीस ठाणी सेटप केली आहेत, स्पेशल कोर्ट प्राधिकृत केले आहे. संपूर्ण राज्यात अशा प्रकारच्या चोरीबाबत छडा लावून वसुली करीत आहेत आणि २००३ च्या इलेक्ट्रीसिटी कायद्यात वीज चोरीच्या संदर्भात ज्या तरतुदी आहेत त्यांचा कठोरपणे वापर करुन मंडळाचे उत्पन्न सुध्दा १२०० कोटी रुपयांवरुन जवळपास दरमहा १६०० कोटी रुपयांपर्यंत घेऊन गेलो आहोत.

श्री.संजय दत्त : भिवंडीमध्ये वीज चोरीचे प्रमाण खूप जास्त होते. शासनाने जी पावले उचलली त्यातून निश्चितपणे वीज चोरीचे प्रमाण कमी झाले आहे. परंतु आज सुध्दा तेथे काही प्रमाणात वीज चोरी होत आहे. पाच वर्षापूर्वी तेथे काय परिस्थिती होती आणि मागील वर्षात किती प्रमाणात वीज चोरीमध्ये धट झाली, त्यातून किती फरक पडला आहे?

श्री.दिलीप वळसे पाटील : मी आताच सांगितले आहे. वीज गळतीचे प्रमाण ४४ टक्के होते ते जानेवारी, २००८ अखेर २४ टक्क्यापर्यंत खाली आणले आहे.

-----------

(नंतर श्री.खर्चे...........

अस्धारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पुणे येथील ससून रूग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७) * ३७७८६ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रूग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची १६७ पदे रिक्त असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २००७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चतुर्थश्रेणीतील रिक्त असलेली पदे भरण्यात न आल्यामुळे रूग्णांना उपचारासाठी घेऊन येणाऱ्या नातेवाईकांनाच कक्षसेवक म्हणून काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चतुर्थश्रेणीतील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) होय, अंशत: खरे आहे.

दिनांक ३१.१२.२००७ अखेर ससून रुग्णालयात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची एकूण १०२ पदे रिक्त होते.

(२) हे खरे नाही.

(३) १०२ रिक्त पदांपैकी ११ बदली कर्मचाऱ्यांच्या तात्पुरत्या सेवा नियमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तर विभागीय आयुक्त (मागासवर्गीय कक्ष), पुणे विभाग, पुणे यांच्याकडून बिंदू मानावलीच्या नोंदवह्या प्रमाणीत होताच उर्वरीत ९१ रिक्त पदे तातडीने भरण्यात येतील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, ससून रुग्णालयातील चतुर्थश्रेणीतील रिक्त असलेली पदे भरण्यात न आल्यामुळे रुग्णांना उपचारासाठी घेऊन येणाऱ्या नातेवाईकांनाच कक्षसेवक म्हणून काम करावे लागते हे खरे आहे काय, या प्रश्नाला हे खरे नाही असे उत्तर दिले आहे. विभागीय आयुक्त (मावक), पुणे विभाग, पुणे यांच्याकडून बिंदू नामावलीच्या नोंदवह्या प्रमाणित होताच उर्वरित ९१ रिक्त पदे तातडीने भरण्यात येतील असे म्हटले आहे. बिंदू नामावली नोंदवह्या किती वर्षापासून प्रमाणित झालेल्या नाहीत? त्या किती दिवसात प्रमाणित करण्यात येतील? या संदर्भात शासन काही निदेश देणार आहे का? बिंदू नामावली नोंदवह्या प्रमाणित झाल्या नाही तरी भरती करण्यात येईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एकूण १०२ पदे रिक्त होती हे खरे आहे. त्यापैकी ९१ पदे बदली कामगारांमधून भरण्यात येऊन त्यांच्याकडून काम करुन घेतले जात आहे. त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना कक्षसेवक म्हणून काम करण्याची गरज भासत नाही. बदली कामगार काम करीत आहेत. ज्यावेळी प्रश्न विचारण्यात आला होता, त्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले होते

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की, रोस्टर तपासणीसाठीचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविला आहे. दोन दिवसापूर्वी त्यांचा अहवाल सादर झाला आहे. ९१ पदांना त्यांच्याकडून क्लिअरन्स देण्यात आलेले असून ताबडतोब ही पदे भरण्याबाबत डीनना अधिकार दिले आहेत.

डॉ.दीपक सावंत : ९१ बदली कामगार काम करीत आहेत, त्यांना भरती प्रक्रियेमध्ये प्राधान्य दिले जाईल काय?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना कल्पना आहे की, सुप्रीम कोर्टाचे आदेश असल्यामुळे बॅक डोअर एन्ट्री देऊ शकत नाही. भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे काम एमकेसीएलला काम देणार आहोत. त्यांच्या नियमामध्ये बदली कामगार बसत असतील तर त्यांना आपण प्रेफरन्स देऊ.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, अशाच पध्दतीने राज्यातील इतर शासकीय रुग्णालयामध्ये सुध्दा कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. संपूर्ण राज्यातील शासकीय रुग्णालयातील रिक्त असलेल्या पदांचा आढावा घेऊन ती पदे तातडीने येत्या दोन महिन्याच्या आत भरण्यात येतील काय?

श्री.सुरेश शेट्टी : या प्रश्नासंबंधी सन्माननीय सभागृहात उत्तर देत असताना माननीय मंत्रीमहोदय श्री.दिलीप वळसे पाटील यांनी सर्व रुग्णालयांमध्ये जी रिक्त पदे आहेत त्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमून लवकरात लवकर रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करु असे आश्वासन दिलेले आहे.

-------------

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नागपूर येथील बुटीबोरी परिसरातील उद्योगांवर महाराष्ट्र शासनाने ई.पी.एस.ई (एन्व्हार्यमेंट सर्विस शुल्क) लागू करण्यात आल्याबाबत

**(८) * ३९२३९ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील बुटिबोरी औद्योगिक परिसरातील उद्योगांवर महाराष्ट्र शासनाने ई.पी.एस.ई (एन्व्हार्यमेंट सर्विस शुल्क) ३ फेब्रुवारी, २००७ पासून लागू केला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहु शुल्क आकारण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहु शुल्क आकारण्यापूर्वी तेथील उद्योजकांवर करोडो रूपयांचा बोजा पडणार आहे, हे खरे आहे काय,

(४) सदरहू शुल्क आकारण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.अशोक चव्हाण** : (१) नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांवर पर्यावरण सेवा संरक्षण शुल्क (Environment Service Protection Charges) दिनांक १.२.२००० पासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे लागू करण्यात आले आहे.

(२) मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन महामंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार औद्योगिकरणाबरोबरच होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे व पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र (सी.ई.टी.पी.) विकसीत करणे, धोकादायक टाकाऊ रासायनीक पदार्थाचे शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्याची यंत्रणा उभारणे, वृक्ष लागवड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सदरचे शुल्क म.औ.वि.मं. (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) मार्फत आकारले जाते.

(३) हे खरे नाही.

(४) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत म.औ.वि.मं. मार्फत औद्योगिक क्षेत्राचा विकास, नियोजन व व्यवस्थापन करण्यात येते. तसेच मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या औद्योगिक क्षेत्रात इतर पर्यावरणदृष्ट्या आवश्यक सोयीसुविधा महामंडळामार्फत उपलब्ध करुन दिल्या जातात. त्यापोटी अत्यल्प दराने महामंडळामार्फत पर्यावरण सेवा संरक्षण शुल्क आकारण्यात येते.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, नागपूर येथील बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांवर पर्यावरण संरक्षण शुल्क दिनांक १.२.२००० पासून लागू करण्यात आले आहे. माननीय उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन महामंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सीईटीपी विकसित करणे याची अंमलबजावणी झाली आहे का? शास्त्रीय पध्दतीने धोकादायक व टाकाऊ रासायनिक पदार्थाची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा उभारली आहे का? वृक्ष लागवड व अन्य सुविधा त्याठिकाणी निर्माण केल्या आहेत का? जे शुल्क आकारले जात आहे त्याचे दर काय आहेत?

..४..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, पर्यावरणाच्या बाबतीत शासनाला चिंता आहे आणि सुप्रीम कोर्टाने सुध्दा चिंता व्यक्त केली आहे. हायकोर्टाने सुध्दा याबाबत वेळोवेळी आदेश दिले आहेत. सुप्रीम कोर्टाने २०००३ मध्ये निदेशित केले आहे की, पर्यावरणाच्या बाबतीत दक्षता घेऊन जे औद्योगिकरण राज्यात वाढत चालले आहे, देशात वाढत चालले आहे......

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 39239 .......**

श्री. अशोक चव्हाण ....

ते विचारात घेता एनव्हायर्नमेंटचे संतुलन राखता आले पाहिजे. ज्या कारखान्यातून वेस्ट बाहेर टाकले जाते त्यावर त्यांनीच ट्रिटमेंट करुन ते डिस्पोजल केले पाहिजे. कारखात्यातून बाहेर पडत असलेल्या वेस्टचा परिणाम पर्यावरणावर फार मोठया प्रमाण्ात होऊ शकतो. यासंदर्भात मा. सुप्रीम कोर्टाने नियुक्त केलेली मॉनेटरींग कमिटी वेळोवेळी पाहणी करीत असते. बुटीबोरीच्या बाबतीत या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. पर्यावरणाचा -हास होऊ नये यासाठी 5 एमएलडी प्लॅट केला असून यासाठी 10 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. हायरेट ट्रान्समिशन सिस्टीम या ठिकाणी करण्यात आलेली आहे. तसेच कारखान्यातून जे वेस्ट बाहेर येते ते डिस्पोज करण्याची यंत्रणाही करण्यात आलेली असून वृक्ष लागवड, रस्ते, गटार, वीज अशा सोयी या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. यासाठी 147 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहे. या ठिकाणी जे शुल्क आकारले जाते त्याबाबतीत त्यांचा आक्षेप असावा असे मला वाटते. सुरुवातीला प्लॉटच्या क्षेत्रफळावर कर आकारला जात होता. वेळोवेळी यासंदर्भात उद्योजकांनी तक्रारी केल्या होत्या. 10 पैसे प्रती चौरस मीटर शुल्क आकारले जात होते. हे शुल्क राज्यातील सगळयाच एमआयडीसींना लागू नाही परंतु ज्या ठिकाणी औद्योगिक केमिकल झोन आहेत किंवा फाईव्ह स्टार एमआयडीसी आहेत त्या ठिकाणी हा कर आारला जातो. ज्या ठिकाणी औद्योगीकरण मोठया प्रमाणात झाले आहे आहे त्या ठिकाणी 10 पैसे प्रती चौरस मीटर दर लावला आहे आणि पाण्याच्या उपयोगासाठी 50 पैसे कर आकारला जात होता परंतु यासंदर्भात तक्रारी झाल्यामुळे हा दर 5 पैसे करण्यात आलेला आहे. शासन यासाठी 147 कोटी रुपये खर्च करीत आहे. शुल्कापोटी आम्हाला केवळ 70 हजार दर महिन्याला प्राप्त होत आहे. संपूर्ण पैसा रिकव्हर व्हावा अशी आमची अपेक्षा नाही. कर आकारण्यामागील उद्देश असा आहे की, जे कारखाने पोल्यूशन करतात त्यावर नियंत्रण रहावे म्हणून आम्ही कर लावलेला आहे. पोल्यूशनच्या बाबतीत मा. सुप्रीम कोर्टाने आणि राज्य शासनाने चिंता व्यक्त केलेली आहे त्यामुळे या ठिकाणी जो कर आकारला जात आहे तो योग्य आहे असे मला वाटते.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जे.जे.हॉस्पिटलला एम्स चा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेले १०० कोटी रुपये रोखून ठेवल्याबाबत**

**(९) * ३७७४५ डॉ. दिपक सावंत , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एका वर्षापूर्वी मुंबईतील जे.जे. हॉस्पिटलला सुपर स्पेशलिटीचा दर्जा (एम्स) देण्यासाठी केंद्र शासनाने सुमारे १०० कोटी रुपये मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०० कोटी रुपये केंद्र शासनाने मंजूर करुन एक वर्ष झाले असले तरी सदर फंडाची रक्कम राज्य शासनाकडे अद्याप प्राप्त झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने १०० कोटी रुपये मंजूर करताना त्यासाठी राज्य शासनाने आपल्या हिश्यापोटी २० कोटी रुपये देण्याची अट घातली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने २० कोटी रुपये अद्याप मंजूर केले नसल्याने केंद्र शासनाने आपले मंजूर केलेले १०० कोटी रुपये रोखून ठेवले आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, केंद्र शासनाच्या अटीनुसार २० कोटी रुपयांच्या राज्य शासनाच्या हिश्यांची रक्कम अद्याप उपलब्ध न करुन दिल्याने जे.जे. हॉस्पिटलच्या सुपर स्पेशालिटीचे काम वर्षभर रखडले आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्य शासनाच्या वाट्याचे २० कोटी रुपये उपलब्ध करण्याबाबत शासनाने तशी आर्थिक तरतूद केली आहे काय ?

**श्री. सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता** : (१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) होय. हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) राज्य शासनाने रुपये २० कोटी उपलब्ध करुन दिले आहेत.

डॉ. दीपक सावंत : माननीय सभापती महोदय, महत्वाचा प्रश्न या ठिकाणी चर्चेसाठी आलेला आहे. जे जे हॉस्पिटलला सुपर स्पेशालिटीचा दर्जा देण्यासाठी 120 कोटी रुपये देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे तसेच यासभागृहात सन्माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी यासंदर्भात कबूलही केले होते. जे.जे. हॉस्पिटलला एम्सचा दर्जा देण्याची घोषणा माननीय मंत्रीमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी केली होती. जे.जे. हॉस्पिटलला राज्य शासनाने 20 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहे असे उत्तरात सुध्दा म्हटलेले आहे. परंतु जे.जे. हॉस्पिटलला एम्सचा दर्जा दिला गेला आहे असे आम्हाला कोठेही दिसून येंत नाही. या ठिकाणी अनेक पदे रिक्त आहेत. सद्या जे.जे.चे आरोग्य खालावत चालले आहे. केंद्रीय मंत्री आंबुमनी रामदोस यांच्याकडे

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37745** .......

डॉ. दीपक सावंत ....

राज्य शासनाने 20 कोटी रुपये जे.जे.हॉस्पिटलला एम्सचा दर्जा देण्यासाठी दिले होते यामध्ये केंद्राचा वाटा 100 कोटी व राज्यशासनाचा वाटा 20 कोटी रुपये होता. या गोष्टीला आता एक वर्ष उलटून गेलेले आहे. त्यामुळे जे.जे. हॉस्पिटलला 120 कोटी रुपये का आलेले नाही? 120कोटी रुपयांचा स्टेटस काय आहे? हे 120 कोटी आपण दुसरीकडे वळवले आहे की, हे पैसे राज्याच्या तिजोरीमध्ये आहेत याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37745....

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय. केन्द्र सरकारने जे.जे. हॉस्पिटलचे अपग्रेडेशन करण्याचा निर्णय दिनांक 24.6.2006 रोजी घेतला होता. या कामासाठी 120 कोटी रुपये लागणार आहेत. प्रत्येक राज्यातील एका हॉस्पिटलचे अपग्रेडेशन करावयाचे असा केन्द्र सरकारने कार्यक्रम हातात घेतला आहे. त्याप्रमाणे जे.जे. हॉस्पिटलचे अपग्रेडेशन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून त्याला केन्द्र सरकारने मान्यता दिली आहे. या कामासाठी राज्य सरकारचा कॉम्पोनन्ट 20 कोटी रुपयांचा असून दिनांक 20 ऑक्टोबर 2007 रोजी केन्द्रीय आरोग्य मंत्री श्री. अंम्बुमणी रामदास यांचा जे.जे. हॉस्पिटलमध्ये सत्कार करण्यात आला होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी 20 कोटी रुपयांचा चेक एम.एम.आर.डी.ए.च्या वतीने त्यांना दिला असून तो चेक जे.जे. हॉस्पिटलच्या अकाऊन्टमध्ये जमा केला गेला आहे. त्यावेळी आम्हाला असे वाटले की, राज्य सरकारने आपले 20 कोटी रुपये दिल्यानंतर केन्द्र सरकार सुध्दा आपले 100 कोटी रुपये या कामासाठी रिलीज करील व या हॉस्पिटलसाठी जी काही इक्वीपमेन्टस खरेदी करावयाची आहे त्यासाठी निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु होईल. या विषयाच्या संदर्भात गेल्या आठवडयात या सभागृहात चर्चा झाली होती सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी एक लक्षवेधी सूचना मांडली होती. या संदर्भात सांगण्यात आले होते क, नागपूरच्या हॉस्पिटलचे पैसे मुंबईच्या हॉस्पिटलकरता वळविण्यात आले होते. पैसे वळविण्याच्या बाबतीत वाद सुरु झाला होता. या प्रकरणात नागपूरचे श्री.रमेश दयाशंकर चौबे यांनी जनहित याचिका नागपूरच्या हायकोर्टात सादर केली होती. या याचिकेत त्यांनी असे म्हटले होते की, " Nagpur should have been selected for upgradation."जे.जे. हॉस्पिटलसाठी शासनाने पैसे वळविले होते या संबंधी हायकोर्टात प्रकरण गेल्यानंतर त्यांनी स्टे दिलेला आहे. It is still pending in the Nagpur Court.केन्द्र सरकारच्या अधिका-याबरोबर आमच्या अधिका-यांची नेहमीच चर्चा होत असते. त्यावेळी त्यानी असे सागितले की, ही जनहित याचिका डिसपोज ऑफ झाल्यानंतर आम्ही पैसे देऊ. त्यानतर निविदा काढू. अशा प्रकारे केन्द्र सरकारच्या अधिकाऱ्यांचे मत आहे.नागपूरच्या हॉस्पिटलची निवड केन्द्र सरकार करीत नाही. राज्य सरकार हॉस्पिटलची निवड करीत असते आणि त्याकामासाठी राज्य सरकारने पैसे दिलेले आहेत. राज्य सरकारने जे.जे. हॉस्पिटलसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37745..श्री.सुरेश शेट्टी...

पैसे दिलेले आहेत तेव्हा ते नागपूरच्या हॉस्पिटलसाठीचे कसे होऊ शकतात हे मला समजत नाही. जे.जे. हॉस्पिटलचे अपग्रेडेशन करण्यासाठी राज्य सरकारने निवड केली होती आणि ही निवड करीत असतांना राज्य शासनाने सर्व पॅरामिटर्स लावले होते. सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने मी सन्माननीय सदस्यांना सागू इच्छितो की.,राज्य सरकारने 20 कोटी रुपये या कामासाठी केन्द्रीय आरोग्य मंत्री श्री.अम्बुमणी रामदास यांच्या सत्काराच्या वेळी दिनांक 20 ऑक्टोबर 2007 रोजी दिले होते. त्या कार्यक्रमाला माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय केन्द्रीय मंत्री श्री.मुरली देवरा आणि मी उपस्थित होतो. या कार्यक्रमाच्या वेळी जाहीर सभेमध्ये केन्द्रीय आरोग्य मंत्र्यांना अशी विनंती करण्यात आली होती की, "आंध्र प्रदेशसाठी तुम्ही दोन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करण्याचे ठरविले आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रातील जे.जे. हॉस्पिटल आणि नागपूरचे हॉस्पिटल यांचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करण्याची मान्यता द्यावा." त्यावेळी केन्द्रीय आरोग्य मंत्र्यांनी असे सागितले की,". नागपूरच्या हॉस्पिटल बाबत आम्ही प्रायारिटीने विचार करीत आहोत. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि या विभागाच्या प्राधान सचिवांनी पत्र पाठविले होते त्या सदर्भात त्यांच्याकडून कनफर्मेशनसुध्दा आलेले आहे. केन्द्रीय आरोग्य मंत्री श्री. अंबुमणी रामदास यांनी श्री.विलास मुत्तेमवार यांना एक पत्र पाठविले असून त्या पत्रात त्यांनी असे म्हटलेले आहे की, "Yes, we are considering Nagpur Hospital for upgradation."

दोन दिवसापूर्वीच त्यांचा असा निरोप आला आहे की पुढच्या आठवडयात अधिका-यांना दिल्लीला पाठविण्यात यावे . मुंबईचे जे.जे.हॉस्पिटल आणि नागपूरचे हॉस्पिटल अशा दोन्ही ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला मान्यता देण्यात येणार असून नागपूरच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी 100 कोटी रुपये रिलीज करण्यासाठी आमच्या अधिका-याना दिल्लीला बोलावलले आहे त्याप्रमाणे पुढच्या आठवडयात दोन्ही कामे होतील. जे.जे. हॉस्पिटलला 100 कोटी रुपये मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया लवकरात लवकर सुरु होईल.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, नागपूरच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या संदर्भात वर्षानुवर्षे अन्याय होत आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मागच्या आठवडयात या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37745..डॉ.एन.पी.हिराणी..

विषयाच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की," केन्द्र सरकारकडे या संबंधीचे प्रपोजल पाठविले आहे किंवा पाठविणार आहे. परंतु या बाबतीत पाठपुरावा केल्यानंतर असे दिसून आले आहे की राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे अशा प्रकारचे प्रपोजल पाठविलेले नाही. केन्द्रीय आरोग्य मंत्र्यांनी सभागृहामध्ये तशा प्रकारची माहिती दिली होती की,. महाराष्ट्र शासनाचे नागपूरच्या हॉस्पिटलसंबंधी प्रपोजल अजूनही आम्हाला मिळालेले नाही. सन्माननीय आरोग्य मंत्र्यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये असे सांगितले होते की, अशा प्रकारचे प्रपोजल केन्द्र सरकारकडे लवकरात लवकर पाठविले जाईल परंतु अजूनही ते पाठविण्यात आलेले नाही..

नंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 11:50

डॉ. हिराणी (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 37745 ...

ते प्रपोजल आधीच पोहोचले असेल, पण यामध्ये शासनाने गडबड केलेली आहे. आता नागपूरचे मेडिकल कॉलेजचा क्लेम होता, पण मुंबईला सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मिळाले. खरे तर मुंबईत अशी 10 सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलस आहेत. त्यामुळे या संदर्भात नागपूरवर अन्याय झालेला आहे आणि त्या अन्यायाचे परिमार्जन करताना तातडीने आपण केंद्र सरकारला प्रपोजल सादर केले पाहिजे. तसे केले आहे काय ? नसल्यास, किती दिवसात ते करण्यात येईल.?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी या सभागृहात विनंती करतो की, या संबंधात नागपूर आणि मुंबईचा जो वाद निर्माण केला जातो आहे तो आपण संपवून टाकला पाहिजे. कारण शासनाचा हाच प्रयत्न आहे की, मुंबई आणि नागपूर या दोन्ही ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल झाली पाहिजेत. त्यासाठीच 24 नोव्हेंबर 2007 ला विभागाच्या प्रधान सचिवांनी याबाबतचे फॉर्मल प्रपोजल केंद्र सरकारला पाठविले आहे. याचा नियम असा आहे की, एकदा केंद्र सरकारने कॅबिनेटमध्ये निर्णय घेतल्यानंतर महाराष्अ्र राज्यात नागपूरमध्ये एक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल द्यायचे, असा धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर त्याचे संपूर्ण पॅरामीटर जे काही आहे म्हणजे 120 कोटी मध्ये काय काय करायचे ते सारे संपूर्ण देशाच्या बाबतीतच ठरलेले आहे. त्यानुसार तत्त्वत: ठरल्यानंतर, याबाबत अंतिम निर्णय केंद्रीय कॅबिनेटने घेतल्यानंतर ते आपल्याला कळविणार की, तुमचा प्रस्ताव तत्त्वत: सरकारने मान्य केलेला आहे तेव्हा नागपूरमध्ये सध्या या दृष्टीने काय सोयी-सुविधा आहेत आणि अजून काय पाहिजेत ते कळवा. त्या स्टेजमध्ये आपण डिटेल सजेशन्स केंद्र सरकारला कळवू.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सुरूवातीस जेव्हा या प्रकल्पासंबंधात बातम्या आल्या त्यामुळे विदर्भातील लोकांचे मन एकदम दु:खी झाले. आंध्र प्रदेशला दोन प्रकल्प मिळू शकतात आणि मग महाराष्ट्राला का दिले जाऊ शकत नाही असा प्रश्न पडला. आता माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे त्यातून असे कळले की, या संबंधात नागपूरस्थित श्री.उमेश चौबे यांनी एक पीआयएल दाखल केलेला असल्याने आणि त्याबाबत निकाल लागेपर्यंत याबाबत केंद्र सरकारकडून काहीही केले जाऊ शकत नाही. तसेच त्यांनी नागपूर आणि मुंबईमध्ये हे जे प्रकल्प दिले जाणार आहेत त्या दोन्हीची माहिती दिली ती लक्षात घेता, .. सभापती महोदय, श्री.उमेश चौबे हे गेली अनेक वर्षे सार्वजनिक जीवनात काम करीत आहेत आणि मी त्यांना स्वत: चांगला ओळखतो. त्यांनी

..... के 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. देशमुख (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 37745 ...

याबाबत पीआयएल केलेला आहे, शेवटी काही होत नाही म्हटल्यानंतर माणसाने करायचे तरी काय? मी स्वत: देखील अशाच एका प्रकरणात पीआयएल केलेला आहे. कारण सभागृहामध्ये आम्ही एखादी गोष्ट मांडतो आणि त्यामागील लॉजिकदेखील ऐकून घेतले जात नाही तर मग पीआयएल केल्याशिवाय उपाय नसतो., तो पीआयएल करण्यामागे काही निश्चित हेतू असतो. आता राज्यमंत्र्यांनी सांगितले की, याबाबत मंत्रिमंडळामध्ये अंतिम निर्णय होत आहे. तेव्हा मंत्रिमंडळासमोर याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर 8-10-15 दिवसात किंवा महिनाभरामध्ये आपण श्री.उमेश चौबे यांना भेटून, केंद्र सरकारचा आणि राज्य सरकारचा या बाबतीतील हेतू जाहीर करून त्यांना पीआयएल मागे घेण्याची विनंती कराल का ? आम्ही देखील तसा प्रयत्न करूच, पण सरकार तसे करील का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी आता माहिती दिली की, श्री.उमेश चौबे जे त्यांचे चांगले मित्र आहेत तेव्हा मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांना भेटून पीआयएल विड्रॉ करण्याची विनंती करावी. त्याप्रमाणे त्यांनी पीआयएल मागे घेतल्यानंतर लगेच जे.जे.हॉस्पिटलचे प्रपोजल क्लिअर होईल. नाही तरी ते क्लिअर होणारच आहे. परंतु आपल्याला केंद्र सरकारला कळविला येईल की, आता याबाबत कोठलाही पीआयएल नाही, तेव्हा दोन्ही प्रपोजलचे काम करा. तेव्हा माननीय मंत्री महोदय, श्री.वळसे-पाटील आणि मी स्वत: या दोन्ही प्रकल्पांबाबत दिल्लीहून प्रपोजल्स मंजूर करून आणणार आहोत.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, श्री.उमेश चौबे हे जरूर माझे मित्र आहेत पण मी विनंती केल्याबरोबर ते लगेच पीआयएल मागे घेतील असे ते मित्र नाहीत. परंतु आताच येथे काहींनी म्हटले की, पीआयएल अशा प्रकारे मागे घेता येत नाही. असे असेल तर मग आपण सरकारच्या वतीने कोर्टात जाऊन सांगितले पाहिजे की, आम्ही ही दोन्ही ठिकाणची प्रपोजल्स पूर्ण करणार आहोत आणि त्यासाठी केंद्र सरकार अमुक इतके पैसे रिलिज करणार आहे. तसे आपण कोर्टाला सांगणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आम्ही आमच्या सॉलिसिटरला या संबंधात सूचना दिल्या आहेत की, त्यांनी याबाबत लवकरच तारीख घेऊन याबाबतची नेमकी पोझिशन काय आहे ते कोर्टापुढे मांडावे.

( यानंतर श्री. सरफरे ....एल 1 ..

अशुद्धप्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/ 11:55

ता.प्र.क्र. 37745....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपली आजची जी पोझिशन आहे, या बाबतीत आपण महाराष्ट्राच्या वतीने आपले बळ वापरुन या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. या प्रश्नाच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. तेव्हा याबाबतीत दोन्ही ठिकाणी काम केले जाईल अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र नागपूरच्या उच्च न्यायालयामध्ये सादर करण्यामध्ये आपल्याला अडचण काय आहे?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आम्ही 100 टक्के करुन देऊ अशाप्रकारचे प्रतिज्ञापत्र महाराष्ट्र शासन कसे काय फाईल करु शकते? याबाबतीत केंद्र सरकारने निर्णय घ्यावयाचा आहे. संबंधित केंद्रीय मंत्र्यांनी श्री. विलास मुत्तेमवार यांना दिलेले पत्र मी आपणास वाचून दाखवितो.

" Please refer to your letter dated 14th February, 2008. I have reviewed the matter and I am considering inclusion of the Government Medical College, Nagpur for upgradation. You would be informed about the progress in due course of time." याबाबतीत केंद्रीय मंत्र्यांना मी स्वत: जाऊन भेटलो असतांना त्यांनी याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळापुढे सादर करण्यात येईल. आणि केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये त्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करु असे त्यांनी सांगितले आहे.

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख जी ने जैसा कहा है कि नागपुर के श्री उमेश चौबे ने अदालत में जो जनहित याचिका दायर की है, उसके संबंध में अविलंब सरकार अदालत में प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करें. मुंबई के जे.जे. हॉस्पिटल और नागपुर के हॉस्पिटल को सुपर स्पेशलिटी का दर्जा दिया जाने वाला है. इस कार्य के लिए बजट में 20 करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. मैं यह कहना चाहता हूं कि नागपुर एवम् मुंबई के अस्पताल का काम नहीं रुकना चाहिए इसलिए तुरन्त अदालत में प्रतिज्ञापत्र प्रस्तुत किया जाना चाहिए. दूसरी बात यह है कि नागपुर के मेडिकल कॉलेज के गोल्डन ज्युबिली प्रोग्राम में राज्य के स्वास्थ्य मंत्री ने यह कहा था कि केन्द्रीय सरकार नागपुर के अस्पताल को एम्स का दर्जा दें या न दें, महाराष्ट्र सरकार की ओर से नागपुर के अस्पताल को एम्स के स्तर की सुविधा जरुर दी जाएगी. मैं यह जानना चाहता हूं कि क्या केन्द्रीय सरकार ने मुंबई के जे.जे. हॉस्पिटल और नागपुर के हॉस्पिटल को एम्स का दर्जा दिए जाने संबंधी निर्णय ले लिया है ? मंत्री महोदय जी

...2

DGS/ KTG/ SBT/ 11:55

ता.प्र.क्र. 37745....

श्री सय्यद जामा ....

ने अभी श्री विलास मुत्तेमवार का पत्र पढ़ कर दिखाया है, वह पब्लिसिटी के लिए और पेपर में आने के लिए भी हो सकता है. इसलिए मैं यह जानना चाहता हूं कि क्या केन्द्रीय सरकार ने निर्णय ले लिया है ? अगर केन्द्रीय सरकार इन दोनों अस्पतालों को एम्स का दर्जा देने का कार्य नहीं करती है तो क्या राज्य सरकार अपने स्तर पर यह कार्य करेगी और क्या इन दोनों अस्पतालों के अलावा महाराष्ट्र के अन्य किसी अस्पताल को अपग्रेड करने का प्रस्ताव मंजूर किया गया है ?

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, भारत सरकारने देशातील काही राज्यांमध्ये चांगल्या दर्जाच्या मेडिकल एज्युकेशनच्या संस्था निर्माण केल्यानंतर त्यांना अटॅच्ड असलेली हॉस्पिटल्स अपग्रेड करण्यासंदर्भात पंतप्रधान ग्रामीण स्वास्थ योजनेंतर्गत कार्यक्रम घेतला. आणि त्याबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन सांगितले की, प्रत्येक राज्याला अलॉटमेंट दिली असून त्यांची ठिकाणे ठरविण्यासंदर्भात राज्य सरकारना अधिकार दिले आहेत. एक गोष्ट खरी आहे की, राज्यातून अशाप्रकारची योजना जाहीर झाल्यानंतर त्यामध्ये के.ई.एम. हॉस्पिटलचा प्रस्ताव गेला होता, जे.जे. हॉस्पिटलचा प्रस्ताव गेला होता आणि नागपूरचा देखील प्रस्ताव गेला होता. अशाप्रकारे अनेक ठिक्‍ाणचे प्रस्ताव गेले होते. त्या त्या भागातील नेते आणि कार्यकर्ते यांच्या दृष्टीकोनातून त्यांना त्या भागात हा निधी मिळावा किंवा त्यांचे सिलेक्शन व्हावे यासाठी ते प्रयत्न करीत होते. या सभागृहामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, त्यावेळी राज्य सरकारने सर्व बाबींचा विचार करुन जे.जे. हॉस्पिटलची निवड केली. आणि हा आलेला निधी कोणत्याही विशिष्ट शहरासाठी किंवा हॉस्पिटलसाठी आलेला नव्हता, तो राज्य सरकारसाठी आला होता. त्यामुळे तो राज्य सरकारचा निर्णय होता. आणि म्हणून पहिल्या टप्प्यामध्ये जे.जे. हॉस्पिटलचे अपग्रेडेशन करण्याबाबत त्यावेळी चर्चा झाली. त्यावेळी नागपूरची देखील मागणी होती. नागपूरचा निधी जे.जे. हॉस्पिटलला दिला गेला अशी चर्चा झाली. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे केंद्रीय मंत्री श्री. अंबुमणी रामदास हे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मुंबईमध्ये आले होते त्यावेळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय राज्यमंत्री त्यांच्यासमवेत होते. अन्य काही कारणांमुळे मी त्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकलो नाही. त्या कार्यक्रमामध्ये केंद्रीय मंत्र्यांनी माहिती दिली होती.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धप्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ 12:00

ता.प्र.क्र.37745 . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

आपल्याला हा वाद करावयाचा नाही. आपण जे.जे.हॉस्पिटलच्या बाबतीत देखील विचार करु. बाकीच्या राज्यांमध्ये दोन संस्थांसाठी निधी दिलेला आहे. तशा प्रकारे येथे सुध्दा आम्ही आणखी एका संस्थेला निधी देऊ. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, नागपूर येथे गोल्डन ज्युबली कार्यक्रम झाला होता, तेव्हा मी सुध्दा गेलो होतो. त्या समारंभामध्ये भाषण करण्यापूर्वी मी माननीय मुख्यमंत्र्यांशी फोनवर बोललो होतो. त्यामुळे मी जाहीरपणे समारंभामध्ये कमिटमेंट दिली की, केंद्र शासन दुसऱ्या हॉस्पिटलसाठी सुध्दा निश्चित प्रकारे पैसे उपलब्ध करुन देईल. आमचे याबाबतीत बोलणे झालेले आहे. यामध्ये काही अडचण आली तर राज्य शासन स्वतःच्या बजेटमधून तरतूद करील आणि अशी अतिशय स्पष्ट कमिटमेंट माननीय मुख्यमंत्र्यांच्या संमतीने दिलेली असल्याने, त्यामध्ये कोणत्याही प्रकारे दुमत असण्याचे कारण नाही. केंद्रीय मंत्री महोदयांनी सुध्दा माननीय मुख्यमंत्री, माननीय राज्यमंत्री, राज्यातील अन्य नेते आणि आम्हाला सर्वांना बैठकीमध्ये समक्ष सांगितलेले आहे की, माझी याला प्रिन्सीपली मान्यता आहे. आता माझ्यासमोर एवढाच प्रश्न आहे की, यासंबंधातील प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळासमोर न्यावयाचा आहे आणि तेथे महाराष्ट्रासाठी आणखी एक ॲलॉटमेंट करावयाची आहे. तसे ते केल्यानंतर तुम्हाला कळविण्यात येईल. त्यानंतर तुम्हाला नागपूर येथील मेडिकल कॉलेजमध्ये काय-काय करावयास पाहिजे, याबाबतीत डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करावा लागतो. या संबंधात टेंडर वगैरे काढण्याचे काम केंद्र शासनाकडे असते आणि त्याचे केंद्र शासनाच्या लेव्हलवर मॉनेटरींग होत असते. फक्त ॲडव्होकेट प्लॅन तयार करुन द्यावा लागतो. म्हणून मी सभागृहाला आणि या माध्यमातून श्री.चौबे साहेबांना विनंती करतो. आम्ही ॲडव्होकेट जनरलच्या माध्यमातून, अतिरिक्त ॲडव्होकेट जनरल यांच्या माध्यमातून न्यायालयाला सांगण्यात येईल की, केवळ पी.आय.एल. दिलेला आहे म्हणून राज्याला मिळणारा 100 कोटी रुपयांचा निधी केंद्र शासनाकडे अडकलेला आहे. आपल्याला दोन्ही गोष्टी करावयाच्या आहेत. त्याला केंद्र शासनाची तयारी आहे. याबाबतीत केंद्रीय मंत्रिमंडळाने किती दिवसामध्ये निर्णय घ्यावा याबाबतीत आपण त्यांना आदेश देऊ शकत नाही. केंद्रीय मंत्र्यांचे इन्टेन्शन क्लीअर आहे.त्यांनी जाहीर स्टेटमेंट केलेले आहे, याला जाहीर मान्यता दिलेली आहे, लिखित स्वरुपात दिलेली आहे. त्यामुळे कोणाला तरी प्रसिध्दीसाठी पत्रे येत आहेत असे म्हणणे म्हणजे त्या दोघांवर

. . . .एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37745 . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

अन्यायकारक केल्यासारखे होईल. यामध्ये राज्य शासनाचे इन्टेंन्शन क्लिअर आहे. आम्ही नागपूरला मागे ठेवणार नाही. आम्ही नागपूरकरता ही फॅसिलिटी वाटेल त्या परिस्थितीत उपलब्ध करुन देऊ.

**सभापती** : प्रश्नात्तराचा तास संपला असला तरी हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई आणि नागपूरच्या अनुषंगाने देखील प्रश्न आहे. महाराट्रातील या दोन्ही ठिकाणी असलेली हॉस्पिटल्स् एम्स्च्या धर्तीवर अपग्रेड झाली पाहिजेत. म्हणून मी सन्माननीय सदस्य सर्वश्री.उल्हास पवार, मधुकर सरपोतदार, बी.टी.देशमुख आणि डॉ.दीपक सावंत या चार सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यासाठी परवानगी देत आहे आणि त्यासाठी मी प्रश्नोत्तराचा तास आणखी चार मिनिटांसाठी वाढवित आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर शासनाच्या हेतूबद्दल मुळीच शंका नाही. माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगल्या हेतूने उत्तर दिलेले आहे. फक्त मी या अनुषंगाने त्यांना आणखी एक विनंती करु इच्छितो, जेणेकरुन हा विषय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या समोर तातडीने यावा. माझी अशी विनंती राहील की, केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये महाराष्ट्रातील जेवढे मंत्री आहेत, त्या सर्व सन्माननीय नेत्यांना, सन्माननीय मंत्र्यांना आपण शासनाच्या वतीने पत्रे द्यावीत. नागपूर, मुंबई, पुणे, सोलापूर असेल, तेथे सिव्हील हॉस्पिटल आहेत. त्यासंदर्भात देखील प्रयत्न करणार आहात काय ? असा पहिला प्रश्न आहे. खाजगी कोणत्याही चॅरिटेबल हॉस्पिटलबाबत सांगावयाचे तर "चॅरिटी" हा शब्द फसवा आहे. आज कोणत्याही हॉस्पिटलमध्ये गरीब माणसाला उपचार घेणे परवडत नाही. म्हणून ही हॉस्पिटल्स् अद्ययावत करणे आणि त्यादृष्टीने आढावा घेण्याचे काम आपण करणार आहात काय ? असा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जे.जे.रुग्णालय अद्ययावत व्हावे म्हणून आपण निधीची मागणी करीत आहोत. हा विषय एक वर्षापासून प्रलंबित आहे. यासंदर्भात केंद्र शासनाने 100 कोटी रुपये देतो असे सांगितल्यानंतर या विषयाला वाचा फुटली आणि मग आपण जे.जे. हॉस्पिटलचे नाव सुचविले. त्यानंतर नागपूर येथील हॉस्पिटलबाबत विषय उपस्थित झाला. माननीय

. . . .एम-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37745 . . . .

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

मंत्री महोदयांना उत्तरामध्ये पी.आय.एल.चा उल्लेख केला. त्यामध्ये प्रेयर्स् काय आहेत ? ज्याच्यामुळे निधी अडकून पडलेला आहे. आपण या प्रेयर्सच्या बाबतीत काय उत्तर दिलेले आहे ? तसेच हा पी.एल.आय.आमच्या प्रगतीच्या आड आलेला आहे काय ? जे.जे.रुग्णालय अपग्रेड झालेले नाही. त्यामुळे मुंबईतील आणि महाराष्ट्रातून येणाऱ्या अनेक रुग्णांचे हाल होत आहे. सध्या जे.जे.रुग्णालयामध्ये जी परिस्थिती असावयास पाहिजे, तशी ती नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.. ता.प्र.क्र. 37745..

या दृष्टीकोनातून रुग्णालयाची प्रगती लवकरात लवकर करण्यात येण्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, पीआयएल डब्ल्यूपी 4691/06 श्री. उमेश दयाशंकर चौबे वर्सेस युनियन ऑफ इंडिया आणि इतर अशी केस होती. राज्य शासनाने याबाबत अर्ज केलेला आहे त्यात असे म्हटले आहे की, "Government Medical College should have been selected for this upgradation instead of J.J. Group of Hospital." प्रतिज्ञापत्र देखील फाईल केलेले आहे. याबाबत कोर्टाने स्टे दिलेला नाही. जे.जे रुग्णालयाची निवड ही अपग्रेडेशन कार्यक्रमाकरीता का करण्यात आलेली आहे यासबंधी संपूर्ण डिटेल प्रतिज्ञापत्र कोर्टासमोर फाईल केलेले आहे. विधान सभेमध्ये व या सभागृहामध्ये देखील या प्रश्नाबाबत दोन वर्षापासून बऱ्याच वेळा चर्चा झालेली आहे. आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, नागपूर येथे रुग्णालयासंदर्भात देखील मागणी होती. केईएम, रुग्णालय व ससून रुग्णालयाच्या बाबत देखील प्रस्ताव होता. प्रत्येक जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधीं, माननीय आमदार यांची अशी मागणी होती की, अपग्रेडेशनचा निधी नागपूर, पुणे, औरंगाबाद येथे मिळावा. याकरिता प्रयत्न केला जात होता. जेजे ग्रुप ऑफ हॉस्पिटलमध्ये अपडेटेशनचा कार्यक्रम घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या संदर्भात सर्व प्रोसेस ट्रान्सपरंट आहे. व त्याबाबतची सर्व माहिती कोर्टाला देण्यात आलेली आहे. 5 प्रमुख रुग्णालयांचे इव्हॅल्यूएशन शासनाने केलेले होते. नियोजन विभाग, वित्त विभागांचे सचिव व मुख्य सचिव यांनी स्वत: हे इव्हॅल्यूएशन केले होते. या प्रक्रीयेची संपूर्ण माहिती कोर्टाला देण्यात आलेली आहे. या संदर्भात लवकरात लवकर तारीख निश्चित करुन कोर्टाकडून ऑर्डर धेण्यात येणार आहे.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, ही प्रादेशिक असंतुलनाची जखम आणखी चिघळू देण्यात काहीच अर्थ नाही. माननीय मंत्री महोदयांना मी धन्यवाद देऊ इच्छितो की त्यांनी जाहीर सभेमध्ये जे सांगितले होते तसेच उत्तर आता सभागृहात दिलेले आहे. आपला जो उद्देश आहे त्याबाबत आमच्या मनात शंका नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी व आपण जाहीर सभोमध्ये जे जाहीर केले होते तेच आपण आता येथे सांगितले आहे. असे झाले नाही तरी राज्य शासनाच्या खर्चाने ते काम पूर्ण करण्यात येईल. माझे एवढेच म्हणणे आहे की, ही जखम आणखी चिघळू देऊ नये. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संदर्भात केंद्र शासनाचे एक पत्र देखील आपल्याकडे आहे. आपण जे म्हणालात ते खरे आहे. अमूक दिवसामध्ये निर्णय घ्या असा आदेश आपण कॅबिनेटला देऊ शकत नाही मात्र असा आदेश कोर्ट देऊ शकते. ही वस्तुस्थिती व उद्देश कोर्टासमोर आपण सांगावे. असे केले तर हा प्रश्न निकाली निघू शकेल. अन्यथा ही चर्चा येथे अशीच होत राहणार. सिलेक्शन संदर्भात काय चर्चा होत आहे हे मी येथे सांगत नाही. श्री. उमेश दयाशंकर चौबे यांचे आभार मानणारे, अभिनंदर करणारे ठराव अनेक ठिकाणी झाले. माझा प्रश्न एवढाच आहे की, संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करुन अतिशय चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. हेही अडकून पडणे व तेही न होणे बरोबर नाही. त्यामुळे यासंदर्भात कोर्टासमोर स्पष्टपणे भूमिका मांडण्यात येणार आहे काय असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री. सुरेश शेट्टी : होय.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, येथे मुंबई व नागपूर असा वाद नाही. यामधून राज्य शासनाची बेफिकिरी मात्र दिसून येत आहे. एम्सचा दर्जा देण्यासाठी ज्या पायाभूत सेवा सुविधा आवश्यक आहेत त्या तेथे उपलब्ध नाहीत. काही रुग्णालयांमध्ये पायाभूत सेवा सुविधा नाहीत, चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी नाहीत. यंत्रसामुग्री नाही, बांधकाम नाही. 100 कोटी मिळण्याची वाट बघण्यात येणार आहे की, या सुविधा देण्यात येणार आहेत ? तसेच या सुविधी कधी देण्यात येणार आहेत ? अन्यथा आपण कबूल करावे की, आमच्याकडे पायाभूत सोयी नाहीत.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जे.जे. रुग्णालयामध्ये अपग्रेडेशनचा कार्यक्रमासंदर्भात सभागृहामध्ये चर्चा करताना सर्व सन्माननीय सदस्य हे एम्ससारख्या सेवा सुविधा द्याव्यात अशी मागणी करीत असतात.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37745 ...... श्री. सुरेश शेट्टी .....

एम्सचे एका इन्स्टिटट्यूटचे वार्षिक बजेट 500 ते 600 कोटी रुपयांचे असते. एम्ससारखी दुसरी इन्स्टिटट्यूट कोठेही होऊ शकत नाही. म्हणून आम्ही अपग्रेडेशन प्रोसेसबाबत सांगतो. एम्ससारखे करावयास गेलो तर 100 ते 120 कोटी रुपयांमध्ये ते होणार नाही. एम्ससारखी एक इन्स्टिटट्यूट उभारण्यासाठी कमीत कमी 1 हजार कोटी रुपये, 2 हजार कोटी रुपये लागतील. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न इन्फ्रास्ट्रक्चर, इक्विपमेंट्स आणि मॅनपॉवरच्या संदर्भात विचारला. जे इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध आहे ते आपण वापरणार आहोत. जे ॲडिशनल इन्फ्रास्ट्रक्चर लागेल ते 120 कोटीच्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये समाविष्ट आहे. जे नवीन इक्विपमेंट्स घ्यावयाचे आहेत ते सर्व या 120 कोटीच्या प्रोजेक्टमध्ये समाविष्ट आहे. मॅनपॉवरच्या संदर्भात सांगावयाचे तर ज्या व्हॅकंसीज आहेत त्याबाबत रिक्रुटमेंटचा ड्राईव्ह सुरु केलेला आहे. ज्या पोस्ट एमपीएससीकडून काढून घेतलेल्या आहेत त्याबाबत डायरेक्ट रिक्रुटमेंट सुरु केलेली आहे. वर्ग 3 च्या बाबतीत आढावा पूर्ण झाला आहे. ती रिक्रुटमेंट सुध्दा करणार आहोत. 120 कोटी रुपयांमध्ये जे इक्विपमेंट खरेदी करणार आहोत ते येण्याच्या अगोदर सर्व मॅनपॉवरची प्रोव्हीजन त्या ठिकाणी करणार आहोत.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या दक्षता व सुरक्षा विभागाने शहर व परिसरात राबवलेली फिरत्या पथकाची मोहीम" या विषयावरील डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स. श्री. अनंत तरे, माजी वि.प.स. यांच्या दिनांक 14 डिसेंबर, 2004 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 56 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : अधिक माहिती छापावी )

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख ( वित्त व नियोजन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादितचा सन 2005-06 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. बाबा सिद्दीकी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1998-1999, 1999-2000, 2000-2001, 2001-2002, 2002-2003 व 2003-2004 या आर्थिक वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 2004-05, 2005-2006 व 2006-07 चा अनुक्रमे 13 वा, 14 वा व 15 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 2003-04, 2004-05, 2005-06 व 2006-07 चा अनुक्रमे 19 वा, 20 वा, 21 वा व 22 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या अहवालांच्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी आता जे अहवाल सादर केलेले आहेत विशेषत: माथाडी कामगार मंडळांचे अहवाल 10-15 वर्षाचे अहवाल आता सभागृहात सादर करीत आहेत हे अहवाल उशिरा सादर करण्याची जी कारणे आहेत ती सभागृहासमोर सांगितली पाहिजेत. त्या अधिकाऱ्यांना जाब विचारला पाहिजे.

**सभापती** : माननीय कामगार राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, अशा पध्दतीने माथाडी कामगार मंडळाचे किंवा अन्य संबंधित अहवाल आपल्याकडे वेळेत आले पाहिजेत आणि ते सभागृहासमोर जर वेळेत ठेवले गेले तसेच विलंबाचे कारण काय हे सुध्दा सभागृहाला समजले तर ते योग्य होईल.

---

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा सन 2005-06 चा पहिला वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

डॉ. विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-2 चा सन 2001-2002 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ श्री.बरवडनंतर 12:15

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

प्रा.बी.टी.देशमुख ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा नववा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.सुधाकर गणगणे ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्ग कल्याण समितीचा आठवा व नववा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचे अहवाल सभागृहाला सादर करण्यात आले आहेत.

--------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्याबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

डॉ.विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिनांक 23 मार्च, 2007 रोजी "रु.12.00 कोटीचा निधी वितरित झाल्यानंतर हा निधी कोणाकोणाला कशाप्रकारे दिला " या विषयावर उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यावरील चर्चेच्यावेळी सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

-------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पदाचा दर्जा देणे

**मु.शी.**: अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पदाचा दर्जा देणे याबाबत माननीय सभापतींचा निर्णय.

**सभापती** : दिनांक 16 एप्रिल, 2007 रोजी महाराष्ट्र विधान परिषदेत उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील "अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पदाचा दर्जा देण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 24895 वरील चर्चेच्यावेळी प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स. व श्री.नितीन गडकरी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवरील मी निर्णय देत आहे.

दिनांक 16,एप्रिल, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रा.शरद पाटील व इतर सदस्यांच्या "अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पदाचा दर्जा देण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 24895 च्या अनुपूरक चर्चेच्यावेळी प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स.यांनी राज्यातील सर्व महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पद समजले जाते याचे कारण कायद्यामध्ये तशी तरतूद आहे, या कायद्यातून इंजिनिअरींगच्या लोकांना वगळा अशी तरतूद नाही त्यामुळे या कायद्याचे पालन शासनाने करणे आवश्यक आहे असा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे ग्रंथपाल हे पद शिक्षकीय पद नाही, अशी माहिती दिली होती. तसेच श्री.नितीन गडकरी, वि.प.स. यांनी देखील याबाबतचा कायदा काय आहे याची शहानिशा करावी व त्याची अंमलबजावणी करावी अशी सूचना केली होती. त्यावर मी याप्रकरणी चौकशी करुन निर्णय देण्याचे जाहीर केले होते.

यासदंर्भात प्रकरणाची निश्चित वस्तुस्थिती जाणून घेण्याकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून माहिती मी मागविली होती. उक्त विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार अभियांत्रिकी महाविद्यालयातील ग्रंथपालांना शिक्षकीय पदाचा दर्जा देण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अभिप्राय प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असल्याने शासन स्तरावर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारावर प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात आला असता ग्रंथपाल या पदास

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार जरी शिक्षकीय पदाची वेतनश्रेणी दिलेली असली तरी सदर पदाचा समावेश अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकामध्ये शिक्षकीय पदांमध्ये केलेला नसल्यामुळे सदर पद हे शिक्षकेत्तर आहे. त्याचप्रमाणे सदर पदाचा शिक्षकीय पदाप्रमाणे शैक्षणिक कार्यभारही नसल्यामुळे ग्रंथपाल पदास शिक्षकीय पदाचा दर्जा देणे उचित ठरणार नाही या कारणास्तव संचालक (तंत्रशिक्षण) यांचे अभिप्राय विचारात घेऊन उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा प्रस्ताव वित्त विभागाकडून नाकारण्यात आला आहे.

सबब, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता ग्रंथपाल पदास शिक्षकीय पदाची वेतनश्रेणी जरी दिलेली असली तरी सदर पदाचा समावेश अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकामध्ये शिक्षकीय पदांमध्ये केलेला नसल्यामुळे सदर पद हे शिक्षकेत्तर आहे. तसेच सदरहू पदास शिक्षकीय पदाप्रमाणे शैक्षणिक कार्यभारही नसल्यामुळे या पदास शिक्षकीय पदाचा दर्जा देणे शक्य होणार नाही.

------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याचे मुद्दे

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून एक महत्वाचा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. सीईटी परीक्षा 27 एप्रिलला होणार आहे. असंख्य विद्यार्थी इंजिनिअरिंगच्या सीईटी परीक्षेला बसलेले आहेत. ही परीक्षा केन्द्र शासनस्तरावर कंडक्ट केली जाते. नागपूर, दिल्ली, पुणे या ठिकाणी या परीक्षांची केन्द्रे आहेत. अनेक विद्यार्थ्यांना गैरसोयीच्या ठिकाणी ही परीक्षा केन्द्रे देण्यात आलेली आहेत. त्याबाबतीत वर्तमानपत्रातूनही वृत्त प्रसिध्द झालेले असून अनेक विद्यार्थ्यांचे मला याबाबतीत दूरध्वनी आलेले आहेत. महाराष्ट्रातील काही विद्यार्थ्यांना भोपाळ येथील परीक्षा केन्द्रावर जावे लागणार आहे. म्हणजे जेथे कसे जायचे हेच माहीत नाही अशी परीक्षा केन्द्रे देण्यात आलेली आहेत. अशा परीक्षा केन्द्रावर जाण्यासाठी वेळ आणि पैसे जाणार आहेत. तसेच हे सर्वांना परवडणारे नाही. अशा प्रकारे सीईटीच्या विद्यार्थ्यांना खूप मन:स्ताप सहन करावा लागत आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्यांनी माझ्याकडे ज्या औचित्याच्या मुद्यासाठी परवानगी मागितली होती तो मुद्दा आता ते मांडत असलेल्या मुद्यापेक्षा वेगळा आहे. असे करणे बरोबर नाही. तेव्हा जो मुद्दा मांडण्याची परवानगी सन्माननीय सदस्यांनी मागितलेली असेल तोच मुद्दा त्यांनी मांडणे गरजेचे आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मी मांडत असलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत मला परवानगी दिलेली आहे असे वाटले. अनावधानाने ही चूक झालेली आहे.

**सभापती** : असे होणे इष्ट नाही. सन्माननीय सदस्यांनी आपला औचित्याचा मुद्दा पूर्ण करावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रामध्येच परीक्षा केन्द्र उपलब्ध होईल यादृष्टीने केन्द्रस्तरावर शासनाने पाठपुरावा करावा. काही विद्यार्थ्यांना पोर्टब्लेअर येथे परीक्षा केन्द्र आलेले आहे. तेव्हा याप्रकरणी शासनाने योग्य ती कार्यवाही करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये महाराष्ट्रातील तमाम धनगर समाजाच्या लोकांचे श्री बिरोबा देवस्थान आहे. या देवस्थानाला "क" वर्गाचा दर्जा देण्यात आलेला आहे. आतापर्यन्त या देवस्थानाकडे महाराष्ट्र शासनाने ढुंकून सुध्दा पाहिलेले नाही. या देवस्थानाची यात्रा सुरु आहे. 5 लाख भाविक दर्शनासाठी येतात. याठिकाणी ग्रामविकास व पर्यटन विभागाचे मंत्री महोदय श्री. विजयसिंह मोहिते-पाटील उपस्थित आहेत. मी अशी मागणी करतो की या देवस्थानाला "अ" वर्ग दर्जा द्यावा. तसेच 2 कोटीचा निधी देऊन विकास आराखडा मंजूर करावा. राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे उद्या यात्रेच्या निमित्ताने त्या देवस्थानाच्या दर्शनासाठी जाणार आहेत. तेव्हा ही मागणी पूर्ण करावी अशी मी महाराष्ट्रातील तमाम धनगर समाजाच्यावतीने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील (ग्रामविकास व पर्यटन राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्यांनी "क" वर्ग देवस्थानाच्या बाबतीत येथे मुद्दा मांडलेला आहे. यासंदर्भातील कामे डीपीडीसी अंतर्गत होतात. त्याबाबतीत जिल्हाधिका-यांना मी सूचना देतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्यचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, आज महाराष्ट्रातील अनेक शहरे विशेषत: मुंबई ही मॉलसिटी झालेली आहे. मुंबईमध्ये 15-16 ठिकाणी हे मॉल्स आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे माजी प्रधान सचिव श्री मिराणी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. या मॉल्सच्या संदर्भात मॉल्सची रचना कशी असावी, आतील वातानुकुलित यंत्रणा कशी असावी, सिनेमागृह, हॉटेल कोठे असावे, एन्ट्रन्स आणि एक्झिट कोठे असावे यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. असे असताना या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करुन हे मॉल्स बांधलेले आहेत. सिनेमागृह नियमानुसार तळाला असले पाहिजे. दिल्लीला एका मॉलला आग लागल्यानंतर अशा प्रकारे मार्गदर्शक तत्वानुसार मॉल्स बांधण्यास

...3..



(डॉ. दीपक सावंत....)

सांगण्यात आले. राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर या ठिकाणचे मॉल्स कशा पध्दतीने बांधलेले आहेत याची चौकशी करणे आवश्यक आहे. तेव्हा अशा प्रकारे तातडीने चौकशी करुन ज्यांनी ज्यांनी मागदर्शक तत्वांचे, नियमांचे उल्लंघन करुन मॉल्स बांधलेले आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याची गांभीर्याने नोंद घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. सुरेश जेथलिया : सभाभती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करतो.

सभापती महोदय, जालना जिल्हयातील मु.सेवली येथे दिनांक 3.4.2008 रोजी एका पानटपरीवर "बनायेंगे मंदिर" या गाण्यामुळे चिडून जाऊन तेथील काही धर्मांध लोकांनी घडविलेली दंगल, दंगलीत लाखो रुपयांचे झालेले नुकसान, त्यामध्ये ठराविक धर्माच्या लोकांनी केलेली मारहाण, त्यामध्ये जवळजवळ 10 ते 12 व्यक्ती जखमी होणे, त्यातील काहींना रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभागात दाखल करावे लागणे, या घटनेबाबत संबंधित पोलीस स्थानकात फोन करुनही तेथील वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी केलेली दिरंगाई, उपलब्ध दंगल करणा-या समाजातील लोकांना पाठीशी घालणे, त्यामुळे तेथील जनतेत पोलिसांबद्दल निर्माण झालेला असंतोष, याबाबत संबंधितांवर तातडीने करावयाची कारवाई करुन त्यासंबंधी शासनाने तात्काळ निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, गोंदिया जिल्हयातील अर्जुनी/मोरगाव तालुका अंतर्गत येणा-या सिरेगावबांध व गुडरी येथील अनेक शेतकऱ्यांनी विविध बँका, वित्त संस्था व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमधूनशेती व्यवसायाकरिता कर्ज घेणे, सदर कर्जाची परतफेड करण्यासाठी आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या अंगावरील दागीने सावकारांकडे गहाण ठेऊन दरवर्षी त्या शेतकऱ्यांनी नवीन कर्ज घेणे, त्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे सावकारांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, त्यामुळे शेतकऱ्यांची सावकारांकडून होणारी पिळवणूक आणि कर्ज माफीसंबंधी शासनाकडे वारंवार निवदनातून केलेली विनंती, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे सदर शेतकऱ्यांवर आलेली उपासमार आणि आत्महत्येची वेळ, त्यामुळे सिरेगांवबांध आणि गुडरी येथील शेतकऱ्यांनी

2...

श्री. केशवराव मानकर...

शासनाकडे त्यांच्या कुटुंबासह आत्महत्या करण्याची परवानगी मिळण्यासाठी केलेले निवेदन, शेतकऱ्यांच्या या महत्वाच्या विषयाकडे शासनाने सहानुभूतीपूर्वक लक्ष देऊन, कर्जमाफ करुन शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याची आवश्यकता.

सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो आज सभागृहात औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित केला आहे. याबाबतीत शासनाने सत्वर कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो.

सभापती महोदय, सिधुदूर्ग जिल्हयातील प्रसिध्द "मालवण किल्ला", या किल्ल्यावर पंचधातुचा झेंडा लावण्यात आला होता. परंतु काही कालावधीनंतर सदर ठिकाणचा झेंडा वा-याच्या मा-यामुळे पडला. सदरहू झेंडा त्या ठिकाणी पुन्हा उभारला जावा यासंबंधी संबंधितांकडे वारंवार मागणी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही. मागील अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला असता संबंधित मंत्र्यांनी सदरहू झेंडा पुन्हा उभा करण्याची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. परंतु त्या आश्वासनाची अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्या ठिकाणी नवीन भगवा झेंडा उभारुन त्या भगव्या झेंडयाचा सन्मान कायम रहावा आणि त्याची प्रतिष्ठा देखील तशीच रहावी म्हणून सदरहू झेंडयासाठी लागणा-या खर्चाची माननीय मंत्री महोदयांनी तरतूद करावी आणि तेथे लवकरात लवकर सन्मानपूर्वक झेंडा उभारला जावा अशा प्रकारची विनंती करतो.

--------------

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय,मेरा औचित्य का मुद्दा है. इकरा प्राइमरी उर्दू स्कूल, इस्लामपुर, जिला बीड में सय्यद हमीदुद्दीन सय्यद पाशा की सन् 2003 में शिक्षक के पद पर नियुक्ति की गई. सन् 2006 में ये परमानेंट हो गए, लेकिन उसके बाद में इस्तीफे के ऊपर उनके नकली सिगनेचर करके मेनेजमेंट ने उस शिक्षक को बडतर्फ करने का काम किया है. शिक्षक ने बाद में इस बारे में लिखकर शिकायत दी है. दिनांक 30.01.2008 को माननीय शिक्षण राज्य मंत्री के सामने इसकी सुनवाई हुई. शिक्षक के नकली सिगनेचर करके गलती से उसको निकालने का काम जिला परिषद से हुआ है. इसमें एज्यूकेशन ऑफिसर और मेनेजमेंट की मिलीभगत है, इसलिए इनके ऊपर 420 का केस दाखिल करने की आवश्यकता है. इस शिक्षक के ऊपर अन्याय हुआ है, इसलिए इसको जिला परिषद में समायोजन करने की अत्यन्त जरुरत है. यह बात मै औचित्य के मुद्दे के द्वारा आपके सामने रखना चाहती हूॅं.

सभापति महोदय, आपकी अनुमति से मैं एक और औचित्य का मुद्दा उठाना चाहती हूँ. महाराष्ट्र में मेडीकल के पोस्ट ग्रेजुएट कोर्स की 250 सीट कम कर दी गई हैं, जिसकी वजह से पोस्ट ग्रेजुएट में एडमीशन के लिए आज शुरु होने वाले इन्टरव्यू देने वाले विद्यार्थियों पर बहुत बड़ा अन्याय होने की शक्यता है. इस बारे में सरकार की तरफ से फौरन निर्णय लेना चाहिए कि जो सीट कम कर दी गई हैं, वे बहाल की जाएं. आज डॉक्टर्स की जरुरत है. 2 लाख डॉक्टर्स पूरे देश में कम हैं, इसलिए प्लानिंग कमीशन इस बारे में विचार कर रहा है. ये 250 सीट कम नहीं होनी चाहिए, ऐसी मांग मैं महाराष्ट्र शासन से इस औचित्य के मुद्दे के द्वारा करना चाहती हूँ.

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे. ठाणे येथील भाडेकरु रहात असलेल्या अधिकृत धोकादायक इमारतींचे चटईक्षेत्र निर्देशांक 2 वरुन 1.5 वर आणला असल्यामुळे ठाणे शहर आणि परिसरातील जनतेमध्ये खळबळ उडालेली आहे.सदर निर्देशांक वाढविण्याची स्थानिक जनतेची मागणी ठाणे महानगरपालिकेने सरकारकडे केली होती परंतु सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अधिकृत धोकादायक इमारतींची पुनर्रचना करणे, उपलब्ध असलेल्या चटईनिर्देशांकामध्ये



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त ...

व्यावसायिकांसाठी व्यवहार्य ठरत नसल्यामुळे या इमारतीची पुर्नबांधणी रखडली आहे. तसेच जुन्या इमारतीमधील घरे लहान असल्यामुळे आणि मालच माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या शासन धोरणाप्रमाणे किमान 350 चौ.फूट इतक्या क्षेत्रफळाची घरे नव्याने बांधून देण्यासाठी दोन चटईक्षेत्र निर्देशांकाची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेप्रमाणेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि ठाणे जिल्हयातील इतर महानगपालिकांमध्ये सुध्दा अधिकृत धोकादायक इमारतींची पुर्नबांधणी करण्यासाठी दोन चटईक्षेत्र मिळण्याबाबतची मागणी केलेली आहे. याबाबतीत जनतेच्या तीव्र भावना लक्षात घेऊन राज्य शासनाने पूर्ण विचार करुन किमान दोन चटईक्षेत्र देण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी याबाबतीत खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : यासंदर्भात समिती नेमली आहे. खुलासा करण्याची आवश्यकता नाही.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सभापतींनी मगाशी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर हे औचित्याचा मुद्दा मांडत असताना असे सांगितले की, तुम्ही माझ्याकडे दिलेला औचित्याच्या मुद्दा मांडत नसून दुसरा औचित्याचा मुद्दा मांडत आहात. औचित्याचे मुद्दे माननीय सभापतींकडे जातात. ते नजरेखालून घालतात आणि नंतर त्याला मान्यता देतात. ज्या प्रश्नावर सदनामध्ये 50 मिनिटे चर्चा या प्रश्नावर न्याय देण्याकरिता चर्चा झालेली आहे. हा औचित्याचा मुद्दा स्वीकारलाच कसा हा माझा मुद्दा आहे. या प्रश्नावर सदनामध्ये 50 मिनिटे साधक-बाधक चर्चा झाली. आपण स्वत: आसनावर होता. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी काय प्रश्न मांडला यावर माझी हरकत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, एकाच विषयावर वेगवेगळया माध्यमातून चर्चा होऊ शकते. जे.जे.हॉस्पीटलबद्दल सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी चर्चा केली. आज प्रश्नाच्या रुपाने झाली.

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपल्या परवानगीने अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्दा श्री. अरुप पटनाईक यांच्यासंबंधात मी उपस्थित करीत आहे. चतुर्वेदी बिल्डरच्या केसमध्ये चर्चा झालेली असताना माननीय गृहमंत्र्यांनी सदनात सांगितले होते की, सीआयडी चौकशी करण्यात येईल आणि त्याप्रमाणे त्याबाबतीत निर्णय घेऊ. माझ्याकडे सीआयडी चौकशीचा रिपोर्ट प्राप्त झाला आहे. ही माहिती मी मिळविली आहे. त्यातील काही महत्वाचे मुद्दे मी याठिकाणी वाचून दाखवीत आहे. याबाबतीत त्वरित कारवाई करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. कानडे ..... 12:35

श्री. मधुकर चव्हाण .......

दि. 28.2 ला वरिष्ठांच्या आदेशानुसार बिपीन बिहारी आणि अरुप पटनाईक यांना गुन्ह्याबाबत सविस्तर माहिती दिलेली नसतांना अरुप पटनाईक यांनी बिपीन बिहारी यांना सूचना देऊन स्वत: आरोपीकडे विचारपूस करावी, असे सांगितले. बिपीन बिहारी यांच्या स्टेटमेंटवरुन दि. 4 मार्चरोजी जुहू पोलीस स्टेशनच्या भेटीच्या वेळी श्री. अरुप पटनाईक यांनी मोक्का कायदा अंतर्गत कारवाई करता येईल काय अशा सूचना दिल्या. 6 मार्च रोजी मोक्का कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव अरुप पटनाईक यांच्या भेटीनंतर करण्यात सादर करण्यात आला. लक्ष्मीकांत शेहा यांनी संशय व्यक्त न करता अटक कशी करता येईल? चतुर्वेदी यांना घाईघाईने अटक करण्याबाबत दबाव होता असे निष्पन्न होते. केस खोटी होती याबाबत अरुप पटनाईक यांना ज्ञात होते का असा कोणताही निष्कर्ष निघत नसला तरी दि. 28 फेब्रुवारी रोजी तपासाबाबत देखरेख व पाठपुरावा केला असे दिसून येते. यापुढील विषय अत्यंत महत्वाचा आहे. अरुप पटनाईक यांना गुन्हयाची माहिती नव्हती असे गृहित धरले तर त्यांचे आदेश बेकायदेशीर आहेत असे स्पष्ट होते. बिपीन बिहारी यांनी मोक्का कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव मंजूर करावा. दि. 14 मार्च रोजी आवटे यांना असे सांगितले की, चार्जशीट दाखल करण्यापूर्वी पाहून घ्यावे. यावरुन अरुप पटनाईक यांनी मोक्काअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात रस दाखविला असे स्पष्ट होते. डी.सी.पी. चौबे यांच्या स्टेटमेंटनुसार अरुप पटनाईक यांनी बिपीन बिहारी यांना, चतुर्वेदींना नियोजनपूर्वक अटक करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर विविध भागात जाऊन अटक करण्यात आल्या. माझे असे म्हणणे आहे की, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, याप्रकरणाची सीआयडी चौकशी झाल्यानंतर अरुप पटनाईक यांच्यामध्ये दोष आहे असे आढळले तर कारवाई करण्यात येईल. परंतु आता सीआयडीचा हा रिपोर्ट शासनाला सादर करण्यात आला आहे. या 13 अधिकाऱ्यांना शासनाने निलंबित केले. याप्रकरणी शासनाने जो निर्णय घेतला तो योग्य आहे परंतु अशा तऱ्हेने हे सर्व घडवून आणले आणि पोलीस खात्याला कलंक लावला. म्हणून सीआयडीच्या रिपोर्टप्रमाणे त्वरित कारवाई होणे आवश्यक आहे, अशी माझी सूचना आहे. यासंदर्भात माननीय गृह राज्यमंत्र्यांनी सभागृहाला काही तरी आश्वासन द्यावे.

श्री. विनोद तावडे : माननीय गृह राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण: निदान माननीय मंत्री महोदयांनी यासंदर्भात लक्ष ठेवू, विचार करु, असे काही तरी सांगावे. कारण मी सीआयडीच्या रिपोर्टसंबंधीची माहिती आपल्याला दिली आहे.

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, कृपया त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी हाच प्रश्न तीन वेळा यापूर्वी सभागृहात उपस्थित केला होता. आज सुध्दा औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने पुन्हा उपस्थित करणार आहे की, "गांधीनगर कामगार कल्याण केंद्र, वांद्रे (पूर्व)" येथील इमारतींविषयी विषय यापूर्वी सुध्दा अनेक वेळा मांडला होता. परंतु शासनाचे कामगार खाते इतके जागरुक आहे की, त्यांनी त्या पत्राला साधे उत्तर देण्याचेही सौजन्य दाखविले नाही. मी अपेक्षा करीत होतो की, आज ना उद्या उत्तर येईल, परंतु आजपर्यंत त्यांचे कोणतेही उत्तर मला आले नाही. म्हणून अतिशय नाईलाजाने औचित्याच्या माध्यमातून हा विषय पुन्हा मांडावा लागत आहे. आपण विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात मुद्दा उपस्थित करतो त्यावेळी त्याचे उत्तर एक महिन्याच्या आत दिले पाहिजे असा नियम आहे. माझी अपेक्षा अशी आहे की, शासनाकडून तसेच पीठासीन अधिकाऱ्याकडून एकदा विशेष उल्लेख विभागाकडे पाठविण्यात आल्यनंतर एका महिन्यात त्याचे उत्तर पाठविणे अपेक्षित असते. तीन वर्षाच्या काळात एकही उत्तर मला आले नाही. म्हणून आता निदान याबाबतीत तरी औचित्य शासनाने दाखवावे. तसे नसेल तर आम्ही मान्य करु की औचित्य आणि विशेष उल्लेख या दोन्ही आयुधांचा काहीच उपयोग नाही, सन्माननीय सदस्यांनी ही आयुधे वापरु नयेत कारण ती इफेक्टीव्हलेस झालेली आयुधे आहेत असाच त्याचा अर्थ निघेल. म्हणून आपण यासंदर्भात संबंधितांना सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. भोगले.... 12:40

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, कृपया त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी प्रवर्गासाठी 27 टक्के आरक्षण लागू करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा निर्णय दिला तसेच योगायोगाने आज महात्मा फुले यांची देखील जयंती आहे. मी माननीय सर्वोच्च न्यायालयाचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर राज्यशासनाला अशी विनंती करतो की, जो निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे तो उपेक्षित ओबीसी समाजासाठी लवकरात लवकर लागू करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती अंमलबजावणी करावी, अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, कृपया त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. कपिल पाटील : महोदय, अत्यंत गंभीर अशा मानवी हक्काच्या प्रश्नाकडे औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. नागपूरच्या जेलमध्ये नक्षलवादाच्या चुकीच्या आरोपाखाली वर्षभर अटकेत असलेले 13 कार्यकर्ते आहेत. हे 13 कार्यकर्ते गेल्या पाच दिवसांपासून जेलमध्येच बेमुदत उपोषणाला बसलेले आहेत. त्यांची प्रकृती बिकट होत चालली आहे. वास्तविक या कार्यकर्त्यांचा नक्षलवादाशी काडीचाही संबंध नाही असे ते ओरडून सांगत आहेत परंतु गेल्या वर्षभरात त्यांची केसही न्यायालयापुढे उभी राहिलेली नाही. शासनाने त्यांची उपेक्षा थांबविण्यासाठी त्यांची निर्दोष मुक्तता करणे आवश्यक आहे व तातडीने यासंबंधीची पावले उचलण्याची गरज आहे. कारण उद्या आणि परवा सुट्टीचा दिवस आहे. हे कार्यकर्ते तरुण, गरीब व दलित समाजातील असून त्यात कोणी कवी, साहित्यिक तसेच बहुजन समाजातील आहेत. या सर्व कार्यकर्त्यांची शासनाने दखल घेऊन त्यांच्या न्याय्य मागणीकडे लक्ष द्यावे व त्यांनी जेलमध्ये खितपत पडण्याऐवजी त्यांची मुक्तता करावी, अशी कळकळीची विनंती आहे. यासंदर्भात मी नागपूर अधिवेशनात सुध्दा प्रश्न उपस्थित केला होता व त्यासंबंधी सातत्याने पाठपुरावा करीत आहे पण अद्यापही याबाबत दखल घेण्यात आली नाही. माणसे मेल्यानंतर त्याची दखल शासन घेणार काय असा माझा प्रश्न आहे. सभागृहात माननीय गृह राज्यमंत्री सुध्दा उपस्थित आहेत. याबाबत त्यांनी काहीतरी सांगावे अशी माझी विनंती आहे.

.....2

**उपसभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी यासंबंधी लक्ष घालावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे.

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, कृपया त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : महोदय, सर्वात महत्वाच्या विषयावर औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. राज्यात हजारो, लाखो विद्यार्थी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. या सर्व शाळांमध्ये मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयांबरोबरच इतरही विषय शिकविले जातात. आज खेळासारख्या विषयाला या राज्यामध्ये अतिशय महत्व आहे. क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंवर हजारो, करोडो रुपये राज्यात खर्च केले जातात परंतु हा विषय विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी, त्या शाळांमध्ये शारिरीक शिक्षकांची नेमणूक होत नाही. म्हणून माझी अशी मागणी आहे की, या सर्व पाचवी ते दहावीपर्यंतच्या खाजगी व शासकीय शाळांमधून क्रीडा हा विषय शिकविण्यासाठी अशा शाळांमध्ये शारिरीक शिक्षकाची भविष्यात तातडीने नेमणूक करणे आवश्यक आहे. प्राथमिक शाळांमध्ये किमान शारिरीक शिक्षक असावेत यासाठी जे बीपीएड झालेले पदवीधर आहेत त्यांनाही न्याय मिळणार आहे. म्हणून त्यांची नेमणूक करण्याच्या बाबतीत शासनाने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये केंद्रानुसार 225 चौ. फुटाची जागा एसआरएला देण्याएवेजी 360 चौफ. फुट जागा देण्यात येईल अशी काल माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात जाहीर केले व यासंदर्भातील सर्व माहिती आजच्या वर्तमानपत्रात आलेली आहे त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो, स्वागत करतो. परंतु यासंदर्भात मुंबईमध्ये दोन दिवसापासून गोंधळाचे वातावरण निर्माण झ ालेले आहे. एसआरए योजनेत 225 झोपडपट्टी धारकांना जागा मिळणार आहे त्यासर्वांनी सकाळपासून स्टे मागावयास सुरुवात केलेली आहे की, आमचे सर्व थांबवा आणि आम्हाला सुध्दा 360 चौ. फुटाची सदनिका द्या. परंतु काल माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातून सायंकाळी प्रेसला फोन गेले की, 360 नाही तर 360 चौ.फुट बिल्टअप, सुपर बिल्टअप असे म्हटले गेले असून 270 चौ. फुट कार्पेटच जागा समजण्यात यावी. त्यामुळे सभापती महोदय, मुंबईमध्ये गोधळ सदृष्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाच्या सर्वंकष गृहनिर्माण धोरण अजून जाहीर झालेले नाही त्यामुळे पिसमिल धोरण जाहीर करुन गोंधळ निर्माण करणे योग्य नाही त्यामुळे माझी अशी मागणी आहे की, येत्या 2-3 दिवसात सभागृहात यासंदर्भातील सर्वंकष धोरण जाहीर करावे अशी विनंती आहे. तसेच माझी दुसरी मागणी अशी आहे की, जे लोक झोपडपट्टीत बेकायदेशीर राहिले अशा लोकांनी सर्व नागरी सुविधा मोफत घेतल्या आणि चाळीतील लोकांना आपण 225 चौ. फुटाची सदनिका देणार आहात त्यामुळे त्यांना 360 चौ.फुटाची जागा न देता 400 चौ. फुटाची जागा देऊन जुन्या चाळीतील लोकांचे पुनर्वसन करतांना देण्यात यावी आणि धोरणात स्पष्टता यावी असा मी औचित्याच्या मुद्याद्वारे विचार मांडलेला आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई महानगरपालिकेने खाऊ वाटपाचे टेंडर काढलेले आहे. दोन दिवसामध्ये हे टेंडर ओपन होणार आहे. महिला बचत गट आणि सेवाभावी संस्था यांच्याकडून हे काम करुन घेणे अपेक्षित आहे. यासंदर्भात मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या संस्थांनी किंवा गटांनी महानगरपालिकेला जो करार करुन द्यावयाचा आहे त्यासंदर्भातील संपूर्ण प्रोफार्मा इंग्रजीतून काढण्यात आलेले आहे. मराठी भाषा बोलणा-यांची सत्ता मुंबई महानगरपालिकेत आहे. त्यामुळे या औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, करार पत्र हे मराठीत असावे, टेंडर ओपन करण्याची तारीख 8 दिवसानी वाढवून द्यावी, महिला बचतगटांना करार मराठीतून करण्याची संधी द्यावी व यासंदर्भात ताबडतोबीने अंमलबजावणी करावी ही विनंती.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी गिरणी कामगारांच्या मुलांना नोक-यांमध्ये 75 टक्के आरक्षण घोषित केलेले आहे. नंतर माननीय राज्यमंत्र्यांनी गिरणी कामगारांच्या मुलांना 75 टक्के प्रशिक्षण केद्रांत आरक्षण दिले आहे असे सांगितले. गिरणी कामगारांच्या मुलांना नोक-यांमध्ये 75 टक्के आरक्षण की, प्रशिक्षण केंद्रात 75 टक्के आरक्षण यासंदर्भात खुलासा होण्याची आवश्यकता आहे. काल माननीय मंत्रीमहोदयांनी मिडीया समोर गिरणी कामगारांच्या मुलांना प्रशिक्षण केंद्रात 75 आरक्षण दिले जाईल असे म्हटले आहे त्यामुळे यासंदर्भात क्लॅरिटी आणण्याची आवश्यकता आहे यासाठीच मी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

**उपसभापती** : माननीय मुख्यमंत्री सभागृहात येताचक्षणी त्यांच्याकडून माहिती घेऊ.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, या ठिकाणी माननीय श्री. सुधाकर गणगणे साहेबांनी उल्लेख केल्या प्रमाणे आज महात्मा फुले यांची जयंती आहे. आपण विधानमंडळाच्या प्रवेशद्वारावर तसबीर ठेवून पुजण करीत असतो. मी विधानमंडळात

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

आल्यानंतर यासंदर्भात चौकशी केली परंतु आज प्रवेश द्वाराजवळ महात्मा फुलेंची प्रतिमा ठेवलेली मला दिसली नाही.

**उपसभापती** : महात्मा फुले यांच्या पुतळयाजवळ सदर कार्यक्रम पार पडलेला आहे.

श्री. विनोद तावडे : पुतळयाला पुष्पहार घातल्यानंतर विधानमंडळाच्या प्रवेशद्वाराजवळ तसबीर ठेवली जाते तशी ती ठेवली पाहिजे असे माझे मत आहे.

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. कृपया त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. गेल्या दोन तीन वर्षांपासून मुंबईतील नामांकित बिल्डर श्री. हिरानंदानी या विकासकाने त्यांच्याकडे काम करणऱ्या कर्मचाऱ्यांनी भरलेली प्रॉव्हिडंड फंडाची जवळपास 168 कोटी एवढी रक्कम चुकविल्यामुळे सी.बी.आय. ने विविध प्रकल्पांच्या कार्यालयात छापे मारल्याची माहिती आम्हाला वर्तमानपत्रातून वाचावयास मिळाली. श्री. हिरानंदानी हे महाराष्ट्रातील असून त्यांच्याकडे काम करणारे कर्मचारी सुध्दा महाराष्ट्रातीलच रहिवासी आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 12.50

श्री.पांडुरंग फुंडकर...

या कामगारांचें प्रॉव्हीडंड फंडाचे 168 कोटी रुपये त्यांनी बुडविले आहेत . एखाद्या सहकारी संस्थेने जर प्रॉव्हीडंड फंडाचे पैसे बुडवले असते तर त्यांना जेलमध्ये टाकण्याची कारवाई केली गेली असते. या बिल्डरने 168 कोटी रुपयांचा प्रॉव्हीडंड फंड बुडविलेला आहे. तेव्हा या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहासमोर आली पाहिजे. हे सर्व कामगार महाराष्ट्रातील असून महाराष्ट्रातील किती कामगारांचे 168 कोटी रुपये बुडविण्यात आले आहेत याची माहिती सभागृह सुरु असतांना आम्हाला मिळाली पाहिजे. तेव्हा या बाबतीत माननीय कामगार मंत्र्यांना आपण सूचना द्यावी अशी मी विनंती करीत आहे.

**उपसभापती** : पुढच्या आठवडयात शासनाने निवेदन करावे.

श्री.अरविंद सावंत :सभापती महोदय,हिरानंदनी बिल्डरच्या संदर्भात लक्षवेधी सूचना देण्यात आली होती ती सुध्दा स्वीकारण्यात आलेली नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे त्याबाबत आपण शासनाला सूचना करावी.

**उपसभापती** : मघाशी मी सागितले आहे की त्या बाबतीत शासनाने पुढील आठवडयात निवेदन करावे.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागतात )

श्री.दिवाकर रावते : माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**उपसभापती** : यानंतर नियमित कामकाज सुरु करावे असे मला वाटते. अनेक सन्माननीय सदस्याना औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे तेव्हा आता फक्त सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करावा इतर सन्माननीय सदस्यांनी तो उपस्थित करु नये.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे या सभागृहात गाडयांच्या मराठी नंबर प्लेटस संबंधी लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली होती . त्यावेळी उत्तर देत असतांना माननीय गृह मंत्र्यांनी जे सांगितले होते त्यामुळे त्याचे खरोखर मुंबईमध्ये कौतुक झाले होते . त्याबाबतीत अनेकजणांनी फोन करुन आम्हाला कळविले होते. माननीय गृह मंत्र्यांचे महत्वाचे शब्द जास्त लोकांपर्यन्त पोहोचले. " बसणारा मराठी, वाचणारा मराठी आणि पोलीसही मराठी आहेत." असे शब्द त्यांनी वापरले होते ते लोकांना भावले त्यामुळे आम्हालासुध्दा खूप आनंद झाला होता . मी असे म्हणालो की," येथे माननीय मंत्री महोदयांना जाहीररीत्या सांगता येणार नाही." त्यावेळी माननीय गृह मंत्र्यांनी असे सांगितले की," याबाबतीत केन्द्र सरकारला कळविण्यात येईल आणि बदल करण्याचा प्रयत्न करीन " या गोष्टीला आपली तत्वत: मान्यता आहे असेही आपण सांगितले आहे. त्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, माझी गाडी सिध्दीविनायका जवळ अडविल्यानंतर मी ट्राफिक हवालदाराला विचारले की, "गाडीवर बॅज लावलेला आहे तुला प्रोटोकॉल माहीत नाही काय ?".तेव्हा त्यांनी मला असे सांगितले की," आम्हाला साहेबांनी असे सागितले होते की आमदार असतील तर त्यांना प्रथम अडवा" त्यावेळी मी स्वत:गाडी चालवत होतो.मी त्याला असे म्हटले की , "गाडीची चावी घे आणि साहेबांकडे दे."

**उपसभापती** : आमदारांना प्रथम शिव्या घालाव्यात असे त्यांनी सांगितले नाही ना ?

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, पोलीस खात्याची कशी प्रवृत्ती आहे हे मी आपल्याला सांगत आहे. पोलीस खात्याची मानसिकता कशी आहे याचे हे द्योतक आहे. सभापती महोदय, काल गृह मंत्र्यांनी जाहीर केल्यानंतर माझी गाडी अडविण्यात आली होती तेव्हा गाडी अडविणाऱ्यांना सांगण्यात आले होते की, " श्री. रावते यांची ही गाडी आहे आणि आबांनी असे असे जाहीर केलेले आहे ". एस.व्ही. रोड, बोरिवली येथे गाडी अडविण्यात आली होती. श्री.अरुण राक्षे नावाच्या पी.एस.आय.ने गाडी अडवली असून त्यांनी 100 रुपयांची पावती फाडली आहे .त्यावेळी त्यांनी माझ्या ड्रायव्हरला असे सांगितले की, "ही पावती घेऊन जा आणि आबांना सांगा की पोलिसांना लेखी कळवावयाचे असते." मला असे सांगावयाचे आहे की, यापध्दतीने लोकांमध्ये अत्यंत वाईट पध्दतीचा संदेश जात आहेत. विधि मंडळामध्ये माननीय मंत्रीमहोदयांनी काही सांगितले असेल तर त्याबाबतीत कायदा जरी झालेला नसला तरी त्याचे पालन करण्यासंबंधी


VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 12.50

श्री.दिवाकर रावते ...........

अधिका-यांना संदेश मिळाला पाहिजे. मी हा मुद्दा मांडला नसता परंतु या ठिकाणी माननीय गृह मंत्री उपस्थित आहेत म्हणून मी हा मुद्दा मांडला आहे. या ठिकाणी आपण राजकीय विरोध करु परंतु आपण महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आहात, 10 कोटी जनतेचे आपण गृहमंत्री आहात. अशा प्रकारे जर बाहेर टिप्पणी केली जात असेल तर ती व्यथित करणारी आहे म्हणून मी ओचित्याचा मुद्दा मांडला आहे. त्याच्यावर कारवाई करावी असे मी म्हणणार नाही कारण कायद्याप्रमाणे त्यांचेबरोबर आहे याबाबतीत .जो काही संदेश पाठवावयाचा असेल तो आपण पाठवावा अन्यथा ठीक ठिकाणी असाच प्रकार चालू राहिला तर ते अयोग्य आहे. संपूर्ण राज्य आपला आदर करते त्यामुळे जो काही प्रकार घडला आहे तो बरोबर वाटत नाही.

नंतर श्री.सुंबरें

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 12:श्री.

आर.आर.पाटील : सेंट्रल व्हेइकल ॲक्ट हा केंद्र सरकारचा आहे आणि जोपर्यंत त्या कायद्यात बदल होत नाही, अधिसूचना काढून आपण आपल्या सगळ्या कर्मचाऱ्यांना लेखी कळवित नाही तोपर्यंत अस्तित्वात असलेल्या कायद्याचे पालन करणे हे पोलिसांचे कर्तव्यच आहे. त्यामुळे एखाद्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्याकडून काही दंड वसूल केला असेल तर ते चुकीचे आहे असे मी म्हणणार नाही. परंतु अशी परिस्थिती पुन्हा येऊ नये म्हणून येत्या सोमवारीच राज्य सरकारची विनंती केंद्र सरकारला कळविण्यात येईल आणि केंद्र सरकारकडे त्याबाबत पाठपुरावा केला जाईल. कारण शेवटी केंद्र सरकारच्या कायद्याला कोठेही बाधा आणण्याची भूमिका आपण घेत नाही, घेऊ नये. शेवटी एका राज्यातील गाडी दुसऱ्या राज्यात गेल्यानंतर तेथील लोकांना, पोलिसांना त्या गाडीचा क्रमांक समजला पाहिजे. आपण आपल्याकडे मराठीतून नंबर लिहिलेला असेल आणि ती गाडी कर्नाटकामध्ये वा अन्य दुसऱ्या राज्यात गेल्यावर किंवा आंध्र प्रदेशातील गाडी आपल्या राज्यात आल्यावर त्यावरील त्यांच्या भाषेतील नंबर असल्यास तो आपल्या लोकांना समजणार नाही. म्हणूनच यासाठी एकच भाषा सर्व देशभर स्विकारलेली आहे. परंतु ज्या गाड्या महाराष्ट्र राज्य सोडून बाहेर जाणारच नाहीत , अशा काही गाड्या आहेत की त्या शहराबाहेर नेण्यासाठी देखील वेगळे परमिट लागते, त्याशिवाय त्या शहराबाहेर देखील जाऊ शकत नाहीत. तर अशा गाड्यांवर मध्यवर्ती नंबर प्लेट ही मराठीतून आणि आणि गाडीच्या साईडला इंग्रजीतून नंबर लिहिला गेल्यास कोणाची हरकत नसावी ही भूमिका आहे. राज्य सरकार आपल्या या भूमिकेशी सहमत आहे, सुसंगत आहे. म्हणूनच मी आपल्याला सांगू इच्छितो की, जरूर आपण केंद्र सरकारला तशा प्रकारची विनंती करू. मात्र जोपर्यंत केंद्र सरकारकडून त्यात बदल करून येत नाही तोपर्यंत असलेल्या देशस्तरावरील कायद्याचा आपण सर्वांनीच सन्मान राखू या. मात्र या बाबतीत आम्ही केंद्राला कळवून लवकरात लवकर हे होण्यासाठी केंद्राकडे त्याचा पाठपुरावा करून हा बदल घडवून आणू.

श्री. दिवाकर रावते :परंतु आपण एकदा येथे जाहीर केल्यानंतर पोलीस त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत त्याबद्दल माझे म्हणणे आहे. मला पोलिसांच्या बाबतीत एवढेच म्हणणे आहे की, या ठिकाणी मुलुंड येथे जेव्हा दारू पिऊन माणसे मेली तेव्हा माननीय गृहमंत्री असलेल्या माननीय आर.आर.पाटील यांनी येथे सांगितले होते की, महाराष्ट्रात यापुढे एकही हातभट्टी दिसणार नाही,

..... एक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

गावठी दारू दिसणार नाही. असे सांगितल्यानंतरही पोलीस या गोष्टीकडे दुर्लक्ष करतातच. तेव्हा तुमच्या भावनांचा आदर करून मी सांगतो की, गृहमंत्र्यांच्या भावनांचा आदर व्हावा आणि पोलिसांनी त्याकडे कसे पहावे हा विषय आहे. तेव्हा तसा संदेश आपण त्यांना द्यावा.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, मुंबईमध्ये मृत्यूकांड होण्यापूर्वी ज्याप्रमाणे पोलीस हातभट्ट्यांकडे दुर्लक्ष करीत होते, आता तसे ते करीत नाहीत. पण त्यावेळी जसे करीत होते तसे दुर्लक्ष करता येईल काय हे तपासून पाहून योग्य पद्धतीने सूचना देण्याचा प्रयत्न होईल..

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आता गृहमंत्री म्हणाले की, '.... पोलीस आता करीत नाहीत..' तर हा विनोदाचा भाग आहे एवढेच मला येथे सांगावयाचे आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी मघाशी औचित्याचा मुद्दा मांडत होतो तेव्हा माननीय गृह मंत्री सदनात उपस्थित नव्हते. पण आता ते येथे उपस्थित असल्याने मला त्यांच्या उपस्थित पुन्हा माझा मुद्दा सांगण्याची आपण परवानगी द्यावी. त्यांना हा विषय माहिती आहे. सभापती महोदय, नागपूरच्या जेलमध्ये नक्षलवादी चळवळीतील असल्याच्या खोट्या आरोपाखाली 13 मुलांना अटकेत ठेवले आहे आणि आता ती मुले तेथे उपोषणाला बसली आहेत. त्यांची त्वरित सुटका करणे आवश्यक आहे. सांगलीमध्ये आणि इतरत्रही अशाच प्रकारे काही निरपराधांना खोट्या आरोपाखाली तुरूंगात डांबलेले आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा की, ज्या पद्धतीने नक्षलवादाच्या खोट्या आरोपाखाली चांगल्या सामाजिक कार्यकर्त्यांना तुरूंगात डांबण्याचा पोलीस प्रयत्न करीत आहेत, त्यांच्यावर दोषारोप करीत आहेत. त्यात आता श्रीमती मेधाताई पाटकर आणि डॉ.बाबा आढाव यांच्यासारख्या थोर विभूतींना देखील पोलिसांनी नक्षलवादी ठरविलेले आहे. इतकेच नाही तर अशा लोकांची पोलिसांनी एक यादीच केलेली आहे. त्यात डॉ.बाबा आढाव आणि श्रीमती मेधा पाटकर यांच्यासारख्या विभूती आहेत. माझे म्हणणे असे आहे की, या संदर्भात शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. अन्यथा उद्या पोलीस कोणालाही नक्षलवादी ठरवतील आणि उचलून आतमध्ये टाकतील. तेव्हा नागपूर जेलमधील या 13 मुलांबद्दल आणि या थोर विभूतींबद्दल शासनाची नेमकी भूमिका काय आहे ते येथे माननीय गृहमंत्र्यांनी सांगावी.

...... एक्स 3 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, जी 13 मुले पकडण्यात आलेली आहेत त्याबाबतीत स्वत: ॲडिशनल डी.जी. पातळीवरचा वरिष्ठ अधिकारी हे त्यांच्याबाबतीत काय पुरावा आढळला आहे, त्यांचा त्या चळवळीशी काय संबंध होता या सगळ्या गोष्टी तपासून पाहील आणि हा तपास एक आठवड्यामध्ये केला जाईल.

सभापती महोदय, दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा येथे उपस्थित केला आहे आणि त्यामुळे मी स्वत: देखील व्यथित झालो आहे. श्रीमती मेधाताई पाटकर, डॉ.बाबा आढाव, डॉ.भारत पाटणकर यांच्याबाबत येथे सांगण्यात आले. सभापती महोदय, पोलिसांनी एक यादी तयार केलेली आहे आणि नक्षलवादाला समर्थन करणाऱ्या ज्या फ्रंटल ऑर्गनायझेशन्स आहेत त्यात हे लोक सक्रीय आहेत अशा पद्धतीच्या बातम्या वर्तमानपत्रातून आल्या. या बातम्यांची सुरूवात आम्ही तपासली. विदर्भातून कोठे तरी एका छोट्याशा वृत्तपत्रातून पहिल्यांदा ही बातमी आली आणि काही वर्तमानपत्रांनी नंतर मोठमोठ्या बातम्या देण्यास सुरूवात केली. ही सगळी प्रसिद्ध असलेली व्यक्तिमत्त्वे असल्याने फार मोठ्या प्रमाणात वर्तमानपत्रातून या संबंधात बातम्या छापून आल्या. त्या संबंधात अग्रलेख आले. सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे तीन वेळा या राज्याच्या पोलीस महासंचालकांनी हे घोषित केले आहे की, अशा पद्धतीची कोणतीही यादी महाराष्ट्राच्या पोलिसांनी तयार केलेली नाही, प्रसिद्ध केलेली नाही तसेच या तिन्ही व्यक्तींचा नक्षलवाद्यांशी काडीमात्र संबंध नाही. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... वाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

या तिघांची नावे घोषित करण्यात आली आहेत, त्यांचा माझ्याशी अनेक वेळा संबंध आलेला आहे. मी विद्यार्थी दशेत असतांना माननीय डॉ. बाबा आढाव यांच्या सभेतील भाषणे मातीत बसून ऐकली आहेत. या नेत्याबद्दल माझ्या मनामध्ये नितांत आदर आहे. माननीय श्रीमती मेधाताई पाटकर यांनी शासनाच्या विरोधात अनेक आंदोलने केली आहेत. त्यांच्या प्रत्येक आंदोलनाच्या बाबतीत शासनाच्या वतीने मी त्यांच्याबरोबर गेलो आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणे दोन वर्षे नर्मदा खोऱ्याच्या डोंगर कपारीतून फिरलो आहे. हे केवळ माननीय श्रीमती मेधाताई पाटकर यांच्या आग्रहामुळे. या सभागृहाने एक गोष्ट लक्षाव ठेवणे आवश्यक आहे की, माझ्या मतदारसंघामध्ये विधानसभेची निवडणूक होती, त्यावेळी मी राज्यभर फिरत होतो. एकेदिवशी अचानकपणे मला पोलिसांनी सांगितले की, तुमच्या प्रचारासाठी माननीय श्रीमती मेधाताई पाटकर यांनी सभा ठेवली आहे. त्या सभेचे आयोजन करण्यासाठी मी माझ्या कार्यकर्त्यांना पाठविले. परंतु ताईंनी माझा स्पीकर घेतला नाही, माझा स्टेज घेतला नाही. माझ्यासाठी ताईंनी पुण्यातून कारने जाऊन त्याठिकाणी एक जाहीर सभा घेतली. इतका माझा त्यांच्याशी संबंध होता.

सभापती महोदय, भारत पाटणकर यांच्याबरोबर किमान 100 आंदोलने एकत्रितपणे केली आहेत. तेव्हा या तिन्ही नेत्यांबरोबर माझे संबंध आहेत. आयुष्यातील कित्येक दिवस, कित्येक आंदोलनांमध्ये मी त्यांच्याबरोबर काम केले आहे. हे नेते आज जे काम करीत आहेत ते नक्षलवाद्यांचे काम असेल, आणि त्यांना जर नक्षलवादी कुणी म्हणणार असेल तर महाराष्ट्रातील सर्वात मोठा नक्षलवादी मला म्हणावे लागेल. या महान विभूतींचा कोणत्याही नक्षलवाद्यांशी काडीमात्र संबंध नाही. एक समाजसुधारक म्हणून उपेक्षित लोकांसाठी काम करणारे हे व्यक्तिमत्व आहेत. वर्तमानपत्रामधून बातमी छापून आली असली तरी राज्यसरकारच्या पोलीस दलाने आणि जेल ॲथॉरिटीने अशी कोणतीही यादी तयार केलेली नाही. वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातमीमुळे त्यांच्या हितचिंतकांना आणि समर्थकांना जे दु:ख झले असेल त्याबद्दल राज्य सरकारच्या वतीने मी खेद व्यक्त करतो, दिलगिरी व्यक्त करतो. त्या यादीशी राज्य सरकारचा संबध नसतांना मुद्दाम दिलगिरी व्यक्त करतो. या तीन नेत्यांचा कोणत्याही चळवळीशी काडीमात्र संबंध नाही. याठिकाणी ज्या 13 मुलांबाबत माहिती सांगण्यात आली आहे, त्यासंबंधी प्राप्त झालेल्या पुराव्यांची ॲडिशनल डी.जी. एक आठवडयाच्या आत स्वत: तपासणी करतील. आणि नियमाप्रमाणे जी कारवाई करणे आवश्यक आहे ती करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, उपोषणाला बसलेल्या त्या 13 मुलांची प्रकृती चिंताजनक आहे....

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, पोलिसांनी याबाबत जो तपास केला आहे, त्यांना जे पुरावे मिळाले आहेत ते कोणत्या स्वरुपाचे आहेत? याकरिता जेल ॲथॉरिटीमार्फत आजच ॲडिशनल डी.जी. ना कळविण्यात येईल. तसेच, या मुलांचे उपोषण स्थगित करण्याबाबत ॲडिशनल डी.जी. ना कल्पना देण्यास जेल ॲथॉरिटीला सांगण्यात येईल. आणि तशापध्दतीच्या सूचना दिल्या जातील.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.**

**उपसभापती** : माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "आकृति निर्माण लि. या मुंबईतील कंपनीने गुडवली गांव अंधेरी (प) येथील जमीन विकास नियंत्रण नियमावलीतील नियम 33 (10) चे उल्लंघन करुन मिळविलेले असणे, विकासकाने शासनाकडून या जमिनीपोटी 232 कोटींचे कर्ज मिळवून नंतर कर्जबाजारी झाल्याचे सांगून शासनाकडून व्याजमाफी मिळविल्याने शासनाचा महसूल बुडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "चित्रपटाच्या अनधिकृत फिल्म, सीडी, डिव्हीडी इ. बनवून त्याची खुलेआम विक्री होत असल्याने भारतीय चित्रपट सृष्टीला दरवर्षी सुमारे 1 हजार कोटींचे नुकसान होणे, या धंद्यात संघटित गुन्हेगारांनी अनधिकृत पैसा गुंतविल्याचा सीआयएचा अहवाल मुंबई पोलिसांना प्राप्त होऊनही त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "ठाणे शहराच्या नियोजनात महापालिकेकडे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी निर्माण करण्याचे स्त्रोत नसणे, सन 2002 मध्ये शासनाने शाही धरण प्रकल्पास मंजूरी देऊनही अद्याप त्यावर कार्यवाही न होणे, त्यामुळे या धरणावरील बांधकामाचा खर्च वाढत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "रत्नागिरी जिल्हयात या वर्षीच्या उन्हाळयात भीषण पाणीटंचाई भेडसावत असल्याने रु.8.33 कोटी रुपयांचा आराखडा जिल्हाधिकारी यांच्याकडे मार्च, 2008 मध्ये सादर केलेला असणे, सदर आराखडयात प्रस्तावित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

उपसभापती...

आकडेवारी फुगवून दाखविल्याचे स्पष्ट करुन नव्याने कृती आराखडा सादर करण्यास सांगणे, सदर आराखडा जिल्हाधिकारी कार्यालयास अद्यापही सादर न केल्याने जिल्हयात निर्माण झालेली पाण्याची टंचाई" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "कोकणातील दशावतार, नाटक तसेच भजनी मंडळातील कलाकारांना मानधन देण्यात न येणे, केंद्र शासनाने मात्र दशावतार कलाकार व भजनी मंडळांना मानधन मंजूर करणे, या भेदभावामुळे त्यांच्यावर ओढवलेली उपासमारीची पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "राज्य शासनाने मेडिकल कॉन्सिलची मान्यता नाकारलेल्या जागा न भरण्याचा निर्णय घेतल्याने राज्यभरातल्या 200 जागा रद्द होण्याचा निर्माण झालेला धोका, परिणामी विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय".या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-----

पृ.शी. : द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी काढण्यात आलेली पीक विमा योजना

मु.शी. : द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी काढण्यात आलेली पीक विमा योजना याबाबत सर्वश्री पाशा पटेल, विनोद तावडे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

माननीय सदस्य अनुपस्थित

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जिल्हा निवड समिती, गोंदियाकडून परीक्षा शुल्क आकारणीमध्ये झालेला भ्रष्टाचार.

**मु.शी.**: जिल्हा निवड समिती, गोंदियाकडून परीक्षा शुल्क आकारणीमध्ये झालेला भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

डॉ. राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, यांनी "जिल्हा निवड समिती, गोंदियाकडून परीक्षा शुल्क आकारणीमध्ये झालेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गोंदिया जिल्हयामध्ये दिनांक 24.12.2007 रोजी वर्ग -3 आणि वर्ग-4 च्या पदांच्या भरतीकरिता जाहिरात देण्यात आली. ही पदे सरळ सेवेने भरावयाची होती. त्याकरिता लेखी परिक्षा घेण्याबाबत आवेदकाकडून सांगण्यात येऊन "क" वर्गाकरिता 75 रुपये आणि इतर सर्वसाधारण गटाकरिता 150 रुपये आणि "ड" वर्गाकरिता 100 आणि 200 रुपये परिक्षा शुल्क आकारण्यात आले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, याठिकाणी परीक्षा शुल्क आकारण्यात आलेले आहे आणि तरीही तेथे दहा हजार अर्ज आलेले आहेत. नंतर संबंधितांना असे सांगण्यात आले की, तेथील शाळांची क्षमता नसल्याने परीक्षा घेणे शक्य नाही. त्यानंतर गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना परीक्षेकरीता प्रवेशपत्र पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हा निवड समिती गोंदियाव्दारे या परीक्षेची तारीख 30-3-2008 असल्याचे कळविण्यात आली होती. परंतु नंतर प्रशासकीय कारणास्तव यादिवशी परीक्षा घेणे अशक्य असल्याने दि.31-3-2008 रोजी सदरहू परीक्षा घेण्याचे ठरविण्यात आले. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांवर अन्याय झाल्यामुळे संबंधितांनी आंदोलन, उपोषण, आत्मदहन इ.बाबींचा अवलंब करण्याचा इशारा दिल्याने जिल्हा निवड समितीने परीक्षा घेण्याचा निर्णय पुढे ढकलला. नागपूर जिल्हयामध्येही तसेच झाले आहे.पण गडचिरोली जिल्हयामध्ये मात्र फी आकारली गेली नाही. माझा असा प्रश्न आहे की, जर उमेदवारांची परीक्षा घ्यावयाची नव्हती आणि गुणवत्तेच्या आधारावर भरती करावयाची होती, तर फी आकारण्याचे कारण काय आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे जिल्हा निवड समितीव्दारे गोंदिया मधील वर्ग-3 व वर्ग-4 च्या पदांच्या संदर्भात उमेदवारांची जी परीक्षा घ्यावयाची होती, त्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. या परीक्षेसाठी 9661 उमेदवारांचे अर्ज आले होते. त्यानंतर 15:1 याप्रमाणे तेथे उमेदवार बोलविण्यात आले. परंतु यासंदर्भात वेगवेगळी आंदोलने केली, वेगवेगळया संस्थांनी निवेदने दिली आहेत. ते सर्व पाहून ही परीक्षा रद्द करण्यात आली होती. आता या सर्वच लोकांना परीक्षेसाठी बोलविणार आहोत. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी फी बाबत मुद्दा उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छितो की, लेखी परीक्षेकरता खुल्या प्रवर्गासाठी 150 रुपये आणि राखीव प्रवर्गासाठी 75 रुपये आकारण्याचे ठरविले होते. तसेच लेखी परीक्षा आणि मुलाखत यासाठी खुल्या प्रवर्गाकरता 200 रुपये आणि राखीव प्रवर्गासाठी 100 रुपये फी होती. याठिकाणी वर्ग-क साठी तरतूद होती. परंतु वर्ग-ड साठी तरतूद नव्हती. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे सांगितले, ते खरे आहे. म्हणून वर्ग-ड साठी जी फी घेण्यात आलेली आहे, ती संपूर्ण परत केली जाईल.

----

. . . .झेड-2

<u>निवेदन क्र.3 बाबत</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनाच्या संदर्भात कोण उत्तर देणार आहे? माननीय गृहनिर्माण मंत्री या निवेदनाच्या संदर्भात उत्तर देण्यासाठी उपस्थित नाहीत. त्यामुळे सदरहू निवेदन राखून ठेवण्यात यावे.

**उपसभापती** : ठीक आहे. मी हे निवेदन राखून ठेवतो.

----

. . . .झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयात संपूर्ण साक्षरता अभियान कार्यक्रमांतर्गत नेमण्यात आलेल्या प्रेरकांना मानधन न मिळणे

**मु. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयात संपूर्ण साक्षरता अभियान कार्यक्रमांतर्गत नेमण्यात आलेल्या प्रेरकांना मानधन न मिळणे याबाबत श्री.परशुराम उपरकर वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयात संपूर्ण साक्षरता अभियान कार्यक्रमांतर्गत नेमण्यात आलेल्या प्रेरकांना मानधन न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .झेड-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, निरंतर शिक्षण केंद्राअंतर्गत ज्यांची निवड करण्यात आली, त्यांना 300 रुपये प्रती महिना द्यावयाचे होते. परंतु गेली चार वर्षे त्यांना हे अनुदान प्राप्त न झाल्यामुळे 340 सहाय्यक प्रेरक आणि 38 मुख्य प्रेरक यांना जवळजवळ 33,53,210 रुपये द्यावयाचे शिल्लक आहेत. याठिकाणी संबंधितांची निवड जिल्हा समितीमार्फत करण्यात आली आणि जिल्हा समितीला निवड करण्याचे अधिकार आहेत. परंतु संबंधितांचे मानधन गेले चार वर्षे थकीत आहे. केंद्र शासनाकडे बोट दाखवून यांचे चार वर्षे थकीत असलेले मानधन थांबवून चालणार नाही. अशा वेळी शासन अनुदान मिळण्यासाठी काही उपाययोजना करणार आहे काय ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही योजना केंद्र शासनाची आहे. पूर्वी जिल्हा साक्षरता समितीमध्ये जिल्हाधिकारी अध्यक्ष होते. आता जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे जिल्हा साक्षरता समितीचे अध्यक्ष राहणार आहेत. 33 महिन्याचे थकीत मानधन देण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे सातत्याने मागणी करण्यात येत आहे. केंद्र शासनाने ही मागणी मान्य केलेली आहे. ही योजना केंद्र शासनाची असल्यामुळे, त्यांची मान्यता मिळाल्यानंतर प्रेरकांचे 33 महिन्याचे थकीत वेतन दिले जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, प्रेरकांचे मानधन 4 वर्षापासून दिलेले नाही. त्यांना केवळ मासिक 300 रुपये मानधन दिले जाते. ही योजना केंद्र शासनाची आहे, हे मला मान्य आहे.

**उपसभापती** : चार वर्षापासून मानधन दिलेले नाही. त्यामुळे शासनाने याबाबत लक्ष देऊन उपाययोजना करावी.

श्री. हसन मुश्रीफ : होय. लक्ष देण्यात येईल.

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

**पृ. शी.** : AIEEE या प्रवेश परीक्षेकरीता महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना राज्याबाहेरील प्रवेशकेंद्र मिळणे.

**मु. शी.** : AIEEE या प्रवेश परीक्षेकरीता महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना राज्याबाहेरील प्रवेशकेंद्र मिळण्याबाबत यांनी डॉ. दीपक सावंत यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी "AIEEE या प्रवेश परीक्षेकरीता महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना राज्याबाहेरील प्रवेशकेंद्र मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून ,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदलन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अखिल भारतीय अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अखिल भारतीय स्तरावर घेण्यात येणारी AIEEE या प्रवेश परीक्षेकरीता महाराष्ट्रातील काही उमेदवारांना महाराष्ट्राबाहेरील केंद्राचे वाटप करण्यात आले होते. काही विद्यार्थ्यांना पोर्ट ब्लेअर, अंदमान ,निकोबार, भोपाळ, अहमदाबाद, सुरत, बडोदा, इत्यादी परीक्षा केंद्र देण्यात आलेले आहे. हे विद्यार्थी परीक्षा देण्याकरिता या ठिकाणी कसे काय जाऊ शकणार आहेत ? राज्यातील विद्यार्थ्यांची 27/4/2008 रोजी होणारी AIEEE परीक्षा राज्यातील परीक्षा केंद्रावर घेण्यात यावी याकरिता शासन प्रयत्न करीत आहे असे सांगण्यात आले होते. मात्र शासनाचे हे प्रयत्न कमी पडत असल्याचे सध्या दिसून येत आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे फॉर्म भरताना परीक्षा केंद्राकरीता तीन विकल्प देण्यात येतात. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विकल्पापैकी एक परीक्षा केंद त्यांना देण्यात येत असते. परंतु या विद्यार्थ्यांपैकी कोणीही अहमदाबाद, भोपाळ, पोर्ट ब्लेअर अशी परीक्षा केंद्रे दिलेली नाहीत. तरी देखील त्यांना राज्याबाहेरील परीक्षा केंद्र देण्यात आली आहेत. याबाबत राज्य शासन काय करणार आहे ? तसेच संचालक तंत्रशिक्षण यांच्या स्तरावरुन सीबीएससी, दिल्ली यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. याबाबत दोन दिवसांमध्ये निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी देखील या विषयासंदर्भात विषय उपस्थित केला होता. AIEEE ही परीक्षा केंद्र शासन सीबीएससी मार्फत घेण्यात येत असते. दोन वर्षापूर्वी अशी परिस्थिती होती की, इंजिनियरींग करीता विद्यार्थी कमी असावयाचे व त्या तुलनेत सीट्स जास्त होत्या. परंतु आता स्थिती निराळी आहे. आता इंजिनियरींगकरीता बरेच विद्यार्थी अर्ज करीत असतात. या परीक्षेतील विद्यार्थ्यांना मार्क्स महाराष्ट्रातील सीईटीच्या परीक्षेपेक्षा जास्त मिळाल्यामुळे, बरेच विद्यार्थी मेरीटलिस्ट मध्ये समाविष्ट झाले होते. त्यामुळे या वर्षी साधारण 10 हजार विद्यार्थ्यांनी ॲप्लिकेशन केलेले आहे. या परीक्षेकरीता महाराष्ट्रामध्ये मुंबई, पुणे, नागपूर ही तीन परीक्षाकेंद्रे आहेत. या विद्यार्थ्यांपैकी, काही विद्यार्थ्यांना अहमदाबाद, पोर्ट ब्लेअर, बरोडा येथे सेंटर देण्यात आली. अशी बातमी लोकसत्ता

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर्तमानपत्रामध्ये आली होती. महाराष्ट्र शासनाचे ॲडिशनल चीफ सेक्रेटरी, उच्च शिक्षण यांच्या पातळीवरुन सीबीएसई, दिल्ली यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यासंबंधी मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यांनी तोंडी आश्वासन शासनाला दिलेले आहे की, या विद्यार्थ्यापैकी जे महिला विद्यार्थी आहेत त्यांनी फॉर्म भरताना परीक्षा केंद्राकरीता जे पहिले ऑप्शन दिलेले असेल तेच परीक्षा केंद्र त्यांना देण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ...

दुसरे जे विद्यार्थी आहेत त्यांनी आपल्या ॲप्लिकेशन फॉर्ममध्ये जे फर्स्ट, सेकंड आणि थर्ड प्रेफरन्स दिलेले आहेत त्या सेंटर्समध्ये त्यांना ॲडजस्ट करण्याचा प्रयत्न करतील असे सीबीएससीच्या इन्चार्जने आपल्या ॲडिशनल मुख्य सचिवांना सांगितले आहे. तेथील कन्व्हेनर श्री. प्रितमसिंग आहेत त्यांनी आपल्याला हे आश्वासन दिलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, 27 तारखेला परीक्षा आहे. आपला पर्सनल रिप्रेझेंटेटिव्ह दिल्लीला पाठवून याची शहानिशा करणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, त्या ठिकाणी महाराष्ट्र सदनातील आपले जे रेसिडेन्शियल कमिशनर आहेत ते स्वत: फॉलोअप करीत आहेत.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : विलेपार्ले येथील भूखंड क्रमांक 108 व 109 चे बदलण्यात आलेले आरक्षण

**मु. शी.** : विलेपार्ले येथील भूखंड क्रमांक 108 व 109 चे बदलण्यात आलेले आरक्षण याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड. प्रितमकुमार शेगावकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फंडकर, जगदीश गुप्ता यांनी "विलेपार्ले येथील भूखंड क्रमांक 108 व 109 चे बदलण्यात आलेले आरक्षण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्र शासन मुंबईतील सर्व मैदाने, मनोरंजनाची मैदाने बिल्डरला देण्यास निघाले आहे, जणू काही मुंबई विकण्याचाच निर्णय घेतलेला आहे असे वाटते. विलेपार्ले मुंबई येथील नगर रचना योजना क्र, 5 सन 1994 मध्ये जी मंजूर झाली त्यामध्ये भूखंड क्रमांक 108 हा मनोरंजनाचे मैदान म्हणून व व भूखंड क्रमांक 109 हा "हाऊसिंग फॉर डिस हाऊस्ड" म्हणून राखून ठेवण्यात आला होता. हे राखून ठेवण्यात आल्यानंतर त्या ठिकाणी शासनाच्या अधिसूचनेप्रमाणे गलिच्छवस्ती म्हणून भूखंड क्रमांक 872 व 1079 या भूखंडासाठी घोषित केलेली असताना एसआरएने भूखंड क्रमांक 108 व 109 भूखंडांवर कोणत्या आधारे झोपडपट्टी पुनर्वसन योजना घोषित केली व यासाठी शासनाची पूर्वपरवानगी न घेता एसआरएने बिल्डरचा फायद्यानुसार त्यामध्ये बदल का केला ? एस.आर.ए.ने या योजनेला एल.ए.ओ. देताना पूर्वीच्या 196 झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी जागा द्यावी असे सांगितले होते. त्याप्रमाणे एस.आर.ए.च्या बिल्डरने 196 जणांचे पुनर्वसन केले आहे असा हायकोर्टात 16.2.2007 रोजी शपथपूर्वक लेखी जबाब आहे. त्यांचे पुनर्वसन झालेले आहे असे त्यांनी लिहून दिलेले आहे. असे असताना मनोरंजनासाठी असलेल्या भूखंड क्रमांक 108 वर कोणासाठी संक्रमण छावणी उभी करण्यासाठी हा भूखंड आपण दिलेला आहे ? दुसरा प्रश्न असा की, त्या ठिकाणी मुंबई उच्च न्यायालयात मनोरंजनासाठी असलेल्या मैदानावर कोठल्याही प्रकारचे बांधकाम करण्याची परवानगी देऊ नये याबाबतच्या याचिकेवर अजून निर्णय प्रलंबित आहे. तसेच आता ही याचिका शासनाने एसआरए कमिटीकडे योग्य निर्णयासाठी दिलेली आहे पण एसआरए कमिटीचा निर्णय न घेता तो भूखंड त्यांना देण्यात आलेला आहे. वरील भूखंड क्रमांक 108 वर चालू असलेले बांधकाम एसआरए कमिटीचा निर्णय लागेपर्यंत शासन थांबविणार काय ? तसेच कमिटीचा निर्णय लागेपर्यंत या भूखंडावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यास परवानगी देऊ नये आणि जर दिली असेल तर ती आपण रद्द करणार आहात काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, ती योजना भूखंड क्रमांक 108 आणि 109 वर विकास नियंत्रण नियमावली, 1991 प्रमाणे 9.10.1998 मध्ये

...4...

ॲड. प्रितमकुमार शेगावकर ....

मंजूर करण्यात आली होती. म्हणजे हे जुने आहे. हे नवीन नाही. भूखंडाचे क्षेत्रफळ नगररचना योजनेमध्ये सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित केलेली असते. त्यामुळे या क्षेत्रफळाचा काहीही गैरव्यवहार झालेला नाही. महापालिकेने या भूखंडावरील झोपडपट्टी ही गणनात्मक झोपडपट्टी म्हणून जाहीर केलेली आहे. भूखंड क्रमांक 108 आणि 109 हे टी.पी. मध्ये आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय , मी असा प्रश्न विचारला की, टी.पी.प्लॅनमध्ये भूखंड 108 हा मनोरंजनासाठी दाखवला आहे हे खरे आहे काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : भूखंड क्रमांक 108 मनोरंजनासाठीच आहे. परंतु दोन्ही भूखंड एकत्र केले होते त्यामुळे आपल्याला एस.आर.ए.ची योजना घेता आली. त्या ठिकाणी करमणुकीसाठी जो भूखंड क्रमांक 108 आहे....

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ श्री.बरवडनंतर 13:20

श्री.पांडुरंग फुंडकर : 108 आणि 109 हे दोन प्लॉट एकत्र करण्याचे कारण काय ? उच्च न्यायालयामध्ये दिनांक 16 फेब्रुवारी, 2007 रोजी शासनाने शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यात असे म्हटले आहे की, त्या जागेवर जे झोपडीधारक आहेत त्यांचे पुनर्वसन झालेले आहे. अशाप्रकारचे शपथपत्र सादर केले आहे हे खरे आहे काय ? शपथपत्र दाखल करीत असताना विकासकाने याबाबतची कार्यवाही पूर्ण केली आहे असे म्हटले आहे हे खरे आहे काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, अद्याप 17 झोपडीधारकांचे पुनर्वसन करावयाचे राहिले आहे. कोर्टात शपथपत्र दिलेले आहे हे खरे आहे. 108 व 109 या प्लॉटवर संक्रमण शिबिर बांधावयाचे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही. दिनांक 16.2.2007 रोजी विकासकाने हायकोर्टात शपथपत्र सादर केले होते. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, पुनर्वसनाबाबतची कार्यवाही पूर्ण केलेली आहे, त्यामुळे संक्रमण शिबिराची गरज राहिलेली नाही. त्यामुळे 108 व 109 हे मनोरंजनासाठी असलेले प्लॉट एकत्र करुन संक्रमण शिबिरासाठी देण्याचे कारण काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, हे शपथपत्र विकासकाने सादर केले आहे,शासनाने केलेले नाही.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

ॲड.अनिल परब : हे दोन प्लॉट एकत्र करण्याची कार्यवाही कायदेशीरपणे झाली आहे किंवा नाही एवढेच सांगावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : विकासकाने हायकोर्टात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे म्हणजे शासनाने केले आहे. त्यात झोपडीधारकांचे पुनर्वसन झालेले आहे, संक्रमण शिबिराची गरज नाही असे म्हटले आहे. मग हे दोन प्लॉट एकत्र करण्याचे कारण काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : हे प्लॉट एकत्र करणे जरुरीचे होते त्यामुळे ते विकास नियमावलीतील नियम क्र.310 खाली एकत्र केले आहेत.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्लॉटचे एकत्रिकरण करताना एस.आर.ए.ची परवानगी घेतली आहे काय ? मनोरंजनाचे मैदान, खेळाचे मैदान विकण्याचा सपाटा सरकारने लावला आहे.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : बाकीच्या लोकांचे पुनर्वसन झाल्यानंतर संक्रमण शिबिर रिकामे करुन तो प्लॉट महानगरपालिकेला देण्यात येणार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्याठिकाणी पुनर्वसनाचे काम पूर्ण आहे, पुनर्वसन करण्याची गरज राहिलेली नाही असे प्रतिज्ञापत्र विकासकाने हायकोर्टात सादर केले आहे. बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केल्यानंतर प्लॉट क्र.108 व 109 वरील मनोरंजनाचे मैदान पुनर्वसनाच्या नावाखाली संक्रमण शिबिरासाठी विकासकाला देण्याचे कारण काय ? ते रद्द करणार आहे काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते म्हणत आहेत तशी वस्तुस्थिती नाही. विकासकाने पुनर्वसन पूर्ण झाल्याचे शपथपत्र कोर्टात दिले असले तरी अद्याप 17 लोकांचे पुनर्वसन व्हावयाचे बाकी आहे. त्यांचे पुनर्वसन झाल्यावर ते संक्रमण शिबिर काढून टाकले जाईल. याबाबत मुख्याधिका-यांना अधिकार आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय मंत्रिमहोदय तेच तेच उत्तर देत आहेत.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : मुख्याधिका-यांना अधिकार आहेत आणि त्याप्रमाणे त्यांनी ते केलेले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. प्रितमकुमार शेगांवकर.....)

त्या ठिकाणी ट्रांझिट कॅम्प आहे. 17 लोक रहात आहेत. त्यांचे पुनर्वसन झाल्यानंतर तो ट्रांझिट कॅम्प तोडण्यात येईल. माननीय सदस्यांनी ज्यासाठी प्रश्न विचारलेला आहे तो उद्देश पूर्ण होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : हायकोर्टामध्ये विकासकाने दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये काय नमूद करण्यात आलेले आहे ? शपथपत्रात कोणकोणत्या बाबी आहेत ?

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : आता त्याबाबतची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवता येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे हे निवेदन राखून ठेवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : विकासकाने दिलेले शपथपत्र शासनाला बंधनकारक नाही.

ॲड. अनिल परब : विकासकाने चुकीचे शपथपत्र दिले असेल तर दुसरे शपथपत्र दिले पाहिजे.

**उपसभापती** : हे निवेदन राखून ठेवण्यात येत आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>निवेदन क्रमांक 5 बाबत</u>**

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. ते सभागृहात उपस्थित झाल्यानंतर हे निवेदन घेण्यात येईल.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अंजनाबाई वासनिक मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा व राजीव मूकबधिर निवासी विद्यालय, कांद्री-कन्हान (ता.पारशिवनी) जिल्हा नागपूर या शाळेतील कर्मचा-यांचे प्रलंबित असलेले वेतन

**मु. शी.** : अंजनाबाई वासनिक मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा व राजीव मूकबधिर निवासी विद्यालय, कांद्री-कन्हान (ता.पारशिवनी) जिल्हा नागपूर या शाळेतील कर्मचा-यांचे प्रलंबित असलेले वेतन याबाबत श्री व्ही.यू.डायगव्हाणे व प्रा.बी.टी.देशमुख वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे व प्रा.बी.टी.देशमुख यांनी "अंजनाबाई वासनिक मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा व राजीव मूकबधिर निवासी विद्यालय, कांद्री-कन्हान (ता. पारशिवनी) जि.नागपूर या शाळेतील कर्मचा-यांचे प्रलंबित असलेले वेतन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मी 12 मार्च 2008 रोजी ही 93ची सूचना दिलेली होती. त्यानंतर आज 11 एप्रिल 2008 रोजी शासनाने निवेदन वितरित केलेले आहे. माझ्या सूचनेमध्ये मी जे चार मुद्दे उपस्थित केलेले होते त्यातील एकाही मुद्याचे उत्तर देण्यात आलेले नाही. अंजनाबाई वासनिक मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा व राजीव मूकबधिर निवासी विद्यालय, कांद्री-कन्हान(ता. पारशिवनी) जि. नागपूर या दोन अपंग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षक कर्मचा-यांच्या वेतनाचा हा प्रश्न आहे. जुलै 2000 पासून त्यांचे वेतन प्रलंबित आहे. त्यांनी उपोषण देखील केलेले आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "माहे जुलै, 2007 पासूनचे कर्मचा-यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, नागपूर यांच्या स्तरावर आहे. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. या कर्मचा-यांचे वेतन अदा करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? नागपूरच्या मतिमंद विद्यार्थ्यांच्या शाळांचे अनेक प्रश्न आहेत.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीृ व्ही.यू.डायगव्हाणे...

या संस्थेतील कर्मचा-यांनी आणि काही संघटनांनी आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या समवेत चर्चा करावयाची आहे अशा प्रकारची विनंती केली आहे. या संघटनांनी केल्या विनंतीप्रमाणे आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे समवेत एका महिन्याच्या आत बैठक घेण्यात येईल काय ? पुढील सत्रापासून कर्मचा-यांचे पगार देण्यास विलंब होणार नाही याची दक्षता शासनाकडून घेतली जाईल काय ?

श्री. चंद्रकांत हंडारे : सभापती महोदय, राजीव मुकबधीरस निवासी शाळा,कन्हान, ता.पारशिवनी, जि.नागपूर तसेच अंजनाबाई वासनिक मतिमंद मुला-मुलींची निवासी शाळा, कन्हान, जि.नागपूर या शाळा नोंदणी व अनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळा आहेत. त्या शाळेतील कर्मचा-यांचे काही कालावधीतील वेतन अदा केले गेले नाही यासंबंधीचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. या निवेदनाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, जुलै 2007 पासूनचे कर्मचा-यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, नागपूर यांचे स्तरावर सुरु आहे. सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात थोडीशी दुरुस्ती करु इच्छितो. या दोन्ही शाळेतील कर्मचा-यांचे वेतन फेब्रुवारी, 2008 रोजी वितरित केले आहे. तसेच जुलै 7 ते डिसेंबर 7 या कालावधीचे वेतन, त्याच बरोबर 13 फेब्रुवारी,2008 ते 13 मार्च, 2008 या कालावधीचे वेतन दिनांक 14.3.2008 रोजी अदा करण्यात आले आहे. या दोन्ही शाळेतील कर्मचा-यांच्या वेतनाचा प्रश्न सोडविला गेला आहे. या कर्मचारी संघटनेच्या अडचडी जाणून त्या सोडविण्याच्या बाबतीत आयुक्त, अपंग कल्याण यांना बैठक आयोजित करण्यासंबंधी सूचना देण्यात येतील. भविष्यात या संस्थांमधील कर्मचा-यांचे वेतन देण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आयुक्त, अपंग कल्याण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक 10 जानेवारी, 2008 चे पत्राने कर्मचा-यांची आर्थिक गैरसोय होऊ नये म्हणून दोन्ही शाळेतील मान्यता प्राप्त कर्मचा-यांचे माहे जानेवारी 2008 पर्यंत वेतन देण्यात यावे असे समाजकल्याण अधिकारी गट (अ) जिल्हा परिषद नागपूर यांना कळविलेले आहे. जानेवारी 2008 पर्यंत वेतन देण्यात यावे अशा प्रकारचे आयुक्तांनी आदेश दिलेले असताना जिल्हा समाजकल्याण

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

अधिकारी आणि त्याच्या कार्यालयातील कर्मचा-यांनी आयुक्तांचे आदेश पाळले नाही. आयुक्तांच्या आदेशाचे ज्या अधिका-यांनी आणि कर्मचा-यांनी पालन केले नाही, त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. चंद्रकांत हंडारे : सभापती महोदय, यासंदर्भात थोडीशी अडचण निर्माण झाली होती. ती अडचण अशी होती की, अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण झाले नव्हते. म्हणून आयुक्तांनी अशा सूचना दिल्या होत्या की, अनुज्ञाप्तीचे नुतनीकरण झाले नसले तरी संबंधितांना पगार देण्यात यावा. सन्माननीय सदस्यांनी संबंधित अधिका-यांनी आणि कर्मचा-यांनी आयुक्ताच्या आदेशाचे पालन केले नाही अशा प्रकारचा जो मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबतची माहिती मी तपासून घेतो आणि त्यात चूक असेल तर संबंधितांवर कार्यवाही करतो.

-------

यानंतर श्री. कानडे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ

मु.शी. : राज्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीसंबंधी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे निवेदन.

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे. )

-------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 13:40

**पृ. शी.** : मौजे रेवदंडा, ता.अलिबाग येथील झोपड्या नियमानुकूल करणे

**मु. शी.** : मौजे रेवदंडा, ता.अलिबाग येथील झोपड्या नियमानुकूल करणे याबाबत श्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील यांनी "मौजे रेवदंडा, ता.अलिबाग येथील झोपड्या नियमानुकूल करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सीआरझेड कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी या झ ोपड्या त्याठिकाणी बांधण्यात आलेल्या आहेत, त्या झोपड्यांना 1984 पूर्वीच घरपट्टी लावण्यात आली आहे. त्यामुळे सीआरझेड कायदा लागू होत नाही. या झोपड्या रेग्युलराईज करण्यासाठी शासन कोणता धोरणात्मक निर्णय घेणार आहे? मुंबई शहरात येणाऱ्या परप्रांतीयांनी उभारलेल्या झोपडया नियमानुकूल करण्यात येतात. रेवदंडा बाजारपेठेत असलेल्या या झोपड्या नियमानुकूल करण्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे? निवेदनामध्ये म्हटले आहे की, त्याठिकाणी मॅन्ग्रोव्ह आहे. बाजारपेठेमध्ये मॅन्ग्रोव्ह असू शकते का? बाजारपेठेत 25 वर्षापासून या झोपड्या आहेत. मॅन्ग्रोव्ह नसताना असल्याचे म्हटले आहे. गरीब लोकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून या झोपड्या रेग्युलराईज करण्याबाबत शासन निर्णय घेईल का?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दोन-तीन महत्वाच्या बाबी मौजे रेवदंडा येथील अतिक्रमित असलेल्या झोपड्या रेग्युलराईज करण्याच्या दृष्टीने नियम 93 च्या सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे हे खरे आहे की, जवळपास 225 झोपडया त्याठिकाणी आहेत. सीआरझेड कायदा लागू होण्यापूर्वी त्या झोपड्या वसलेल्या आहेत हे सुध्दा खरे आहे. त्याठिकाणी असलेल्या झोपडया सध्याच्या परिस्थितीत सीआरझेड बाधित असल्यामुळे शासनाच्या वतीने तेथे शासकीय जमीन उपलब्ध आहे का याचा शोध घेण्यात आला. परंतु शासकीय जमीन उपलब्ध नव्हती. खाजगी जमीन सुध्दा उपलब्ध असेल तर ती संपादित करुन या झोपड्या आहेत त्यांना नियमानुकूल करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्याठिकाणच्या झोपड्या अधिकृत करण्याच्या संदर्भात ग्रामपंचायतीचा ठराव सुध्दा नाही. 225 पैकी 67 झोपड्या ग्रामपंचायतीमध्ये नोंद झालेल्या आहेत. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून या संदर्भात ठराव आला तर सगळ्या बाबी तपासून शासन याबाबत निर्णय घेईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : परिचर पदाच्या परीक्षेसाठी उमेदवारांकडून भरण्यात आलेले डिमांड ड्राफ्ट वेळेवर बँकेत जमा न करणे

**मु. शी.** : परिचर पदाच्या परीक्षेसाठी उमेदवारांकडून भरण्यात आलेले डिमांड ड्राफ्ट वेळेवर बँकेत जमा न करणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "परिचर पदाच्या परीक्षेसाठी उमेदवारांकडून भरण्यात आलेले डिमांड ड्राफ्ट वेळेवर बँकेत जमा न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, उमेदवारांनी भरलेले डिमांड ड्राफ्ट सहा महिने पडून राहिले त्यामुळे पुन्हा डिमांड ड्राफ्ट काढण्यासाठी उमेदवारांना प्रत्येकी 100 रुपये भूर्दंड सहन करावा लागला. ही रक्कम परत मिळण्यासाठी जिल्हा परिषदेने पत्रव्यवहार केला. परंतु प्रत्येकी 3320 रुपये बँकेत पडून होते, त्या रक्कमेच्या व्याजातून उमेदवारांना 100 रुपये परत दिले जातील काय? ही परीक्षा केव्हा घेण्यात येईल आणि भरती प्रक्रिया केव्हा पूर्ण होईल?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे जवळपास 666 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 100 रुपये दंड भरावा लागला. 423 विद्यार्थ्यांनी व्हॅलिडीटी भरुन डी.डी.सादर केले होते. 243 विद्यार्थ्यांनी व्हॅलिडीटी भरुन दिली नाही. परंतु त्यांना परीक्षेस बसण्यासाठी परवानगी दिली होती.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ......

ज्या कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे या 423 विद्यार्थ्यांना प्रत्येकी 100 रुपये दंड केला व ती रक्कम विद्यार्थ्यांना भरावी लागली ती रक्कम त्याच कर्मचाऱ्यांकडून वसूल करुन या मुलांना परत करण्यात येईल.

----------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परीट समाजाच्या लोकांनी अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी केलेले आंदोलन

**मु. शी.** : परीट समाजाच्या लोकांनी अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी केलेले आंदोलन याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, प्रा. शरद पाटील, श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, प्रा. शरद पाटील, श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, यांनी "परीट समाजाच्या लोकांनी अनुसूचित जातीत समावेश करण्यासाठी केलेले आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला असतो. हे करीत असतांना पोलीस निरीक्षक श्री. दौलत मोरे यांनी जो आततायीपणा केला त्याबाबतची चौकशी करुन सभागृहाच्या पटलावर त्यासंबंधीचा अहवाल शासन ठेवणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, या आंदोलनकर्त्यांनी आंदोलनाचे ठिकाण सांगितले नव्हते आणि ऐन गर्दीच्या चौकात आठशे ते नऊशे लोक येऊन आंदोलन केल्यामुळे तेथे वाहतुकीची कोंडी तेथे झाली. पोलिसांनी वारंवार विनंती करुन सुध्दा त्यांनी ऐकले नाही. उलट शासनाच्या व नेत्यांच्या विरोधात घोषणा सुरु केल्या. तसेच त्यावेळी दगडफेकही करण्यात आली त्यामुळे पोलिसांना लाठीचा वापर करावा लागला.

श्री. नितीन गडकरी : महोदय, या लाठीमारात सात वर्षाच्या मुलाचे डोके फुटले आहे. वयाने मोठया असलेल्या लोकांनी आंदोलन केले परंतु सात वर्षाच्या बालकाने काय केले होते ? त्याचे डोके लाठीने फुटलेले आहे. अशा प्रकारे अमानुषपणे पोलीस वागले, हे आपल्याला माहीत आहे काय ? याला कोण जबाबदार आहे ? तसेच यासंबंधीची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, या सात वर्षाच्या बालकाचे डोके दगडफेकीमुळे फुटले आहे

श्री. नितीन गडकरी : महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या म्हणण्यानुसार जमावाने दगडफेक केली. परंतु जमाव आपल्याच लोकांवर दगडफेक कसा करणार ? कारण या मुलाचे डोके समोरुन फुटलेले आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हा दगड मागून कोणीतरी मारला व तो मुलाला लागला म्हणून त्याचे डोके फुटले.

श्री. नितीन गडकरी : हा दगड मागून फेकल्यानंतर समोरुन डोके कसे फुटणार आहे ? म्हणून माननीय मंत्री महोदय यासंबंधीची चौकशी करुन त्याचा अहवाल पटलावर ठेवणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : होय, ही चौकशी करुन अहवाल पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : महोदय, या जमावातील परीट समाजाचा आरोप असा आहे की, पोलिसांच्या लाठीमुळेच या मुलाचे डोके फुटले आहे. म्हणून याप्रकरणी मेडिकल चेकअप करुन ही जखम लाठीची आहे की, दगडाची आहे यासंबंधीची माहिती घेऊन दोषींवर कारवाई करावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : होय, या मुलाचे मेडिकल चेकअप करुन कारवाई करण्यात येईल.

....4

**पृ. शी.** : अमरावती येथे मुलीने पळवून नेल्याची खोटी तक्रार देणे

**मु. शी.** : अमरावती येथे मुलीने पळवून नेल्याची खोटी तक्रार देणे याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी, केशवराव मानकर, पाशा पटेल वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, केशवराव मानकर, पाशा पटेल यांनी "अमरावती येथे मुलीने पळवून नेल्याची खोटी तक्रार देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

..........5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता : महोदय, ही मुलगी स्वत:च्या मर्जीने गेली होती असे निवेदनावरुन स्पष्ट होते. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, त्या मुलीने खोटी तक्रार केल्यामुळे प्रशासन आणि सभागृहाचा सुध्दा वेळ वाया गेला. म्हणून या मुलीवर व तिच्या वडिलांवर शासन कारवाई करणार काय ? तसेच ज्या मुलाविरुध्द तक्रार केली तो तरुण मुलगा असून त्याचा यामध्ये काहीच दोष नाही तरी देखील त्याला दोन दिवस पोलीस कस्टडीत रहावे लागले. या मुलावर दाखल केलेला गुन्हा शासन परत घेणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, या मुलीने खोटी तक्रार दिलेली आहे त्यामुळे प्रशासन आणि सभागृहाचाही वेळ गेला, म्हणून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. आणि ज्या मुलाचे नाव सांगितले ते मुळात चुकीचे आहे म्हणून त्या मुलाला 169 खाली मुक्त करण्यात येत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, असे प्रकार सध्या वारंवार वाढत चालले आहेत. चांगल्या घरातील मुलांना अशा केसमध्ये गोवण्यात येते या मुलांना पोलीस स्टेशनमध्ये नेऊन पोलीस रात्रभर मारतात त्यामुळे या मुलांचे मानसिक संतुलन बिघडते. या प्रकरणात ज्या मुलीने खोटी तक्रार केलेली आहे त्या मुलीवर कोणते कलम लावून कारवाई करण्यात येणार आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या मुलीने खोटी तक्रार केलेली असल्यामुळे कलम 211 लावून कारवाई करण्यात येईल. खोटा गुन्हा दाखल केल्यावर आयपीसीच्या कलम 211 प्रमाणे कारवाई केली जात असते त्याप्रमाणे या प्रकरणातही सदर मुलीवर कलम 211 लावून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या मुलीने खोटी तक्रार केल्याचे सिध्द झालेले आहे. या मुलीने खोटी तक्रार केली, खोटी नावे सांगून निरपराध मुलांना त्याचा त्रास सहन करावा लागला आहे. त्यामुळे मुलीवर बेलेबल गुन्हा लावला जाईल की, अनबेलेबल गुन्हा लावला जाईल?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या मुलीने जे.जे. हॉस्पिटलमध्ये माझ्यावर अत्याचार झाल्याची खोटी तक्रार दिली होती व ही तक्रार खोटी असल्याचे सिध्द झालेले आहे. त्यामुळे आयपीसीच्या कलम 211 प्रमाणे सदर मुलीवर कारवाई करण्यात येईल. कलम 211 प्रमाणे 3 वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते तसेच हा गुन्हा नॉन बेलेबल आहे.

----------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पॅरामिन ॲडव्हरटाईझींग व मार्केटींग एजन्सीला बेकायदेशीर रित्या परवानगी देणे

**मु. शी.** : पॅरामिन ॲडव्हरटाईझींग व मार्केटींग एजन्सीला बेकायदेशीर रित्या परवानगी देणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण यांनी पॅरामिन ॲडव्हरटाईझींग व मार्केटींग एजन्सीला बेकायदेशीर रित्या परवानगी देणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पॅरामिन ॲडव्हरटाईझींग व मार्केटींग एजन्सीला बेकायदेशीररित्या जवळपास 10 कोटी रुपयांची जाहिरात दिलेली आहे परंतु जाहिरात आल्यानंतर त्याबाबत या एजन्सीला मंजूरी देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे पोस्ट डेटेड परमिशन देण्यात आली आहे हे खरे आहे काय?

श्री. दिलीप वळसे -पाटील : सभापती महोदय, संबंधित एजन्सीची निवड सन 2003 साली करण्यात आलेली आहे. ती निवड केल्यानंतर वेळोवेळी महावितरण कंपनीच्या मार्फत जाहीरात द्यावयाची होती. यासर्व बाबी व्यवस्थापकीय संचालकांच्या मान्यतेनेच करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे पोस्ट डेटेड मान्यता देण्यात आली होती हे म्हणणे योग्य होणार नाही.

श्री. नितीन गडकरी : पोस्ट डेटेड परवानगी दिली नाही असे जे आपण म्हणता ते बरोबर नाही. माझ्याकडे यासंदर्भातील पुरावा आहेत. आपण आधी जाहिरात दिली आणि मग मंजूरी दिली आहे. मग हे पोस्ट डेटेड होत नाही काय, हे नियम बाहय नाही काय? टेंडर न काढता एजन्सीची निवड करण्यात आली. दुस-या एजन्सीला यासंदर्भातील जाहिरात का दिली नाही? पोस्ट डेटेड परमिशन आपण कशी काय देऊ शकता?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 13.55

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये सांगण्यात आले आहे की 2003 साली जाहिरात एजन्सीची निवड करण्यात आली होती आणि व्यवस्थापकीय संचालक त्यानंतर आलेले आहेत. जसजशी प्रसिध्दीची मोहीम हाती घेण्यात येते तसतसे जाहिरात एजन्सीला कळविण्यात येते. जाहिरात एजन्सीची निवड केल्यानंतर मध्यंतरी मोठया प्रमाणावर विजेची टंचाई होती आणि विजेच्या बाबतीत लोकांच्या मनामध्ये नाराजी निर्माण झालेली असल्यामुळे आंदोलन सुरु होते त्यामुळे ताबडतोबीने टी.व्ही.वर जाहिरात देण्यास किंवा होर्डींग्ज लावण्यास त्यांना सांगण्यात आले होते. एकदा एजन्सीची निवड केल्यानंतर त्यांना टाईम टू टाईम जाहिरात देण्यासंबंधीचा कार्यक्रम देण्यात येत असतो. खालच्या पातळीवर पी.आर.ओ. आणि जे डायरेक्टर असतात त्यांनी मान्यता दिल्यानंतर एजन्सीचे पेमेन्ट केले जाते त्यामुळे यामध्ये अनियमितता झाली आहे असे मला वाटत नाही.

श्री.नितीन गडकरी : 2003 साली जाहिरात एजन्सीची निवड करण्यात आली आहे आता 2008 साल सुरु आहे त्यामुळे 2003 पासून आठ पर्यन्त पाच पाच वर्षे त्याच एजन्सीला काम देणे हे संयुक्तिक आहे काय ? सरकारच्या आर्थिक शिस्तीमध्ये ही बाब बसते काय ? पाच पाच वर्षे टेन्डर जीवंत राहू शकते काय ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, 2003 साली या एजन्सीची निवड करण्यात आली होती. आणि जाहिराती 2006-2007, आणि 2007-2008 या सालात देण्यात आल्या होत्या

श्री.नितीन गडकरी : या संदर्भात चुकीची जाहिरात काढण्यात आली होती त्यात दुरुस्ती केल्यानंतर पुन्हा जाहिरात काढली होती. मला असे विचारावयाचे आहे की श्री.अजय भूषण पांडे यांनी या एजन्सीलाच फेवर का केलेले आहे.? याच एजन्सीच्या बाबतीत त्यांना एवढा इंटरेस्ट का आहे ?याबाबतीत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, ज्या वेळी एखाद्या एजन्सीची निवड केली जाते त्या अगोदर त्या एजन्सीला सादरीकरण करण्यास सांगितले जाते . सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे एका पक्षाचे प्रमुख आहेत त्यांना याची माहिती आहे. पक्षाच्या जाहिरातीसंबंधीचे काम एखाद्या एजन्सीला देत असतांना सादरीकरण करण्यास सांगून त्यांची क्रिएटीव्हीटी पाहून नंतर त्यांची निवड केली जाते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जाहिरात दिल्यानंतर पाच वर्षानंतर त्यांना काम देत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील : या बाबतीत पॅनल तयार केले जाते या एजन्सीची निवड 2003 साली करण्यात आली होती त्याचबरोबर एकाच एजन्सीला काम देण्यात आलेले नाही. " मे.कनसेप्ट" या एजन्सीला त्याचबरोबर "मे. फुलराणी " या एजन्सीला जाहिरातीचे काम देण्यात आलेले आहे. वेगवेगळया जाहिरातीचे काम वेगवेगळया एजन्सीला देण्यात आलेले आहेत. टी.व्ही. वर जाहिराती देण्यासंबंधी आणि होर्डीग लावण्यासंबंधीचे काम या एजन्सीला देण्यात आले होते. दुसरी गोष्ट अशी आहे की, या कंपनीचा 20 हजार कोटी रुपयांचा टर्न ओव्हर असून प्रत्येक वर्षाला 6 कोटी रुपये जाहिरातीवर खर्च झालेला आहे आणि ही रक्कम त्या तुलनेने मोठी नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी गैरसमज करुन घेऊ नये. सर्व प्रोसिजर फॉलो करुनच त्या एजन्सीला हे काम देण्यात आले होते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बांद्रा येथील शासकीय वसाहतीचे पुर्नविकास करुन शासकीय कर्मचा-यांना त्यामध्ये सामावून घेणे

मु.शी : बांद्रा येथील शासकीय वसाहतीचे पुर्नविकास करुन शासकीय कर्मचा-यांना त्यामध्ये सामावून घेण्याबाबत ॲड.अनिल परब,वि.प.स यानी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.छगन भुजबळ ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, ॲड.अनिल परब यांनी "बांद्रा येथील शासकीय वसाहतीचे पुर्नविकास करुन शासकीय कर्मचा-यांना त्यामध्ये सामावून घेण्या बाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



निवेदनानंतर

ॲड..अनिल परब :सभापती महोदय, शासकीय कर्मचाऱ्यानी 30 - 40 वर्षे शासनाची सेवा केली असून निवृत्त झाल्यानंतर या कर्मचा-यांना शासकीय निवासस्थान सोडून मुंबई बाहेर जावे लागते. 1990 सालापासून 2000 सालापर्यंत परराज्यातून जे लोक मुंबईमध्ये राहण्यासाठी आले होते त्यांना हक्काची घरे मिळाली आहेत. शासकीय सेवेमध्ये 30 वर्षे सेवा केल्यानंतर कर्मचा-यांना हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागत आहे. शासकीय कर्मचा-याना मालकी तत्वावर घरे देण्यासबंधीचा प्रस्ताव दिनांक 17 ऑक्टोबर 2007 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर केला होता . त्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, " या इमारती 40 वर्षापूर्वी बांधण्यात आल्या असून त्या इमारती जीर्ण झालेल्या असून त्यांचा पुनर्विकास करणे गरजेचे आहे. 2005 सालच्या पुरामुळे या इमारतीची स्थिती अत्यंत वाईट झाली होती. या इमारतीच्या मेन्टेनन्सकरता दर वर्षी 5 कोटी रुपये खर्च करावे लागतात . हा भूखंड 96 एकर असून त्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या शासकीय इमारतीमध्ये वर्षानुवर्षे शासकीय कर्मचारी राहतात.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. परब ....

या इमारतींच्या पुनर्बांधणीचा प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. आपण या शासकीय कर्मचाऱ्यांचा सहानुभतीपूर्वक विचार करून तेथेच त्यांना माफक दरामध्ये, एकूण जमिनीपैकी केवळ 25 एकरामध्ये या सर्व लोकांची व्यवस्था होऊ शकते आणि तेथेच उरलेल्या जमिनीमध्ये शासनाला दुसरे काही करता येऊ शकेल. म्हणून याचा अतिशय सहानुभूतीपूर्वक विचार करून या शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांना माफक दरामध्ये घर देण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या बरोबर आहेत. परंतु या क्षणाला शासनाकडे तेथील इमारतींच्या पुनर्बांधणीचा कोठलाही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. अधिकारी वर्ग त्याच्यावर अभ्यास करीत आहे ...

ॲड. अनिल परब : तेथील शासकीय कर्मचारी आणि त्यांच्या संघटनांनी आपल्याला प्रस्ताव दिलेला आहे आणि आपण तसे निवेदनामध्ये देखील म्हटलेले आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, पुनर्बांधणी याचा अर्थ असा आहे की, या वसाहतीतील संपूर्ण इमारतींची पुनर्बांधणी करावी असा गेल्या काही महिन्यांपासून विचार सुरू आहे. आमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे तसेच एमएमआरडीएचे अधिकारी त्या प्रस्तावावर विचार करीत आहे. म्हणजे किती जागा तेथे आहे, तसेच तेथे किती बांधकाम होईल, ते कशा प्रकारे करता येईल, वगैरे अनेक बाबींचा अभ्यास केला जात आहे. त्यांचा प्रस्ताव शासनाकडे आतापर्यंत आलेला नाही. मात्र वेळोवेळी तेथे राहणारे रहिवासी आणि त्यांच्या संघटनांची निवेदने शासनाकडे आलेली आहेत, माननीय मुख्यमंत्र्यांना देखील ते या संदर्भात भेटले आहेत. मुख्यमंत्र्यांनी देखील खालच्या सदनामध्ये हा विषय आला असता सांगितले आहे की, या संदर्भात शासनापुढे हा प्रस्ताव पूर्णपणे तयार होऊन येईल तेव्हा सर्व संबंधितांशी याबाबत चर्चा करण्यासाठी त्यांना बोलाविण्यात येणार आहे आणि त्यावेळी जो निर्णय होईल तो सन्माननीय सदस्यांनाही कळविण्यात येईल.

**उपसभापती** : नियम 93 खालील निवेदनांवरील चर्चा पूर्ण झाली आहे. आता यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कामकाज पत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्र. 1 बाबत**

**उपसभापती** : आता कामकाज पत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्र.1 चर्चेला घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी आपली सूचना मांडावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, परंतु संबंधित मंत्री सदनामध्ये उपस्थित नाहीत. ..

**उपसभापती** : ठीक आहे. आपण तोपर्यंत क्रमांक 2 वर असलेली लक्षवेधी सूचना घेऊ ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हे नेहमीचेच झालेले आहे. मंत्री या सदनाला जास्त गंभीरतेने घेत नाहीत असे दिसते आहे. तेव्हा आपण सभागृहाचे कामकाज मंत्री येईपर्यंत स्थगित करावे....

**उपसभापती** : त्यापेक्षा आपण पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ या. तोपर्यंत संबंधित मंत्री सभागृहात येतील. आपण सदस्यांच्या कामकाजाबाबत देखील असे करतो, तेव्हा आपण मंत्र्यांनाही संधी देऊ. आपण सगळ्यांनाच सांभाळून घेतो ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण शासनाला खूपच सांभाळून घेत आहात. पण शेवटी किती सांभाळून घ्यायचे यालाही मर्यादा आहेत की नाही ? हे रोजचेच झाले आहे. ..

**उपसभापती** : आपली लक्षवेधी सूचना नगरविकास विभागाशी संबंधित आहेत आणि त्यावर माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे हे उत्तर देणार आहेत आणि ते नेहमीच वेळेमध्ये सदनात उपस्थित असतात ...

श्री. नितीन गडकरी : मी हे त्यांच्याबद्दल बोलत नाही तर एकूणच सरकारबद्दल बोलत आहे. ...

**उपसभापती** : मला वाटते आपण आता पुढील लक्षवेधी सूचना घेऊ. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी आपली लक्षवेधी सूचना मांडावी. ..

( माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे सदनामध्ये उपस्थित होतात. )

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला सदनामध्ये येण्यास एक मिनिटांचा विलंब झाला आहे. मी खालच्या सदनामध्ये व्यस्त असल्याने मला हा विलंब झालेला आहे. तरीही मी झालेल्या विलंबाबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. शिवाय मी नेहमीच येथे वेळेवर उपस्थित असतो, आजच माझ्याकडून हा विलंब झालेला आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता प्रथमत: क्रमांक 2 ची लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

***

..... केके 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नवी मुंबई सीबीडी पोलीस वसाहतीतील घरांची झालेल्या दुरावस्थेमुळे त्यांची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता.

**मु. शी.** : नवी मुंबई सीबीडी पोलीस वसाहतीतील घरांची झालेल्या दुरावस्थेमुळे त्यांची पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता या संबंधी श्रीमती मंदा म्हात्रे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" नवी मुंबई सीबीडी पोलीस वसाहतीत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांची अवस्था बिकट होणे, बहुतांशी घरांचे पत्रे तुटलेले असणे, तुटलेल्या पत्र्यांमुळे पावसाळ्यात घरात नेहमी मोठ्या प्रमाणात गळती होणे, त्यामुळे 24 तास ड्युटी बजावत असलेल्या पोलीस कुटुंबियांना होत असलेला नाहक त्रास, सदर वसाहतीच्या पुनर्बांधणीकरिता रूपये तीन कोटी मंजूर होऊनही पुनर्बांधणीकडे होत असलेले दुर्लक्ष, या वसाहतीकरिता 2.5 एफएसआय मिळणेबाबत त्यांनी केलेली मागणी, वारंवार आश्वासने देऊनही आश्वासनांची पूर्तता हात नसल्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाय योजना."

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...... केके 4 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील मा.गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर .. )

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, नवी मुंबईतील सीबीडी पोलीस वसाहतीमध्ये पोलिसांची जी निवासस्थाने आहेत त्यांची गेल्या महिन्यातच अंदाज समितीच्या माध्यमातून आम्ही म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, श्री.मधुकर चव्हाण इत्यादी सदस्यांनी भेट दिली होती. तेथील पोलिसांच्या निवासस्थानांची दुर्दशा पाहिल्यानंतर तेथे माणूसदेखील राहू शकत नाही अशी अगदी खुराड्यासारखी त्यांची अवस्था झालेली आम्हाला पहावयास मिळाली. सभापती महोदय, 1979 साली ही निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत आणि त्याला आता 28 वर्षे झाली आहेत. या निवेदनामध्ये या घरांच्या पुनर्बांधणीबाबत सांगितले आहे की, आम्हाला अजून यासंबंधीचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. सभापती महोदय, अंदाज समितीच्या माध्यमातून आम्ही जेव्हा तेथे भेट दिली त्यावेळी सिडकोचे अधिकारी देखील आमच्याबरोबर होते. त्यांनी आम्हाला सांगितले की, सिडको ही वसाहत पुन्हा बांधून देण्यासाठी तयार आहे. मात्र त्यासाठी त्यांना तेथे 2.5 एफएसआय दिला गेला पाहिजे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एलएल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, या अधिवेशन काळामध्ये संबंधित विभागाचे अधिकारी, सिडकोचे अधिकारी यांची एक बैठक आयोजित करण्यात येईल काय? तसेच, चटई क्षेत्र वाढवून देण्यासंबंधी आपण कोणता निर्णय घेणार आहात?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. तेथील पोलिसांची वसाहत लहान आहे. आणि नवीन नियमाप्रमाणे त्यांना मोठे निवासस्थान दिले पाहिजे. परंतु त्याकरिता जागा उपलब्ध नाही. अंदाज समितीने त्याठिकाणी दिलेल्या भेटीच्या वेळी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी समितीपुढे असे सांगितले की, त्यांच्याकडे जागा उपलब्ध आहे. त्याकरिता शासनाने अडीच एफ.एस.आय. दिला तर ते नवीन वसाहत बांधून देण्यास तयार आहेत. शासनाच्या नियमाप्रमाणे 1940 च्या अगोदरचे जे बांधकाम आहे, त्यांना आपण अडीच इतका एफ.एस.आय. देतो. तेव्हा यासंबंधी हे अधिवेशन संपण्यापूर्वी सिडकोचे अधिकारी, पोलीस विभागाचे अधिकारी, गृह विभागाचे अधिकारी आणि सन्माननीय सदस्यांची एकत्रित बैठक घेऊन या विषयावर निर्णय घेण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या अनुषंगाने मला ठाणे येथील वर्तक नगर वसाहतीसंबंधी प्रश्न विचारावयाचा आहे. तेथील पोलीस वसाहतीमध्ये राहत असलेले पोलीस कर्मचारी हे "ना घर का ना घाट का" अशा अवस्थेत आहेत. यासंबंधी अनेक अधिवेशनामध्ये अतिशय पोटतिडिकीने माननीय गृहमंत्री आणि माननीय गृहराज्यमंत्र्यांना सूचना केल्या आहेत. तेव्हा या प्रश्नामधून काहीतरी तोडगा काढला गेला पाहिजे. तेथील इमारती पडावयास आल्या आहेत. त्यामुळे कधीही अपघात होऊ शकतो. तेव्हा या प्रश्नाच्या सोडवणुकीकरिता आपल्या दालनामध्ये कधी बैठक आयोजित करण्यात येईल?

**उपसभापती** : दालनामध्ये बैठक घेण्याचा प्रश्न नाही. याठिकाणी दोन्ही विषय वेगळे आहेत. वर्तकनगर येथील वसाहतीबाबत मी अनेक वेळा सांगितले आहे. त्या संदर्भात मी पुन्हा एक-दोन गोष्टी सांगणार आहे. वर्तक नगरमधील पोलीस वसाहत नसून ती घरे गृह विभागाने पोलिसांना राहण्याकरिता म्हाडाकडून भाडयाने घेतली आहेत. आणि त्या खोल्यांचे भाडे पोलिसांकडून घेण्यात आले आहे, परंतु ती रक्कम अजून म्हाडाकडे वर्ग करण्यात आलेली नाही. पोलीस आयुक्तालयाकडून ती रक्कम म्हाडाकडे वर्ग न केल्यामुळे आजमितीला ते भाडे थकित आहे. या घरांची अवस्था अतिशय वाईट असल्याचे प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले आहे. ती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

**उपसभापती**....

निवासस्थाने दुरुस्तीच्या पलिकडे गेली आहेत. त्यामुळे ती कधीही पडतील. त्या भागामध्ये अशाप्रकारच्या अनेक इमारती एकाच वेळी बांधण्यात आल्यामुळे त्या इमारतीमध्ये राहणाऱ्या लोकांनी सहकारी संस्था स्थापन केल्या, आणि म्हाडाने ठरवून दिलेली रक्कम म्हाडाकडे भरल्यानंतर त्या जागा त्यांच्या नावावर करण्यात आल्या. अशाप्रकारची मागणी पोलीस आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांनी देखील केली, परंतु त्यांचे भाडे म्हाडाकडे वर्ग करण्यात आलेले नाही. त्यामुळे म्हाडा त्या इमारती दुरुस्त करु शकत नाही. याबाबत कर्मचाऱ्यांनी शासनाकडे केलेली विनंती खरी आहे. सदरची निवासस्थाने आमच्या नावावर करावीत, आम्ही त्या बांधून घेतो. त्याकरिता बाकीची रक्कम भरण्यास आम्ही तयार आहोत अशाप्रकारची त्यांची मागणी आहे. परंतु त्याबाबत शासन उदासीन आहे. त्याचबरोबर पोलीस गृहनिर्माण विभागाच्या कारभाराचा सुध्दा अभ्यास करण्याजोगा आहे. या पोलिसांच्या वसाहतीकरिता तीन-चार वेळा टेंडर मागविण्यात आले. परंतु प्रत्येक वेळी काही ना काही कारणास्तव ते रद्द करण्यात आले. त्यामुळे या पोलीस गृहनिर्माण वसाहतीच्या दुरुस्तीबाबत गृह विभाग आजपर्यंत विचार करु शकले नाही. एकीकडे आपण पोलिसांच्या कामगिरीबाबत मोठ् मोठया वल्गना करीत असतो. परंतु त्यांच्याकरिता जी गोष्ट करण्याजोगी आहे ती आपण करीत नाही. माननीय गृह राज्यमंत्र्यांना या संदर्भात मी किमान 25 ते 30 वेळा विनंती केली आहे. तेव्हा या संदर्भात शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावाच्या बाबतीत गृह निर्माण विभागाचे अधिकारी,

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** . . . .

पोलीस उप संचालक, ठाणे पोलीस आयुक्त, हे निर्देश नाहीत. पण आपण यातील सिरिअसनेस जरा समजून घ्यावा. तसेच पी.डब्ल्यु.डी.विभागाचे अधिकारी या सर्व संबंधितांची सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या दालनामध्ये पुढच्या आठवडयात गुरुवार, शुक्रवारच्या आत त्वरित एक बैठक बोलविण्यात यावी. तोपर्यंत या प्रकरणातील सर्व डिटेल्स् संबंधित अधिकाऱ्यांना वर्कआऊट करण्यास सांगावेत. तसेच त्याठिकाणी पोलिसांनी जी सोसायटी तयार केलेली आहे, त्याचे देखील एक-दोन पदाधिकारी या बैठकीसाठी बोलविण्यात यावेत. आणि या बैठकीमध्ये यासंबंधीचा निर्णय घेण्यात यावा असा निर्देश नव्हेतर सूचना करीत आहे आणि ही बैठक कोणत्याही परिस्थितीत पुढील शुक्रवारच्या आत बोलविण्यात यावी आणि याबाबतीत योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी अशी मी सूचना करतो. मी आता जे बोललो, ते आपल्याला मान्य आहे काय?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी प्रश्न विचारावा.

(**सभापतीस्थानी - मा.सभापती** )

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उप सभापती महोदय, वारंवार "सूचना करतो" असा शब्दप्रयोग करीत असतात. माननीय उप सभापतींची जी कुचंबणा होत आहे, त्याबद्दल मला आपल्याकडे निवेदन करावयाचे आहे.

**सभापती** : आतापर्यंत माझी कुचंबणा कधीच झालेली नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याबद्दल बोललो नाही.

**सभापती** : आतापर्यंत त्यांची कुचंबणा कधीच झालेली नाही असे त्यांनी मला जाता-जाता सांगितले.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण समजून घ्यावे. आजकाल गेल्या काही दिवसापासून त्यांच्या बोलण्यामध्ये थोडा फरक पडलेला आहे. ते ज्यावेळी पिठासीन अधिकाऱ्यांच्या आसनावरुन सूचना करतात, त्यावेळी ते असे वाक्य म्हणतात की, "मी निर्देश देत नाही, पण मी सूचना देत आहे. विनंती करीत आहे. मला हे कळत नाही की, गेल्या चार-सहा महिन्यापासून त्यांच्या बोलण्यामध्ये असा फरक का पडला आहे ? कारण सभापतीच्या आसनावरुन आपण जेव्हा

. . . .2 एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काही सांगता, तेव्हा त्या सूचना असोत किंवा काहीही असो, ते निर्देशच आहेत असा त्याचा अर्थ काढला जातो. ही आजपर्यंतची परंपरा आहे. पण उपसभापती यांना "निर्देश" हा शब्द वापरण्याच्या बाबतीत का संकोच वाटतो ? ते अशा कोणत्या दबावाखाली आहे की, ज्यामुळे त्यांना वारंवार हा शब्द वापरण्याच्या बाबतीत संकोच वाटतो. ते वारंवार असे सांगतात की, "मी तुम्हाला निर्देश देत नाही, पण मी तुम्हाला सूचना करीत आहे किंवा विनंती करीत आहे. त्यांच्यावर असे म्हणण्याची वेळ का येत आहे ? त्यांच्यावर कोणता दबाव आहे ? सभापती महोदय, ही गोष्ट बरोबर नाही. पिठासीन अधिकाऱ्यांच्या आसनावरुन सभापतींनी किंवा त्या आसनावर बसलेल्या व्यक्तींनी, मग ती व्यक्ती कोणीही असो. त्यांनी मुक्त वातावरणामध्ये सांगितले पाहिजे आणि ते शासनाला जे काही सांगतील, ते निर्देशच आहेत असा लोकशाहीमध्ये अर्थ समजला जातो. आजपर्यंत या सभागृहाची प्रथा, परंपरा अशीच आहे की, शासनही ते निर्देश आहेत असे समजून त्याचे पालन असते. त्यामुळे माननीय उपसभापती यांची कुचंबणा झालेली आहे आणि ते काही बरोबर नाही. त्यांच्या मनाला धक्का बसला आहे काय ? त्यांचे मन दुखावलेले आहे काय ? कोणी त्यांच्या मनाला दु:ख दिलेले आहे काय ? कारण मला ते पहावत नाही. म्हणून माझी विनंती अशी आहे की, यानंतर सदनामध्ये माननीय उपसभापती जे काही बोलतील, ते निर्देश म्हणूनच समजण्यात यावेत आणि शासनाने त्याचे पालन करावे. तसेच माननीय उपसभापतींचा, त्यांच्या पदाचा सन्मान ठेवावा त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव निर्माण करणे योग्य होणार नाही. अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी शासनाच्यावतीने एवढेच सांगतो की, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आता जे वक्तव्य केलेले आहे, ते पिठासीन अधिकाऱ्यांबद्दल केलेले आहे. लोकशाहीमध्ये सभागृहाला या आसनाबद्दलचा आदर निश्चितपणे आहे आणि पिठासीन अधिकारी म्हणून माननीय उपसभापती यांना निर्देश देण्याचा अधिकारही आहे. त्यामुळे शासनाचे याबाबतीत अतिशय स्पष्ट धोरण आहे आणि आतापर्यंतच्या प्रथा, परंपरेनुसार पिठासीन अधिकाऱ्यांच्या आसनावरुन दिलेल्या निर्देशांचे पालन केलेच जाते.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, नवी मुंबईतील पोलीस वसाहतींच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. या वसाहती अशा आहेत की, जेथे 10x10 ची खुराडी बांधली गेली. जेथे प्रचंड प्रमाणात प्रदूषण आहे. जेथे सर्व सुविधा नाहीत. तेथे कोणीही रहावयास गेलेले नाहीत.



**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, शासनाने निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"सी.बी.डी. पोलीस वसाहतीकरता 2.5 एफ.एस.आय.मिळण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही." स्वत:हून हा प्रस्ताव कोण देणार आहे ? याबाबतीत गृह विभागाने स्वत:हून पुढाकार घेतला पाहिजे. पण याठिकाणी दोन विभागांमध्ये गोंधळ आहे. गृह विभागकडून सांगितले जाते आणि सार्वजनिक बांधकाम विभाग तेथे बांधकाम करीत असते. म्हणून यामध्ये गृह विभागाने स्वत:हून पुढाकार घेतला पाहिजे आणि या वसाहतीची पुनर्रचना करण्यासंबंधीच प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाला केव्हा देणार आहात ? तसेच तो व्हाएबल करण्यासाठी आपल्याला 2.5 एफ.एस.आय.मिळाल्यास येथे पोलिसांसाठी मोठी घरे बांधून चांगली वसाहत निर्माण करता येईल. त्यासाठी आपण प्रयत्न करणार आहात काय ?

यानंतर कु.गायकवाड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ MMP/ 14:15

श्री. अरविंद सावंत..

पोलीस कर्मचाऱ्यांकरिता चांगल्या वसाहती बांधण्यात येतील या दृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, या संबंधी चर्चा करण्याकरिता बैठक घेण्यात येणार आहे. सिडको, बांधकाम विभाग, गृह विभाग व म्हाडा यांच्या अधिकाऱ्यांशी अधिवेशन संपण्याच्या आत एक बैठक घेण्यात येणार आहे. ही बैठक उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सभापती व माननीय उपसभापती माननीय मंत्र्यांच्या कार्यालयात जात नाहीत. म्हणून ही बैठक माननीय उपसभापतींच्या कार्यालयात घेण्यात यावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे. ही बैठक माननीय उपसभापतींच्या कार्यालयात घेण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सीबीडी पोलीस वसाहतीकरीता 2.5 एफएसआय मिळणेबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही असे निवेदनामध्ये म्हटले आहे. मी आपणास सांगू इच्छिते की, पोलीस आयुक्तालयातून हा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी नोंद घ्यावी. तसेच हे अधिवेशन संपण्याच्या आत यासंदर्भात बैठक घेण्यात येणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेण्यात येईल असे मी यापूर्वी देखील सांगितले आहे.

----------------

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिडकोने वाशी नवी मुंबई येथे विकासकास विना निविदा भूखंडाचे वाटप करणे

**मु. शी.** : सिडकोने वाशी नवी मुंबई येथे विकासकास विना निविदा भूखंडाचे वाटप करणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवी मुंबई महानगरपालिकेंतर्गत वाशी मधील सेक्टर-३० ए, भूखंड क्र. ३९/१, ३९/६ ते ३९/१५ हे भूखंड के. रहेजा या विकासकास विनानिविदा वाटप करण्यात आल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल होणे, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानंतर तत्कालीन बाजारभावानुसार के.रहेजा या विकासकाकडून रक्कम वसूल करण्याची कारवाई ऑगस्ट, २००७ पासून सिडकोने सुरु करणे, तथापि अद्यापपावेतो सदर कारवाई अपूर्णच असणे, सिडकोने सदर भूखंडाचे विनानिविदा वाटप करणे, के.रहेजा या विकासकास कमी भावात भूखंड दिल्यामुळे शासनाचे झालेले नुकसान, हे शासनाने मान्य केल्यानंतर देखिल त्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द, सिडकोच्या संचालकांविरुध्द तसेच रहेजा या विकासकाविरुध्द कोणत्याही प्रकारची कठोर कारवाई न होणे, त्यामुळे ही कारवाई तातडीने होण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व याबाबत शासनाची भूमिका."

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माझी एक हरकत आहे. ज्या शब्दामध्ये, मी लक्षवेधी सूचना विधी मंडळाच्या कार्यालयात दिलेली होती ते शब्दच बदलले आहेत. तसेच काही वाक्ये संपूर्णपणे बदललेली आहेत.

सभापती महोदय, मूळ लक्षवेधी सूचना अशी होती की, " सिडकोने विनानिविदा हे भूखंड वाटप केल्यास शासनास ते फायदेशीर होणार नाही, असे सिडकोततील एका अधिकाऱ्याने शासनाला सादर केलेल्या टिप्पणीत नमूद करणे, दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी विधानपरिषदेत नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मा. मुख्यमंत्री महोदयांनी के. रहेजा या विकासकास कमी भावात भूखंड दिल्यामुळे शासनाचे नुकसान झाले आहे हे मान्य केल्यानंतर देखील त्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द, सिडकोच्या संचालकाविरुध्द तसेच रहेजा या विकासकाविरुध्द कोणत्याही प्रकारची कठोर कारवाई न होणे, त्यामुळे ही कारवाई तातडीने होण्याची आवश्यकता तसेच के. रहेजा या विकासकास यानंतरच्या काळात शासनाचे कोणतेही काम वा कोणतीही जमीन मिळू नये यासाठी तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष व याबाबत शासनाची भूमिका "

सभापती महोदय, विधी मंडळ कार्यालयातून जी लक्षवेधी सूचना येथे देण्यात आलेली आहे, ती बदलण्यात आलेली आहे. मूळ विषय रेकॉर्डवर येऊ नये याकरिता ती लक्षवेधी सूचना बदलण्यात आलेली आहे असे मला वाटते. मूळ लक्षवेधीचे दोन कागद मी आपल्याकडे पाठवितो. आम्ही कार्यालयामध्ये ज्या लक्षवेधीच्या सूचना देतो त्या नंतर बदलल्या जातात व त्याच्यातील मूळ गाभा बदलला जातो. या संदर्भात चौकशी झाली पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाला मदत करणारे कोण आहेत ?

**सभापती** : सरकारला मदत करणारे विधी मंडळ सचिवालयामध्ये कोणी असण्याची शक्यता नाही. लक्षवेधीची सूचना विधी मंडळ सचिवालयातून एडीट केली जाते. एखादी लक्षवेधीची सूचना मोठी असेल तर ती एडीट केली जाते. ही बाब मी तपासून बघतो.

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : विषयातील गाभाच निघून गेल्यास काय अर्थ आहे ?

**सभापती** : दोन पानांची सूचना असेल तर ती एडीट केली जाते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सूचनेतील चार वाक्ये गाळून टाकण्यात आलेली आहेत.

**सभापती** : नियमाप्रमाणे काही वेळा सूचना एडीट करणे आवश्यक असते. विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जी बाब निदर्शनास आणून दिलेली आहे, ती बाब मी तपासून पहातो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मूळ लक्षवेधी सूचना या साठी देण्यात आली होती की, नवी मुंबई, वाशी सेक्टर नंबर 30 मध्ये, 30621 भूखंडाचे विना निविदा वाटप करण्यात आले होते. 1.5 एफएसआय असताना 3 एफएसआय वाढवून देण्यात आलेला आहे. भूखंडाचे वाटप करीत असताना निविदा काढलेल्या नाहीत. के. रहेजा या विकासकास हा प्लॉट निविदा न काढता तसाच देण्यात आलेला आहे. हा भूखंड सॉफ्टवेअर करीता आरक्षित करण्याच्या अटी घातलेल्या होत्या. परतु भूखंडाचे आरक्षण बदलण्यात आले आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, हा प्लॉट देण्यात येऊ नये अशी टिप्पणी एका अधिकाऱ्याने केलेली होती आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा मागच्या चर्चेच्या उत्तरात असे सांगितले होते की, असे जर झाले असेल आणि शासनाचे यामध्ये 1 हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले असेल तर निश्चितपणे ते थांबविले जाईल. त्यानंतर पी.एल.आय. दाखल झाली. कोर्टाने "जैसे थे" आदेश दिले. कोर्टाने "जैसे थे" आदेश दिल्यानंतर त्या अधिकाऱ्यांनी संगनमत केले. हे कोण अधिकारी आहेत ? याची चौकशी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून केली पाहिजे. त्यांनी कोट्यवधी रुपयांची प्रॉपर्टी जमवली आहे. त्यांनी या बांधकामाला गती दिली. यासंदर्भात शंकरन समिती नेमली होती. त्या समितीने सांगितले की, हा प्लॉट देऊ नका, यामध्ये शासनाचे नुकसान होत आहे. यासंदर्भात धोंगडे समिती नेमली. माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा सांगितले. यामध्ये इतका अट्टहास का ? त्या ठिकाणी शंकरन समितीचे ऐकले जात नाही, धोंगडे समितीचे ऐकले जात नाही, माननीय मुख्यमंत्र्यांचे ऐकले जात नाही. अधिकारी इतके मस्तवाल आहेत की ते कोणाचेही ऐकण्यास तयार नाहीत. शासनाचे 1 हजार कोटी रुपयांचे नुकसान करीत आहेत. त्या अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार काय ? हा जो प्लॉट दिलेला आहे तेथील बांधकाम त्वरित थांबविणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, याबाबत जर सविस्तर माहिती सांगितली तर सभागृहाला हा विषय समजेल असे मला वाटते. या प्लॉटचा इतिहास असा आहे की, मधल्या काळामध्ये हा सगळा परिसर आयटी परिसर ठरविण्यात आला होता. या आयटी परिसरामध्ये या प्लॉटच्या आजूबाजूचे प्लॉट्स काही प्रमाणात आयटीसाठी विकले गेले होते. 2003 च्या दरम्यान आयटीमध्ये डाऊनफॉल झाल्यामुळे सिडकोने काही भाग कमर्शियल प्लस रेसिडेंशियल असा केला. ज्यावेळी या प्लॉटच्या बाबतीत टेंडर काढले त्यावेळी टेंडरला प्रतिसाद मिळाला नाही. त्यावेळी अलॉटमेंट ऑन ॲप्लिकेशन बेसिस नुसार ज्यांनी अर्ज केले त्यांची क्रेडिटिबिलिटी बघून त्यावेळी जे लँड डिस्पोजल रुल्स होते त्यानुसार अलॉटमेंट ऑन ॲप्लिकेशन बेसिस या तत्वाने हा प्लॉट रहेजा यांना 2003 मध्ये देण्यात आला. त्यांना 1.5 एवढा एफएसआय देण्यात आला. त्यावेळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. राजेश टोपे .....

रिझर्व्ह प्राईस 10 हजार रुपये प्रती चौरस मीटर होती. त्यांना हा प्लॉट 10225 रुपये प्रती चौरस मीटर प्रमाणे दिलेला आहे. त्यानंतर पीएलआय झाली. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये कोर्टाने स्पष्टपणे या सगळ्या गोष्टीला स्थगिती दिली. त्यानंतर सिडकोच्या वतीने जे ॲफिडेव्हिट दाखल करण्यात आहे त्या आधारावर कदाचित कोर्टाला असे वाटले असेल. डिसेंबर, 2003 ला पी.एल.आय. दाखल केली होती. कोर्टाने 18.3.2004 ला स्थगिती दिली आणि 23.4.2008 ला स्टे व्हॅकेट केला. तो स्टे व्हॅकेट केल्यानंतर ज्या तक्रारी आलेल्या होत्या त्या शासनाने तशाच ठेवल्या नाहीत. या सगळ्या प्रकरणाची चौकशी शंकरन समितीच्या माध्यमातून तत्परतेने करण्यात आली. शंकरन समितीने अतिशय स्पष्ट सांगितले की, रहेजाच्या या प्लॉटमध्ये 50 कोटी रुपयांचे नुकसान झाले. त्या नुकसानीच्या अनुषंगाने त्या समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्यामध्ये हा प्लॉट रद्द करावा तसेच या प्लॉटच्या संदर्भात झालेले नुकसान सुध्दा संबंधिताकडून घ्यावे असे स्पष्ट सांगितले आहे. शंकरन समिती नेमली होती त्या समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आणि त्या अनुषंगाने सिडकोला ही कारवाई करण्यास सांगितले. परंतु कोर्टातील केस पेंडींग होती. यामध्ये कोर्टाने अंतिम निर्णय दिलेला नव्हता. कोर्टाने फक्त स्टे व्हॅकेट केला होता. सिडकोने कोर्टात ॲफिडेव्हिट दाखल केले त्यामध्ये लॅंड डिस्पोजल रुल्स प्रमाणे प्लॉटचे वाटप केलेले आहे असे म्हटले आहे. हे ॲफिडेव्हिट सिडकोने अगोदर दाखल केलेले होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 14:25

श्री.राजेश टोपे.....

शासनाने असे सुचविले आहे की, आता आम्ही शंकरन समितीच्या शिफारशी मान्य केलेल्या आहेत, या पध्दतीने कार्यवाही करावी. पण हे विसंगत होत असल्यामुळे सिडकोचे प्रतिज्ञापत्र आजही कोर्टामध्ये आहे. त्या प्रतिज्ञापत्रात असे नमूद केले आहे की, आम्ही लॅण्ड डिस्पोजल रुलप्रमाणे निर्णय घेतला आहे. परंतु कोर्टाने शासनाला प्रतिज्ञापत्र सादर करावे असे असे म्हटल्यावर शासनाने ॲफिडेव्हिटमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, आम्ही शंकरन समितीच्या शिफारशी स्वीकारलेल्या आहेत. हा प्लॉट रद्द करण्याच्या आणि लॉस रिकव्हर करण्याच्या दृष्टीकोनातून सूचना दिलेल्या आहेत. यातील शासनाची भूमिका काय आहे ? शासनाने शंकरन समिती मान्य केलेली आहे, तिच्या शिफारशी मान्य केलेल्या आहेत. कोर्टासमोर जानेवारी, 2008 मध्ये ॲफिडेव्हिटच्या माध्यमातून निदर्शनास आणलेले आहे की, हे नुकसान झालेले आहे या नुकसानीची भरपाई व्हावी. ही शासनाची भूमिका आहे. शंकरन समितीच्या शिफारशी शासनाने मान्य केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाही करावी अशा सूचना केलेल्या आहेत. ॲफिडेव्हिटच्या माध्यमातून शासनाने कोर्टाला विनंती केली आहे की, तातडीने निर्णय द्यावा. माननीय कोर्टात हियरिंग चालू आहे. त्यात जो काय निर्णय दिला जाईल त्याप्रमाणे पुढील कार्यवाही केली जाईल. शंकरन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी अशा पध्दतीची शासनाची भूमिका राहील.

श्री.पांडुरंग फुंडकर : कोर्टाने अधिका-यांवर कारवाई करु नका असे म्हटलेले नाही. ज्या या प्लॉटवरील आरक्षण बदलले आहे. शासनाच्या निदर्शनास आणले की किंमत कमी झाल्या आहेत, त्यामुळे या प्लॉटला कमर्शिअल करण्यात यावे. असे सांगून या अधिका-यांनी आपली दिशाभूल केली आहे आणि शंकरन समितीने ही दिशाभूल मान्य केली आहे. कोर्टाने अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यास रोखलेले नाही. प्लॉट देण्यात येऊ नये असे नोटवर अधिका-यांनी लिहिलेले आहे. माझ्याकडे रेकॉर्ड आहे. हा प्लॉट निविदेशिवाय देण्यात येऊ नये असे लिहिलेले असताना सुध्दा हा निर्णय घेण्यात आला. असा निर्णय घेणारे अधिकारी कोण आणि त्या अधिका-यांविरुध्द काय कारवाई करणार ? त्यांचे बांधकाम थांबविणार आहे काय ? कोर्टाने बांधकाम थांबविण्यास सांगितले आहे काय ? छोटया प्लॉटला चांगली डिमांड आहे, असे चीफ एकोनॉमिस्ट यांनी स्पष्ट अभिप्राय दिले आहेत हे खरे आहे काय ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सध्या या प्लॉटवरील बांधकामाची काय स्थिती आहे याबाबत प्रश्न विचारण्यात आला आहे. सध्या हे बांधकाम पूर्ण होऊन पडलेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये हा प्लॉट आहे. ओ.सी.देण्याचा अधिकार नवी मुंबई महानगरपालिकेचा आहे. त्याची एनओसी सिडकोकडून घ्यावी लागते. परंतु त्यांना एन.ओ.सी., ओ.सी.दिलेली नाही. ओ.सी.नसल्यामुळे संबंधितांनी कोणलाही ते गाळे विकलेले नाहीत. ती इमारत आहे त्या परिस्थितीमध्ये आहे. त्यामध्ये कोणीही वास्तव्य करीत नाही. ती विकलेली नाही. यासंबंधात अधिका-यांविरुध्द काय कारवाई केली जाणार आहे असा प्रश्न सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारला आहे. मी शासनाची भूमिका काय आहे ते सांगितलेले आहे. सध्या हा विषय कोर्टात आहे. कोर्टाने असे सांगितले की, हे सर्व प्रकरण योग्य आहे, त्यामध्ये कोणाचाही दोष नाही. एक्झिास्टिंग लॅण्ड डिस्पोजल पॉलिसीप्रमाणे वाटप झाले आहे. यामध्ये कोणालाही दोषी धरण्याचे कारण नाही, जे काय झालेले आहे ते योग्य झालेले आहे असे कोर्टाने सांगितले तर अधिका-यांकडे दोष जात नाही. आज कोर्टाला सर्व परिस्थिती सुस्पष्ट करण्यात आलेली आहे. शासनाने कमिटी नेमली होती त्या समितीमुळे नुकसान झालेले आहे, चुकीचा निर्णय झालेला आहे असे कोर्टाचे आदेश आले तर.....

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:30

(श्री. राजेश टोपे....

दोषी अधिका-यांवर कारवाई करण्याच्या संदर्भात शासन कुणालाही पाठिशी घालणार नाही. ही बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून कारवाई करण्याचा निर्णय घेतला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सरकारने शंकरन समिती नेमली होती. या समितीने हे चुकीचे झाल्याचा रिपोर्ट दिलेला आहे. त्यामुळे कारवाईच्या संदर्भात कोर्टाचा काही संबंध येत नाही. शंकरन समितीच्या अहवालानंतर या सभागृहामध्ये नियम 289 च्या प्रस्तावाच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी कारवाई करण्याचे या सभागृहामध्ये कबूल केलेले आहे. असे असताना आपण या अधिका-यांना वाचविण्याचा प्रयत्न कशासाठी करीत आहात ?

श्री. राजेश टोपे : मी सांगू इच्छितो की, प्रायमाफेसी असे वाटले की हे चुकीचे आहे त्यामुळे कोर्टाने स्टे दिला. ॲफेडेव्हिट आल्यानंतर कोर्टाने स्टे व्हेकेट केला. मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचा मान राखून सांगू इच्छितो की, यामध्ये अधिका-यांना पाठीशी घालण्याचे कारण नाही. 50 कोटीचे नुकसान झाल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. शंकरन समितीचा अहवाल मान्य केलेला आहे. प्लॉट दिल्यानंतर तो रद्द करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने सिडकोला कळविलेले आहे. याबाबतीत जे जे लोक दोषी असतील त्यांच्यावर कारवाईस कोणतीही कसूर करण्याचे कारण नाही. कंटेप्टचा विषय होऊ नये म्हणून ही बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून देऊन कारवाई करावी लागेल.....मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, अधिका-यांवर कारवाई करण्यास शासन मागेपुढे पहाणार नाही. याबाबतीत कायदेशीर सल्ला घेऊन ताबडतोबीने कारवाई केली जाईल.

श्री. जगदीश गुप्ता : माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून रेकॉर्डवर असे आलेले आहे की, शासनाचे ॲफेडेव्हिट वेगळे आहे आणि सिडकोचे वेगळे आहे. महाराष्ट्र शासनाच्या अधिकाराखाली सिडको काम करीत असेल तर मग शासनाची दोन वेगवेगळी ॲफिडेव्हिट कोर्टामध्ये सादर झालेली आहेत आणि याचा फायदा बिल्डरला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा जे अफिडेव्हिट शासना तर्फे कोर्टात दाखल करण्यात आलेले आहे तेच ॲफिडेव्हिट सिडकोने न्यायालयात दाखल करण्यात काय हरकत आहे ? शासनाने समितीचा अहवाल स्वीकारलेला आहे. त्या अहवालामध्ये एखाद्या अधिका-याला दोषी ठरविलेले असेल तर त्या अधिका-यावर कारवाई करण्यामध्ये शासन संकोच का करीत आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारलेला आहे. मी एवढेच सांगेन की, सिडको ही एक स्वतंत्र बॉडी आहे. आधी लँण्ड डिस्पोझल रुल्स प्रमाणे मे.रहेजा कन्स्ट्रक्शन कंपनीला दिलेल्या प्लॉटच्या संदर्भात ॲफिडेव्हिट दाखल करण्यात आले. त्याच्या विरोधाभास असणारे ॲफिडेव्हिट पुन्हा दाखल करता येणे शक्य नाही असे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. म्हणून वेगळे ॲफिडेव्हिट करण्यात आले. शासनाने कोर्टापासून काही लपविलेले नाही. या प्रकरणी कोर्टाने निर्णय द्यावा असे शासनाने सांगितलेले आहे. कायदेशीर सल्ला घेऊनच कारवाई करावी लागेल. कोर्टाच्या आदेशास कोठेही प्रतिबंध होत नसेल तर ती कारवाईसुध्दा करण्यात येईल.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 14:35

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मे.रहेजा कॉर्पोरेशनला सिडकोच्या अधिका-यांनी अतिशय चुकीच्या पध्दतीने प्लॉट दिला. त्यासंदर्भात सरकारने कमिटी नेमली होती आणि त्या कमिटीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर भूखंड रहेजा कॉर्पोरेशनला दिल्यामुळे शासनाचे 50 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. तसा अहवाल देखील शासनास प्राप्त झाला आहे. ज्या अधिका-याने शासनाचे 50 कोटी रुपयांचे नुकसान करुन रहेजा कॉर्पोरेशनला भूखंड दिला ते अधिकारी कोण आहेत आणि त्या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, हा प्रश्न पुन्हा रिपीट होत आहे. या प्रकरणी कोर्टाचा अवमान होऊ नये म्हणून कायदेशीर सल्ला घेतला जाईल आणि या प्रकरणात जे कोणी दोषी अधिकारी असतील त्यांच्याविरुध्द निश्चितपणे कारवाई केली जाईल. हा भूखंड नेमक्या कोणत्या अधिका-यांनी वितरीत केला हे सांगणे कठीण आहे. लॅन्ड डिस्पोजल रुलप्रमाणे अशा प्रकारचे भूखंड वितरीत करण्याचे अधिकार सिडकोच्या एम.डी.ना आहेत, जॉईंट एम.डी.ना आहेत, तसेच सिडकोच्या बोर्डाला देखील आहेत. हा भूखंड देण्याचा निर्णय सिडकोच्या बोर्डाने घेतलेला होता.

----------

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक-3 बाबत</u>**

**सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 3 ही सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांची आहे. ती लक्षवेधी सूचना पुढील आठवडयातील मंगळवारी घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : ठीक आहे.

------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या परिपोषण आहार अनुदानात वाढ करणे

**मु. शी.** : सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या परिपोषण आहार अनुदानात वाढ करणे यासंबंधी सर्वश्री मोहन जोशी, संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्यायमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सुमारे १ लाखापेक्षा जास्त मुला-मुलींना शासनमान्य अनुदानित वसतिगृहांच्या माध्यमातून मोफत भोजन, निवास व शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणे, त्यासाठी विविध संवर्गातील सुमारे ८१०४ कर्मचारी २४ तास राबत असणे, दिनांक १/०४/२००२ पासून संस्थांमधील प्रवेशितांच्या भोजनावरील खर्च भागविण्यासाठी दरडोई ५०० रुपये परिरक्षण अनुदान दिले जाणे, यासंबंधातील शासन निर्णयामध्ये परिपोषण अनुदानाचा दर प्रत्येक वर्षी ग्राहकमूल्याशी निगडीत इतका सुधारित करण्यात यावा असे स्पष्ट म्हटले असतानाही गेल्या ६ वर्षामध्ये त्यानुसार वाढ झालेली नसणे, दिनांक ९/०२/२००७ रोजी रुपये ५०० ऐवजी ६०० परिपोषण अनुदान करण्याचा निर्णय होणे, परंतु तो फक्त अनुसूचित जाती व विमुक्त, भटक्या जमातीच्या आश्रमशाळांसाठीच लागू करणे, यासंबंधात शुध्दीपत्रक काढण्याचे आश्वासन विभागीय सचिवांनी देऊनदेखिल शुध्दीपत्रक काढले न जाणे, अनुदानित वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी नियमित वेतनश्रेणी देण्याची मागणी दिर्घकाळ प्रलंबित असणे, परिणामी अनुदानित वसतीगृहातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांवर ओढवलेली उपासमारीची पाळी, त्यांच्यात पसरलेला असंतोष, यासबंधात शासनाने लक्ष घालून छात्र व कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याची पुणे जिल्हा अनुदानित वसतिगृह संस्था चालक संघटनेची मागणी व याबाबत शासनाची कार्यवाही तसेच उपाययोजना."

..3..



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 14:35

श्री.चंद्रकांत हंडोरे( सामाजिक न्यायमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणेच परिरक्षण अनुदान रुपये 630 करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्याच प्रमाणे मागासवगर्वीय मुलामुलींच्या अनुदानित वसतिगृहातील कर्मचा-यांना विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील वसतिगृहाच्या कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव देखील शासनाच्या विचाराधीन आहे. प्रस्ताव विचाराधीन आहेत म्हणजे काय ? या प्रस्तावांची सद्य:स्थिती काय आहे ? जे प्रस्ताव विचाराधीन आहेत त्यांची अंमलबजावणी साधारणत: किती कालावधीत करण्यात येणार आहेत ?

श्री. चंद्रकांत हंडारे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाकडून विद्यार्थ्यांना परिपोषण आहारासाठी 500 रुपये दिले जातात. विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी गेल्या वर्षी परिपोषण आहारासाठी 500 रुपये अनुदान देण्यात येत होते, ते अनुदान आता 600 रुपये करण्यात आले आहे. सामाजिक न्याय विभागाने या विद्यार्थ्यांसाठी परिपोषण आहाराच्या अनुदानात वाढ करण्यात यावी अशा प्रकारचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर केला आहे. परिपोषण आहारसाठी 500 रुपये ऐवजी 630 रुपये अनुदान देण्यात यावे अशी मागणी सामाजिक न्याय विभागाने वित्त विभागाकडे केली होती. ती मागणी वित्त विभागाने मंजूर केली आहे. दिनांक 1 एप्रिल, 2008 पासून प्रति विद्यार्थ्यास दरमहा 630 रुपये परिपोषण आहार अनुदान दिले जात आहे.

सन्माननीय सदस्यांच्या दुस-या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, या वसतिगृहांमध्ये अधीक्षक, स्वयंपाकी, पहारेकरी या कर्मचा-यांना वेतनश्रेणीवर आणण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. हा प्रस्ताव विचाराधीन असण्यामागचे कारण असे आहे की, या वसतिगृहांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांची संख्या फार मोठी आहे. या राज्यात 2388 अनुदानित वसतिगृहांमधील अधीक्षक, स्वयंपाकी, पहारेकरी या कर्मचा-यांची संख्या 8 हजारापेक्षा जास्त आहे. हे बिचारे कर्मचारी गेल्या 20 ते 25 वर्षापासून 200 ते 400 रुपये एवढया तुटपुंज्या मानधनावर काम करीत होते.

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे ....

स्वयंपाक्याला तर कुठल्याही प्रकारचे मानधन नव्हते. मी मंत्री झाल्यानंतर अधीक्षक, पहारेकरी, स्वयंपाकी अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सहानुभूतिपूर्वक विचार करुन 400 रुपयाचे 600 रुपये केले. जवळजवळ पाच पटींनी अनुदान वाढविले आहे. 600 रुपयांचे 3000 रुपये केले. स्वयंपाक्याला 500 रुपये मिळत होते त्याला 2500 रुपये केले. मदतनीस, चौकीदार यांना 2000 रुपये केले. दोन वर्षात 20 कोटींचा बोजा सामाजिक न्याय विभागावर पडला. परंतु या कर्मचाऱ्यांची मेहनत लक्षात घेऊन 20 कोटी रुपये द्यावयाचे ठरविले. सभापती महोदय, दुसरा प्रश्न विचारला होता की, भटक्या आणि विमुक्त जातीच्या आश्रमशाळातील कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी दिली जाते, आदिवासी शाळांमधील कर्मचाऱ्यांना दिली जाते. या दोन्ही विभागातील आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी दिली जाते मग या शाळांमधील कर्मचाऱ्यांवर अन्याय का ? सभापती महोदय, या शाळांमधील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करुन दिली आहे. परंतु त्यांची दुसरी मागणी अशी होती आणि ते माझ्याकडे सातत्याने अर्ज विनंत्या करीत होते म्हणून या शाळांमधील कर्मचाऱ्यांना सुध्दा नियमित वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला होता. परंतु हा प्रस्ताव मान्य केला तर मोठा बोजा राज्य शासनावर पडणार आहे. जवळजवळ 60 कोटींचा बोजा पडणार आहे. सध्या आमचा विभाग यासाठी 24 कोटी रुपये खर्च करीत आहे. परंतु या कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणीवर आणण्यासाठी 36 कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. म्हणजे एकूण 60 कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. तरीसुध्दा वित्त विभागाकडे पुन्हा प्रस्ताव पाठविल्यानंतर त्यांनी नामंजूर केला. आता वित्त विभागाने जरी प्रस्ताव नामंजूर केला असला तरी धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे मंत्रिमंडळापुढे हा विषय घेण्यात येणार आहे. निश्चितपणाने या कर्मचाऱ्यांना सुध्दा नियमित वेतनश्रेणी लागू करण्याच्या बाबतीत अत्यंत सहानुभूतिपूर्वक विचार केला जाईल. म्हणूनच मी म्हटले आहे की प्रस्ताव विचाराधीन आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून मंत्रीमहोदयांना धन्यवाद देतो.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, महाराष्ट्रातील मागासवर्गीय विद्यार्थी शासनमान्य अनुदानप्राप्त वसतिगृहांमधून राहतात त्यांना दरमहा 500 रुपये अनुदान दिले जाते. 2002 मध्ये शासनाने यासंदर्भात जीआर काढला असून महागाई निर्देशांकाप्रमाणे त्यात वाढ होईल असे म्हटले

.......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ...

होते. परंतु तो फरक अद्याप वसतिगृहांमधील मुलांना मिळालेला नाही. लक्षवेधी विचारण्याचा मूळ उद्देश फरकाची रक्कम मिळण्याचा होता. मी माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, सध्या मिळत असलेल्या 500 रुपयांच्या अनुदानात महागाईमुळे दोन वेळचे जेवण,नाष्टा देणे परवडत नाही. जून महिन्यापासून नवीन आर्थिक वर्ष सुरु होणार आहे. त्यावेळेपासून शासन या अनुदानात वाढ करणार आहे काय ? हे अनुदान वाढविले नाही तर मागासवर्गीय वसतिगृहे बंद पडतील आणि सर्व विद्यार्थ्यांसमोर मोठा प्रश्न उभा राहील.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, 1.4.2000 पासून प्रत्येक विद्यार्थ्यामागे भोजनाचा खर्च भागविण्यासाठी 500 रुपये अनुदान देतो. ज्या वसतिगृहाला अनुदान मिळाले नसेल त्याची माहिती द्यावी. अनुदान का मिळाले नाही याची चौकशी करण्यात येईल आणि ते दिले जाईल. मी यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, 1.4.2008 पासून 500 रुपयाऐवजी 630 रुपये परिपोषण आहारासाठी देण्यात येणार आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी प्रश्न विचारला होता की, महागाई निर्देशांकाबरहुकुम अनुदानामध्ये वाढ होईल असा जीआर काढला होता.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, महागाई निर्देशांकाप्रमाणेच 630 रुपये अनुदान करण्यात आले आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, वसतिगृहामध्ये राहणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. त्यांच्या वेतनश्रेणीतील तफावतीचा हा प्रश्न आहे. मंत्रीमहोदयांनी मान्य केले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. दुसरा प्रश्न असा आहे की, शासकीय वसतिगृहे आणि अनुदानित वसतिगृहे आहेत......

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4........ श्री.रामनाथ मोते.........

त्या ठिकाणी सारख्या प्रमाणात कर्मचारी मंजूर केले जातात. अनुदानित वसतिगृहे आणि शासकीय वसतिगृहांमध्ये जे कर्मचारी मंजूर केले जातात त्यामध्ये तफावत आहे का? तफावत असेल तर ती दूर होण्यासाठी विद्यार्थी संख्येप्रमाणे कर्मचारी मंजूर केले जातात त्यामुळे शासकीय वसतिगृहामध्ये जेवढे कर्मचारी मंजूर केले जातात तेवढेच कर्मचारी अनुदानित वसतिगृहामध्ये मंजूर केले जातील काय?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, अनुदानित वसतिगृहांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे. जवळजवळ 2388 अनुदानित वसतिगृहे आहेत. शासकीय वसतिगृहांची संख्या फक्त 271 आहे. त्यामुळे अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांची संख्या मोठी असल्यामुळे फार मोठे बर्डन येणार आहे. तरी सुध्दा आम्ही प्रयत्न करणार आहोत. शासकीय वसतिगृहातील कर्मचारी आणि अनुदानित वसतिगृहातील कर्मचारी यांच्या संदर्भात तफावत असेल तर ती तपासून पाहिली जाईल आणि समान करण्यासाठी प्रयत्न केले जातील.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना मी धन्यवाद देतो. महागाई निर्देशांकानुसार परिरक्षण अनुदान 500 ऐवजी 630 रुपये केले. परंतु ते 630 ऐवजी 730 रुपये असावसास पाहिजे. महाराष्ट्र शासनाने पहिल्यांदा महाराष्ट्राच्या इतिहासात 2500 कोटी रुपयांची तरतूद सामाजिक न्याय विभागाला उपलब्ध करुन दिली. परंतु आर्थिक बाबतीत सर्व नाड्या वित्त विभागाच्या हातात आहेत. वित्त विभागात कोणतीही नस्ती गेल्यानंतर ऑब्जेक्शन घेतले जाते याची मला कल्पना आहे. अशा वेळेला कॅबिनेटमध्ये मंत्रीमहोदयांनी कणखरपणा दाखविला पाहिजे. आज महात्मा फुले यांची जयंती आहे. प्रश्न विचारणारे आणि प्रश्नाला उत्तर देणारे कोण आहेत याचा विचार करुन या समाजाला न्याय मिळाला पाहिजे. त्यामुळे महागाई निर्देशांकानुसार परिरक्षण अनुदान जास्तीत जास्त 1000 रुपये केले पाहिजे अशी माझी विनंती आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : तपासून पाहिले जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, 15 अतिसंवेदनशील जिल्हे आहेत, आदिवासी विभागाचा वेगळा पैसा या वसतिगृहांसाठी येतो, तो पैसा जातो कुठे? सामाजिक न्याय विभागाकडून तो पैसा वापरला जातो. परफॉर्मन्स बजेटमध्ये त्याच हेडखाली हे पैसे दिले जातात. हा पैसा जातो कुठे? किती प्रमाणात हा पैसा सामाजिक न्याय विभागाकडे येतो?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4........

श्री.चंद्रकांत हंडोरे : आदिवासी विकास विभागाचा नियतव्यय सामाजिक न्याय विभागाला मिळत नाही.

**सभापती** : शासनामध्ये सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभागासाठी वेगवेगळा नियतव्यय दिला जातो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, परफॉर्मन्स बजेटमध्ये अनुसूचित जातीच्या वसतिगृहांसाठी पैसा दिला आहे, तो पैसा कुठे जातो?

श्री.चंद्रकांत हंडोरे : आदिवासी विकास विभागाची वेगळी वसतिगृहे आहेत. त्या वसतिगृहांसाठी त्या विभागाकडून खर्च केला जातो. सामाजिक न्याय विभागाची जी वसतिगृहे आहेत त्यापैकी काही वसतिगृहे आदिवासी विभागामध्ये असतील तर त्याठिकाणी मोठया प्रमाणात आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो व त्यांच्यावरील सर्व खर्च सामाजिक न्याय विभागाकडून केला जातो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी मुलांचा भत्ता व कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी याबाबत समाधानकारक उत्तर दिल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. जे परिरक्षण अनुदान दिले जाते त्यामध्ये महागाई निर्देशांकानुसार वाढ झाली पाहिजे. प्रत्यक्षात जे मुलांना दिले जाते ते त्यांच्या ताटापर्यंत पोहोचत नाही. अनेक वसतिगृहामध्ये नातेवाईकांची भरती केली जाते व प्रत्यक्ष काम करणारे दुसरेच असतात. मंत्रीमहोदय याची पाहणी करणार आहेत का? प्रचंड भ्रष्टाचाराने पोळलेल्या या संस्था आहेत. त्यामुळे विद्यार्थी बळी पडतात. मंत्रीमहोदय याची तपासणी करणार आहेत का?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सन्माननीय सदस्यांनी मांडलेले सगळेच मुद्दे रास्त आहेत असे म्हणता येणार नाही. परंतु काहीअंशी त्यामध्ये तथ्य आहे. 2388 वसतिगृहे आहेत, त्यातील काही संस्था निश्चितपणे चांगले काम करणाऱ्या देखील आहेत.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे ........

त्यांचे म्हणणे आहे की,काही ठिकाणी विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारा पैसा अशा संस्थांमार्फत मिळत नाही. यासंदर्भात आम्ही कारवाई करण्याचा प्रयत्न केला असता संबंधितांकडून आमच्याकडे विनंती करण्यात येते की, "जाऊ द्या, सोडून द्या, कशाला ॲक्शन घेता" तरी देखील मी काही वसतिगृहांवर कारवाई केली आणि ज्या ज्या ठिकाणी अडचणी दिसून येतील त्यासंदर्भात आम्हाला देखील सन्माननीय सदस्यांनी माहिती द्यावी, कोणाचीही गय न करता कडक कारवाई करण्यात येईल. कारण गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शासन मदत करते परंतु अशा प्रकारे त्यांच्या टाळुवरील लोणी खाण्याचे काम कोणी करीत असेल तर शासन निश्चितच कारवाई केल्याशिवाय राहणार नाही. तसेच एकूण 2388 वसतिगृहांच्या संदर्भात चौकशी करण्याच्या सूचना महसूल विभागाला सुध्दा करण्यात आल्या होत्या. त्यानुसार त्यांनी चौकशी केली व त्यासंबंधीचा जो अहवाल आम्हाला दिला त्याप्रमाणे काही संस्थांना मी सस्पेंड सुध्दा केले. यानंतरच्या काळात सुध्दा ही वसतिगृहे चांगल्या प्रकारे कशी चालतील यासंबंधीच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून अपेक्षा आहे की, त्या संस्था चांगले काम करतील.

-------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विधानभवनातील सुरक्षा व्यवस्थेबाबत**

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, विधानभवनातील सुरक्षेबाबतचा प्रश्न यापूर्वी अनेक वेळा आलेला आहे. आता देखील मी सुरक्षेच्या संबंधातील मुद्दा आपल्या निदर्शनास आणून देत आहे. तो असा की, काल विधानभवनात पाच दारुडे घुसले, तिसऱ्या मजल्यावर गॅलरीत आले आणि त्यांनी तेथे गोंधळ घातला. वास्तविक येथे विना परवाना कोणालाच सोडले जात नाही परंतु या दारुड्यांना आत प्रवेश मिळाला, त्यांनी गॅलरीत येऊन गोंधळ केला आणि पुन्हा त्यांना सोडूनही देण्यात आले. ते कोण होते आणि कोणामार्फत आले होते, यासंबंधीची माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात सुरक्षेबाबत दक्षता घेण्याच्याही सूचना संबंधितांना देण्यात याव्यात, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आपण मांडलेला मुद्दा गंभीर आहे. मी याबाबतीतील संपूर्ण वस्तुस्थिती मागितलेली आहे. ती माहिती मी सभागृहात आज शक्य झाल्यास देईन अथवा मंगळवार दिनांक 15 एप्रिल, 2008 रोजी निश्चित देईन. विधानभवनातील सुरक्षा कडक आहे असे सांगण्यात येते पण या सभागृहात कोणीही येत असेल, वावरत असेल आणि ते सुरक्षा विभागाच्या लक्षात येत नसेल तर त्यासंबंधीचीही चौकशी करण्यात येईल.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.23 वाजता पुनः भरेल

( 2.53 ते 3.23 मध्यंतर )

-----------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी.** : विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. XXII OF 2008

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2009.)

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि.स.वि.क्र.22-दिनांक 31 मार्च, 2009 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी विधानसभेच्या आमदारांप्रमाणे विधानपरिषदेच्या आमदारांना 2.5 कोटी रुपयांची कामे सूचविता येतील असे भाष्य या ठिकाणी केले होते त्याबाबत नेमके काय झालेले आहे? सभागृहात या संदर्भातील आश्वासन देण्यात आले असले तरी जोपर्यंत शासनाच्या ऑर्डर्स जिल्हाधिका-यांपर्यंत जात नाही तोपर्यंत सभागृहातील निर्णय अंमलात येत नाही. आम्ही यासंदर्भात जिल्हाधिका-यांना पत्र दिले असता त्यांच्याकडून आम्हाला पत्र आले आहे की, "आपल्याला अशा प्रकारची कामे सुचवता येत नाही". माननीय मंत्रीमहोदयांबरोबर जर सख्य असेल तरच रस्त्यांची कामे घेतली जाते अन्यथा काम होत नाही ही बाब मी या निमित्ताने निदर्शनास आणू इच्छितो. तसेच आमदार निधीचे नेमके काय झाले अशा प्रकारच्या मी जे दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यावर माननीय अर्थमत्र्यांनी प्रकाश टाकावा अशी विनंती आहे.

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या मुद्याला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. विधानसभा सदस्यांना स्थानिक विकास निधी एक कोटी रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.. माझी अशी विनंती आहे की, या एक कोटीव्यतिरिक्त त्यांना अडीच कोटी रुपये किंमती पर्यंतची कामे सुचवता येतील असा निर्णय विधानसभेत घेतलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...

ज्यावेळी त्या संदर्भात या सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर. पाटील यांनी आपल्या समक्ष असे सागितले होते की, विधान परिषदेतील सदस्यांनासुध्दा त्यांच्या विभागातील कामे सुचवता येतील आणि अर्थमंत्र्यांकडे त्यांनी यादी द्यावी. अशाप्रकारे जी काही कामे सुचवली असतील त्या कामासाठी लागणारी तरतूद करण्यासाठी आपण माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती करु या आणि पुढच्या पुरवणी मागण्यांमध्ये या कामासाठी तरतूद करुन ही कामे घेण्यात येईल . अशा प्रकारचे निवेदन त्यांनी या सभागृहामध्ये केलेले आहे त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो मुद्दा मांडलेला आहे. त्याला मी समर्थन देतो तसेच माननीय वित्त मंत्र्यांना विनंती करतो की, खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी केलेली जी विनंती मान्य करण्यात आली आहे तशाच प्रकारे विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांना देखील अधिकची कामे घेण्यासाठी सवलत द्यावी व त्याकरता निधी मंजूर करावा

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जी सूचना मांडली आहे तिचे समर्थन करण्याकरिता मी उभा आहे. माझी माननीय वित्त मंत्र्यांना अशी विनंती आहे की, आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून येतो. दोन तीन जिल्हयात आमचे मतदार आहेत. जिल्हा परिषदा आणि नगरपालिकांचे सदस्य आम्हाला निवडून देत असतात. खालच्या सभागृहात आश्वासन किंवा शब्द दिला गेला आहे. सन्माननीय सदस्यांची रस्त्याची किंवा इतर जी काही कामे असतील त्या कामासाठी अडीच कोटी रुपयांची रक्कम बजेटेड करण्यासबंधी किंवा पुरवणी मागण्यामध्ये ती कामे समाविष्ट करण्यांसंबंधी प्रस्ताव सादर करण्याबाबत ज्या काही सूचना दिल्या आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी ती कामे आपल्याकडे सुचवावीत अशा प्रकारेसुध्दा बोलले जाते. म्हणून माझी अशी विनती आहे की विधान सभेत ठरल्याप्रमाणे विधान परिषदेतील सदस्यांची सुध्दा अडीच कोटी रुपयांची कामे घेण्यात यावीत अशी मी सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो .

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, अभी सम्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत ने मंत्री जी से यह अनुरोध किया है कि विधान परिषद के सदस्यों को भी ढाई करोड़ रुपये के काम सजेस्ट करने के लिए अनुमति दी जाए, मैं इसका समर्थन करता हूं. इसी से संबंधित मेरा यह अनुरोध है

...2

श्री सय्यद जामा..

कि कुछ आमदारों का विकास निधि लेप्स हो गया है. यह विकास निधि क्यों लेप्स किया गया है , यह बात सम्माननीय मंत्री जी बताएंगे. 2007 में विधान परिषद में कुछ नए सदस्य आए हैं. मैंने भी 2007 में विधान परिषद सदस्य के रुप में शपथ ग्रहण की है. हमने शासन के पास प्रस्ताव भेजा है कि हमें 2007 का विकास निधि मंजूर किया जाए. क्या मंत्री महोदय हमारे प्रस्ताव को रिवाईज करके मान्यता देंगे ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये अशा प्रकारचे कोणतेही आश्वासन देण्यात आलेले नाही. तसेच अशी कोणतीही विवक्षित रक्कम सन्माननीय आमदारांना दिलेली नाही..

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय मला असे सांगावयाचे आहे की.......

श्री.जयंत पाटील : माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. वेगवेगळया सन्माननीय सदस्यांनी आपआपली कामे घ्यावीत यासाठी अर्थमंत्री म्हणून माझ्याकडे तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून श्री.छगन भुजबळ यांच्याकडे निवेदने दिली असतील तर त्यातील काही निवेदनांचा विचार झाला असेल. राज्यात वेगवेगळया ठिकाणी कामाच्या ज्या गरजा आहेत त्या नुसार अर्थसंकल्प तयार केला जातो. माझ्या मागे सन्माननीय अर्थ राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख बसलेले आहेत. त्यांनासुध्दा सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे निधी मिळालेला नाही. ते मला असे म्हणाले की, " अशा प्रकारचा काही निधी देण्यात आला आहे काय दिला असेल तर तो मला देण्यात यावा." त्यामुळे विशिष्ट पातळीवर ठरवून 2 कोटी, 3 कोटी किंवा 5 कोटी असा काही निधी देण्यात आला आहे असा जो आपला समज झाला आहे तो कृपा करुन काढून टाकावा . ...

नंतर श्री सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 15:35

श्री. जयंत पाटील .....

आपल्या अशा बोलण्यामुळे आणखी गैरसमज होऊ शकतो. मी आपल्याला सांगू इच्छितो की, दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी जी पत्रे दिलेली असतील ती आम्ही खाली पाठविली आहेत आणि त्यांच्या मेरिटनुसार त्यांची कामे अर्थसंकल्पामध्ये घेण्याचा प्रयत्न केला जातो. अर्थसंकल्पात जी कामे दाखविलेली आहेत ती दाखवित असताना ती लोकांच्या गरजेनुसारच दाखविण्यात येतात. आता ज्याअर्थी खालच्या सभागृहामध्ये अमुक एवढी रक्कम देतो वगैरे अशी कोणतीही घोषणा आपण केलेली नाही त्यामुळे या वरच्या सभागृहामध्ये अशी काही घोषणा करण्याचाही प्रश्न उद्‌भवत नाही. सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा आहे की, आपले चांगले संबंध असल्यामुळे जे मंत्री आपली कामे करतात त्यांची नावे आपण मला दिली तर उरलेल्या मंत्र्यांना देखील आपली कामे घेण्यास सुचविता येईल. त्या पलिकडे काही कामे राहिलीच तर ती आपण माझ्याकडे दिल्यास त्याबाबत निश्चित पाठपुरावा करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहाच्या हे रेकॉर्डवर आलेले आहे की, हा विषय येथे निघाला असता या सभागृहाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री असलेले श्री.आर.आर. पाटील यांनी हे कबूल केले आहे आणि त्यावेळी सभापती महोदय, आपण स्वत: पीठासीनावर उपस्थित होता. आपल्यालाही ते आठवत असेल. तेव्हा त्यांच्या आणि आता माननीय अर्थमंत्र्यांच्या सांगण्यामध्ये विरोधाभास होत आहे. तेव्हा नेमके काय आहे ? याचा खुलासा झाल्यास बरे होईल.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, यामध्ये नेमके असे आहे की, मी अर्थसंकल्प मांडलेला आहे आणि त्यावरील विनियोजन विधेयक आता येथे मी आणलेले आहे. याला मंजुरी मिळाल्यानंतर जे गृहीत धरलेले आहे ते मंजूर होईल आणि भविष्यकाळातसाठी काही पाहिजे असल्यास जरूर ते आपण आमच्याकडे दिल्यास त्याचाही विचार करता येईल. मात्र माननीय मंत्र्यांनी येथे यापूर्वी काय सांगितले आहे ते माझ्यापर्यंत आलेले नाही. पण तुमची काही मागणी असल्यास माझ्याकडे ती दिली तर लोकप्रतिनिधींचे काम करणे, त्याद्वारे लोकांच्या गरजा पूर्ण करणे हे आमचे कामच आहे. तेव्हा आपण दिलेली कामे मेरिटनुसार करण्याचा आमचा प्रयत्न राहील. अर्थात आपण दिलेली सगळीच कामे केली जातील असे नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, आमच्या ऐकून घेण्यामध्ये कदाचित चूक झालेली आहे, पण याबाबत येथे सविस्तर चर्चा झालेली आहे ...

..... एक्सएक्स 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी दिलेली नाही, त्यांनी कृपया खाली बसावे. ... आपण सभागृहाच्या शिस्तीचे कृपया पालन करावे. ... मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी सदनातील दोन्ही बाजूच्या सदस्यांची एकच भावना आहे की, ज्या पद्धतीने खालच्या सदनातील सन्माननीय सदस्यांची कामे त्या त्या विभागांकडून प्रॉयॉरिटीने घेण्याचा आपण प्रयत्न करता त्याच पद्धतीची प्रॉयॉरिटी या सदनातील सदस्यांच्या कामांबाबतही आपण द्यावी अशी अपेक्षा आहे. आता आपणही आपल्या भाषणात असे सांगितले आहे की, अशी कामे सदस्यांनी लेखी सुचविली तर जरूर मेरिटप्रमाणे प्रॉयॉरिटी दिली जाऊन ती घेता येतील.

आता मी सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांना सांगू इच्छितो की, मी मघाशी 5-6 सदस्यांना बोलण्यास परवानगी दिली. त्यानंतर मंत्र्यांचे भाषण होते तेही संपले. त्यानंतर आपण उठून बोलणे, परवानगी न घेता बोलणे हे व्यवहाराला धरून होणार नाही म्हणून मी आपल्याला खाली बसविले. आता मी आपल्याला बोलण्यास ...

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीनेच बोलत होतो....

**सभापती** : मी आपल्याला तेव्हा परवानगी दिलेली नव्हती. मात्र परवानगी आहे असे समजून बोलण्याची आपल्याला सवय लागली आहे. त्यामुळेच आपण परवानगी न घेताही बोलायला सुरूवात करता. असो. मी आता आपल्याला एक मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडण्यास परवानगी देतो.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, हा जो विषय आहे त्यावर या सदनामध्ये अगदी साधक-बाधक चर्चा होऊन त्यावर माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी काही सांगितले. त्याबाबत आमचा गैरसमज झाला की, स्थानिक विकास निधीमध्ये वाढ झालेली आहे. परंतु आता जे काही मंत्री महोदयांनी सांगितले त्यावरून असे समजते आहे की, विकास निधीत वाढ झाली नसून आमदारांनी अडीच कोटीची कामे सुचवावयाची आहेत आणि त्या बाबतीत खालच्या सदनातील सदस्यांनी सुचविलेली कामे ज्या पद्धतीने मान्य होतील तीच पद्धत या वरच्या सदनाच्या सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या कामांच्या बाबतीत अवलंबिण्यात येईल असे आश्वासन दिले आहे, त्याबद्दल आपण विचार करावा असे वाटते.

**सभापती** : ठीक आहे.

..... एक्सएक्स 3 ..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : सभापती महोदय, मैने जो मुद्दा उठाया उसका जवाब मिला नही ...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जामा यांना सांगू इच्छितो की, त्यांनी मंत्र्यांकडे जाऊन त्यांना आमदार झाल्यापासून जी रक्कम स्थानिक विकास निधी म्हणून मिळणे आवश्यक होते ती मिळण्याच्या दृष्टीने तसेच मिळाली असल्यास ती खर्च करण्याच्या दृष्टीने विनंती करावी. मंत्री महोदय त्याबाबतीत स्वत: पाहतील आणि आपल्याला तो निधी मान्य करून देतील.

आता मी विधेयकाबाबतची पुढील प्रक्रिया सुरू करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

( यानंतर श्री. सरफरे ....2वाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे.आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही. त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**</u>

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सभागृहापुढे असलेल्या पुढील कामकाजासंबंधी मला आपणास विनंती करावयाची आहे. आता सभागृहाने विनियोजन विधेयक संमत केले आहे. आज या आठवडयाचा शेवटचा दिवस आहे. अनेक माननीय सदस्यांना आपापल्या गावी जावयाचे असल्यामुळे त्यांनी रेल्वेचे आरक्षण केले आहे, आणि त्यांना वेळेवर स्टेशनवर गेले पाहिजे. तेव्हा आता अशासकीय कामकाज न घेता ते नंतर घेण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी देखील मला पत्र दिले आहे. त्यामध्ये त्यांच्या नावावर असलेली आजची अशासकीय विधेयके पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती केली आहे. त्यामुळे आता अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ मांडण्यात येतील. त्यानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाज - विधेयके**

**पृ.शी.**: हिंसाचार व लैंगिक गुन्हयांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक

L.C. BILL NO. III OF 2008

( A BILL TO PROVIDE FOR PROHIBITION OF ADVERTISEMENTS AND HOARDINGS WHICH TEND TO INSTIGATE VIOLENCE OR SEXUAL OFFENCES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 3 महाराष्ट्र राज्यात हिंसाचारास व लैंगिक अपराधांस प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिराती-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, राज्याच्या सर्व शहरांमध्ये आणि विशेषत: महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठ् मोठया जाहिरातींचे फलक लावण्यात येतात. ज्या ठिकाणी हे फलक लावण्यात येतात त्या महानगरपालिका किंवा नगरपालिकेची याकरिता परवानगी घेतली जात नाही. त्यामुळे त्या फलकांवर नियमाप्रमाणे कर आकारला जात नाही. तसेच, त्या जाहिरातीच्या फलकांवर नको त्या लोकांचे दर्शन आपल्याला घ्यावे लागते. तेव्हा या जाहिराती लावण्याबाबत मॉडेल नियम तयार केले पाहिजेत. याकरिता मी हे अशासकीय विधेयक मांडीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 3 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO.VII OF 2008.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, 1888.)**

श्री.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 7 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1988 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, हा विषय असा आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये बहुमताने निवडून आलेल्या उमेदवाराची निवड काही कारणास्तव रद्द झाली आणि त्याबाबतीत 10 दिवसाच्या आत स्मॉल कॉज कोर्टामध्ये आव्हान दिलेले असेल तर मुंबई महानगरपालिकेच्या 1988 च्या कायद्यातील कलम 32 (2) अन्वये दुसऱ्या क्रमांकावरील जास्त मते मिळालेल्या उमेदवाराला महानगरपालिकेच्या कायद्याप्रमाणे उमेदवार म्हणून जाहीर केले जाते. त्यामुळे लोकशाहीमध्ये ज्या उमेदवाराला जनाधार मिळालेला असतो, ज्याला लोकांनी निवडून दिलेले असते त्यांच्यावर मोठा अन्याय होतो आणि ही तरतूद फक्त मुंबई महानगरपालिकेमध्ये आहे. दुसऱ्या कोणत्याही महानगरपालिकेमध्ये ही तरतूद नाही. म्हणून जवळजवळ अर्ध्यापेक्षा जास्त मताने निवडून आलेला उमेदवार म्हणजेच अर्ध्या पेक्षा कमी फरकाने निवडून आलेल्या दुसऱ्या क्रमांकावरील उमेदवाराला पुन्हा ते पद बहाल केले जाते म्हणजे एकप्रकारे लोकशाहीची थट्टा केली जाते. त्यामुळे या कलमामध्ये बदल करुन जर त्याठिकाणी उमेदवार बाद झाला तर तेथे पुन्हा निवडणूक घेण्यात यावी अशी दुरुस्ती करण्याची गरज आहे. म्हणून मी हे अशासकीय विधेयक येथे मांडत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.अनिल परब : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 7 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

. . . .2 झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मला एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, आज याठिकाणी जी चार विधेयके विचारार्थ दाखविण्यात आली आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांचे एक विधेयक आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी विनंती केली. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांना सांगू इच्छितो की, मी त्यांना हे विधेयक पुढील शुक्रवारी मांडण्यासाठी परवानगी देत आहे. त्यानुसार मी सदरहू विधेयक पुढे ढकलत आहे.
तसेच मला सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी त्यांच्या तीन विधेयकाच्या संदर्भात पत्र दिलेले आहे. तेव्हा ज्यावेळी सन्माननीय सदस्य संजय दत्त यांची विधेयके चर्चेसाठी घेतली जातील, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांचेही विधेयक चर्चेसाठी घेतले जाईल.

----

. . . .2 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ KTG/ SBT/ 15:45

## विशेष उल्लेख

पृ. शी. : क्रीडा क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडुंना विशेष पुरस्कार देण्याबाबत शासनाचे असलेले उदासीन धोरण

मु. शी. : क्रीडा क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडुंना विशेष पुरस्कार देण्याबाबत शासनाचे असलेले उदासीन धोरण याबाबत श्री.संजय केळकर वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"क्रीडा क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडुंना राज्य शासन दरवर्षी विशेष पुरस्कार महाराष्ट्राचे आराध्य दैवत "छत्रपती शिवाजी महाराज" जयंती दिनी म्हणजे 19 फेब्रुवारी रोजी देऊन त्यांचा गौरव करण्यात येतो व या पुरस्कारासाठी खेळाडुंची गत तीन वर्षातील कामगिरी विचारात घेतली जाते व त्यानुसार 1) शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार, 2) दादोजी कोंडदेव पुरस्कार (प्रशिक्षकांसाठी), 3) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार आदि अनेक पुरस्कार दिले जातात. परंतु गत दोन वर्षात म्हणजे सन 2006-2007 व 2007-2008 या वर्षात राज्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडुंना पुरस्कार देण्याचे राज्य शासन त्यांच्या उदासीन धोरणामुळे विसरले आहे काय ? त्यामुळे कित्येक पात्र व उदयोन्मुख खेळाडुंची यासंबंधात धोर निराशा झालेली आहे आणि त्यांच्या मनामध्ये एक चिडेची भावना निर्माण झालेली आहे. यासंबंधात शासनाने छत्रपती पुरस्कार त्वरित जाहीर करावेत अशा प्रकारे मी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करीत आहे. धन्यवाद.

----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

**( विशेष उल्लेखाची सूचना )**

**पृ. शी.** : समाज कल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानावर सुरु असलेल्या वसतिगृहामध्ये मुस्लिमांची संख्या निरंक असणे

**मु. शी.** : समाज कल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या अनुदानावर सुरु असलेल्या वसतिगृहामध्ये मुस्लिमांची संख्या निरंक असणे याबाबत श्रीमती फौजिया खान वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्रीमती फौजीया खान यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती फौजीया खान ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"राज्यामध्ये समाज कल्याण विभागातर्फे देण्यात येणाऱ्या अनुदानावर मोठया संख्येने वसतिगृहे चालत असणे, या शिवाय आसनामार्फत सुरु असलेल्या विविध आश्रम शाळा, अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थी विद्यार्थिनिंना शिक्षण घेणे सुलभ व्हावे याकरिता शासन दरवर्षी करोडो रुपये खर्च करीत असणे दुर्बल घटकांसाठी संधी उपलब्ध करुन देण्याचा असलेला स्तुत्य प्रयत्न परंतु या संधीपासून मुस्लिमातील दुर्बल समाजघटक वंचित असणे, माहितीच्या अधिकाराद्वारे प्राप्त झालेली धक्कादायक माहिती, वसतिगृहे आणि आश्रमशाळांमध्ये मुस्लिमांची संख्या निरंक असणे मुस्लिमांमध्येही एससी,एसटी,व्हीजेएनटी जाती असूनही ते या सुविधा आणि लाभांपासून वंचित असल्याचे चिंताजनक चित्र हे चित्र बदलण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता".

सभापती महोदय, राजश्री. शाहू महाराज, व श्री. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कमकुवत घटकातील सर्व जातीतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे निर्माण केली आहे. यात खास मुस्लिम समाजाच्या वसतिगृहांचा देखील समावेश होता. या वसतिगृहातील मुले उपाशी राहू नयेत म्हणून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान..

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नीने प्रसंगी स्वत:चे मंगळसूत्र देखील विकले होते. ज्या महाराष्ट्राने अशा महान नेत्यांना जन्म दिलेला आहे त्या महाराष्ट्रामध्ये आज काय सुरु आहे ?

सभापती महोदय, आज सामाजिक न्याय विभागाच्या अनुदानावर राज्यात वसतिगृहे व आश्रमशाळा चालतात. त्यामध्ये मुस्लिम समाजातील एससी, एसटी व व्हीजेएनटीचा सहभाग किती आहे हे जाणून घेण्यासाठी माहितीच्या अधिकारान्वये माहिती संकलित केली. ती आकडेवारी डोळयात झणझणीत अंजन घालणारी आहे. जवळपास 1 लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ 3 विद्यार्थी मुस्लिम समाजाचे असल्याचे आढळून आले आहे. विशेष म्हणजे प्रत्येक आश्रम शाळेने मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांचे अर्ज आलेले नसल्याने प्रवेश दिला गेलेले नाही असे उत्तर दिले आहे. सापवाला, बंदरवाला, अस्वलवाला या सारख्या समाज घटकांना आत्मभानच आलेले नाही. ते काय अर्ज करणार ? मुस्लिम समाजातील व भटक्या विमुक्तांची स्थिती भयावह असताना हे विद्यार्थी शिक्षणापासून दूर आहेत. या समाजाला शिक्षण देण्याची गरज असताना त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले असताना समाज कल्याण या संकल्पनेलाच तडा गेलेला आहे असे मला वाटते. या भटक्या, विमुक्त जातींना मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर " डॉक्टर आपल्या दारी "ही योजना ज्या पद्धतीने आरोग्य खात्याने राबविली आहे त्याच धर्तीवर शासनाने विशेष अभियान राबवून मुस्लिम व भटक्या विमुक्त मुस्लिमांना गावोगावी शोध घेऊन स्वत:हून वसतिगृहे व आश्रमशाळेमध्ये भरती केली पाहिजे. तयामुळे त्यांना शिक्षण घेणे सुलभ होईल. मुस्लिम भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांना स्वतंत्र आश्रम शाळेत मंजुरी देणे ही काळाची गरज आहे. धन्यवाद.

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. : सिंधुदूर्ग जिल्हयातील संचयनीतील आर्थिक घोटाळयाबाबत.

**मु.शी** : सिंधुदूर्ग जिल्हयातील संचयनीतील आर्थिक घोटाळयाबाबत. श्री. परशुराम उपरकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभा सदस्यांद्वारा नियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे विशेषउल्लेखाची सूचना मांडत आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील संचनी मध्ये अनेक ठेवीदारांनी गुंतवणूक केलेली आहे. या गुंतवणुकीसंबंधी चौकशी केल्यानंतर अनेक अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. त्यांची प्रॉपर्टी शासनाने जप्त केलेली आहे. या अधिकाऱ्यांवर विशेष न्यायालयामध्ये केस सुरु आहे. परंतु ही केस अतिशय धीम्या गतीने सुरु आहे. ही केस जलद गतीने सुरु करुन दोषी लोकांवर कारवाई करुन त्यांची मालमत्ता जप्त केली जाईल काय ? या मालमत्तेचा लिलाव करुन या रकमा ठेवीदारांना देण्याची लवकरात लवकर उपाययोजना करण्यासाठी मी येथे विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..

**पृ.शी.** : तुमसरा ( भंडारा ) येथील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील श्रीमती सुनिता दशरथ बारई या शिक्षिकेस मान्यता देऊनही वेतन अनुदान मंजूर न करणे

**मु.शी** : तुमसरा ( भंडारा ) येथील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील श्रीमती सुनिता दशरथ बारई या शिक्षिकेस मान्यता देऊनही वेतन अनुदान मंजूर न करणे

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू. डायगव्हाणे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. व्ही.यू डायगव्हाणे ( नागपूर विभाग शिक्षक ) : इतर मागासवर्गीय प्रवर्गातील श्रीमती सुनिता दशरथ बारई, शिक्षिका विशाल हायस्कूल, भंडारा यांना शिक्षण विभागाने दि. 13/4/07 च्या आदेशाने दि.1/7/99 पासून सहाय्यक शिक्षिका म्हणून मान्यता प्रदान केली असून वेतन अदा करावे असे आदेश शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) यांनी 30/1/2008 शिक्षण उपसंचालक नागपूर यांना 23/1/2008 रोजी देऊनही मुख्याध्यापकाने अद्यापही वेतन अनुदान मंजूर केले नाही. श्रीमती बारई यांनी थकबाकीसह नियमित वेतन व इतर मागण्यांसाठी दि. 7 एप्रिल 2008 रोजी शिक्षणाधिकारी. जि.प. भंडारा यांच्या कार्यालयासमोर विभागाला 27 मार्च 2008 रोजी नोटीस देऊन आमरण उपोषण केले. नियम 93 च्या निवेदनावर दि. 31 मार्च 2008 रोजी. मा. राज्यमंत्री यांनी महिला शिक्षिकेच्या बाबतीत माहिती घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल असे स्पष्ट उत्तर दिले असताना अद्याप कोणतीच कारवाई झाली नसणे, या शिक्षिकेचे पती क्षयरोगाने ( टीबी ) ग्रस्त असल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची पाळी आली असणे. विदर्भ माध्यमिक शिक्षण संघ, भंडारा चे प्रतिनिधी व नागपूर विभागाचे लोकप्रतिनिधी यांनी उक्त मागणीचे समर्थनार्थ व जिल्हयातील इतर प्रलंबित समस्यांचे निवारणार्थ दि.7/4/08 रोजी शिक्षणाधिकारी,भंडारा यांच्या कार्यालयासमोर निदर्शने केली असून समस्यांचे निवेदन संघटनेनी शासनास दिले आहे. या गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

-----------

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्राथमिक शाळांच्या कामाचा विचार करता व स्वच्छतेची आवश्यकता विचारात घेता प्रत्येक शाळेत किमान एक लिपिक व एक शिपाई पद मंजूर करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : प्राथमिक शाळांच्या कामाचा विचार करता व स्वच्छतेची आवश्यकता विचारात घेता प्रत्येक शाळेत किमान एक लिपिक व एक शिपाई पद मंजूर करण्याची आवश्यकता याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार )** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" राज्यातील प्राथमिक शाळांच्या कामाचा विचार करता व स्वच्छतेची आवश्यकता विचारात घेता विद्यार्थी संख्येचा निकष न लावता प्रत्येक शाळेत किमान एक लिपिक व एक शिपाईपद मंजूर होणेबाबत "

सभापती महोदय, माध्यमिक शाळेमध्ये शिक्षकांबरोबरच शिक्षकेतर कर्मचारी ज्यामध्ये लिपिक आणि चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचा समावेश होतो याबाबतीत कोणत्या तत्वानुसार ही पदे मंजूर करावीत यासंदर्भात शासनाचे आदेश आहेत. माध्यमिक शाळा संहितेमध्ये त्याच्या तरतुदी आहेत. परंतु शासनमान्य अशासकीय प्राथमिक शाळांमध्ये मात्र अशा प्रकारच्या कोणत्याही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता देण्यात येत नाही.

सभापती महोदय, या प्राथमिक शाळांमध्ये मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा 1947 आणि नियमावली 1949 मधील तरतुदी लागू होतात. या तरतुदीनुसार 500 पेक्षा अधिक विद्यार्थीसंख्या असणाऱ्या शाळांना 1 लिपिक आणि 1 शिपाई पद अनुज्ञेय आहे. ही तरतूद जवळजवळ 60

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्री. रामनाथ मोते .....

वर्षापूर्वीची आहे. आजपर्यंत त्यामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. गेल्या 60 वर्षामध्ये प्राथमिक शाळांमध्ये सुध्दा फार मोठ्या प्रमाणावर बदल झालेले आहेत आणि या बदलानुसार शाळेची कार्यालयीन जबाबदारी वाढली असून विविध प्रकारची कार्यालयीन कामे शाळेतील शिक्षकांना व मुख्याध्यापकांना करावी लागतात. वर्गखोल्यांची स्वच्छता होण्यासाठी आणि अन्य कामांसाठी शिपाई पद आवश्यक आहे तेही मिळत नाही. ही सर्व कामे एकतर मुख्याध्यापकांना आणि शिक्षकांना किंवा या दोघांनाही विद्यार्थ्यांकडून करुन घ्यावी लागतात. ही बाब अत्यंत दयनीय आहे. म्हणून मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, राज्यातील सर्व खाजगी प्राथमिक शाळांमध्ये, किमान ज्या उच्च प्राथमिक शाळा आहेत, ज्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग आहेत, त्या शाळांमध्ये विद्यार्थीसंख्येचा निकष न लावता किंवा विद्यार्थी संख्येचा विचार न करता किमान 1 शिपाई आणि 1 लिपिक मंजूर करावा तरच खऱ्या अर्थाने तेथील मुख्याध्यापकांची आणि शिक्षकांनी या कामातून सुटका होऊ शकेल. म्हणून या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो की, या प्राथमिक शाळांमध्ये किमान 1 लिपिक आणि 1 शिपाई देण्याच्या संदर्भात कार्यवाही करावी आणि आपला जो काही निर्णय असेल तो मला कळविण्यात यावा अशी विनंती करतो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

**पृ. शी.** : मौजे पिंप्री सय्यद (ता.जि.नाशिक) येथील शिवारातील सुमारे 180 हेक्टर शेतजमीन प्रस्तावित रिजनल प्लॅनमध्ये शैक्षणिक कारणाकरिता दाखविल्यामुळे शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी

**मु. शी.** : मौजे पिंप्री सय्यद (ता.जि.नाशिक) येथील शिवारातील सुमारे 180 हेक्टर शेतजमीन प्रस्तावित रिजनल प्लॅनमध्ये शैक्षणिक कारणासाठी दाखविल्यामुळे शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी याबाबत श्री. प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनवणे ( नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"मौजे पिंप्री सय्यद ( ता.जि.नाशिक) येथील शिवारातील सुमारे 180 हेक्टर शेतजमिनीचे क्षेत्र प्रस्तावित रिजनल प्लॅनमध्ये शैक्षणिक कारणाकरिता दाखवण्यात आलेले असून शासन धोरणानुसार पीकपाणी घेत असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी राखीव क्षेत्र म्हणून दाखवण्यात येऊ नयेत असे सर्वसाधारण धोरण ठरलेले असूनही विषयांकित प्रकरणी ज्या गटांचा समावेश केलेला आहे ते गटमालक हे अल्पभूधारक गरीब शेतकरी असल्याने त्यांचा चरितार्थ पूर्णपणे शेतीवर अवलंबून असणे, त्यामुळे सदरचे क्षेत्र त्यांचेकडून हिसकावून घेतल्यास त्यांचेवर उपासमारीची वेळ येणार असल्याने सदर गावातील ज्या शासकीय जमिनी तसेच पडीत जमिनी आहेत त्या जमिनी शैक्षणिक क्षेत्रासाठी राखून ठेवणे शक्य आहे. सदर जमिनी शासनाने ताब्यात घेण्यास तेथील नागरिकांची व पंचायतीची काहीही हरकत नसल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी शैक्षणिक झोनिंगमध्ये न

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रतापराव सोनवणे .....

ठेवता शेती झोनमध्येच ठेवावी ही या परिसरातील तमाम शेतकरीवर्गाची मागणी असणे, जनता आंदोलनाचे पवित्र्यात असून ग्रामपंचायतीने सुध्दा विरोध करणे, त्यामुळे सदरचा प्रस्ताव बदलून शासकीय व पडीत जमिनीवर शैक्षणिक झोनिंग ठेवण्याकरिता मी विशेष उल्लेखाव्दारे सूचना मांडत आहे."

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक जिल्ह्यातील पिंप्री सय्यद या गावातील ग्रामस्थांवर होऊ घातलेल्या अन्यायाचा विषय सभागृहासमोर मांडत आहे. नाशिक जिल्हा (ग्रामीण) च्या रिजनल प्लॅनचा प्रस्ताव नाशिक आयुक्त कार्यालय स्तरावर तयार होऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेला आहे. शासनाने अजून हा प्रस्ताव मंजूर केलेला नाही.

सभापती महोदय, सदर रिजनल प्लॅन तयार करताना असे धोरण ठरले होते की, ज्या शेतीच्या जमिनी असतील, ज्या जमिनी वहितीखाली असतील, ज्या जमिनीत पीकपाणी घेतले जात असेल व ज्या जमिनीच्या उत्पन्नावर शेतकऱ्यांचा चरितार्थ अवलंबून असेल अशा कुठल्याही शेतजमिनींच्या बाबतीत जो मूळचा शेती झोन असेल तोच ठेवायचा, त्यात बदल करावयाचा नाही.

सभापती महोदय, मी या गोष्टीचा साक्षीदार आहे की, नाशिक महसूल आयुक्त स्तरावर हा नियोजित रिजनल प्लॅन तयार करताना पारदर्शक कार्यपध्दती राबविली गेली आहे व दिलेले निकष, ठरलेले धोरण पाळण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न पण झालेला आहे. मात्र काही प्रकरणामध्ये वेळेवर माहिती अथवा तक्रार न मिळाल्यामुळे अपवादात्मक त्रुटी राहून गेल्या आहेत.

सभापती महोदय, मौजे पिंप्री सय्यद, तालुका व जिल्हा नाशिक येथील 180 हेक्टर शेतजमिनीचे क्षेत्र प्रस्तावित रिजनल प्लॅनमध्ये शैक्षणिक कारणाकरिता दाखविण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात हे सर्व क्षेत्र बागायती असून वहितीखाली आहे आणि तेथे पीकपाणी घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांचा चरितार्थ या जमीन कसण्यावर अवलंबून आहे. त्यातच यामधील काही शेतकरी अल्पभूधारक सुध्दा आहेत. अशा जमिनीवर झोन बदलण्याच्या प्रस्तावामुळे पिंप्री सय्यद शिवारातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आणि त्याचा उद्रेक झाला. तेथील ग्रामस्थांनी दि. 5 मार्च, 2008 रोजी आग्रा महामार्गावर रस्तारोको आंदोलन पुकारले आहे.

...5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्री. प्रतापराव सोनवणे .....

सभापती महोदय, सदर पिंप्री सय्यद येथील सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन त्यांच्याच गावातील पर्यायी 180 हेक्टर जमीन, जी शासकीय आहे, निमशासकीय आहे, खाजगी आहे, खडकाळ आहे, जेथे पीकपाणी येऊ शकत नाही,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापराव सोनावणे....

जी पडीक आहे अशा पर्यायी जमिनीचा प्रस्ताव माननीय आयुक्तांकडे दिलेला आहे. वहिवाटीयोग्य व बागायती जमिनीवर शैक्षणिक झोन न टाकता गावक-यांनी पडीक व खडकाळ पर्यायी जमीन सुचविली आहे, अशा जमिनीचा प्रस्ताव दिलेला आहे. तो योग्य आहे. तेव्हा गावक-यांची तक्रार लक्षात घेऊन त्यांच्यावर होऊ शकणारा अन्याय लक्षात घेऊन संघर्ष होणार नाही व शांततामय मार्गाने सहजपणे प्रश्न सुटू शकतो हे लक्षात घेऊन शासनाने गावक-यांनी सुचविलेल्या पर्यायी जमिनीवर शैक्षणिक झोन टाकावा व तेथे पूर्वी होता तसा शेती झोन ठेवावा अशी मागणी पिंपरी सैयद येथील ग्रामस्थांची आहे, त्यांची ही मागणी व भावना मी या विशेष उल्लेख सूचनेद्वारे शासनाकडे पोहोचवित आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : राज्यातील पोलीस पाटील यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या

**मु. शी.** : राज्यातील पोलीस पाटील यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशन यांनी वारंवार महाराष्ट्र शासनाला आणि राज्याच्या माननीय गृहमंत्र्यांना निवेदने दिलेली आहेत. पोलीस पाटील यांची शिर्डी येथे परिषद झाली होती त्या परिषदेला माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित होते. पोलीस पाटील यांनी शासनाला अनेक वेळा निवेदने दिली आहेत, चर्चा केलेल्या आहेत. परंतु अद्याप पोलीस पाटलांच्या मागण्यांवर निर्णय झालेला नाही, शासन निर्णयाप्रत आलेले नाही. त्यांच्या अत्यंत महत्वाच्या मागण्या आहेत. फार वर्षापूर्वी त्यांचे मानधन ठरविले आहे. पोलीस पाटील यांना किमान दरमहा 5 हजार रुपये मानधन मिळणे गरजेचे आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांना मानधन देणे आवश्यक आहे. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांची वाईट अवस्था होते. महात्मा गांधी तंटा मुक्त मोहिम यशस्वी होण्यासाठी पोलीस पाटील गाव पातळीवर चांगल्या पध्दतीने काम करतात. अशा या पोलीस पाटील यांना कार्यालय नाही. टेबल नाही, खूर्ची नाही, टेलिफोन नाही. तेथे कसल्याही प्रकारच्या सुविधा नाहीत. त्यामुळे त्यांना चांगल्या प्रकारच्या सुखसोयीनी युक्त कार्यालय देणे आवश्यक आहे. कारण तंटा मुक्तीचे काम या राज्यात पोलीस पाटील यांच्या माध्यमातून होत आहे. तसेच तहसील व जिल्हयाच्या ठिकाणी त्यांना बैठकांना जावे लागते त्यासाठी त्यांना टी.ए.,डी.ए.या गोष्टी मिळणे गरजेचे आहे. अशा अनेक मागण्या पोलीस पाटील यांच्या आहेत. त्या मागण्यांसंबंधी शासनाने विचार करावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे. या मागण्यांसंबंधी त्यांच्या संघटनेने दिनांक 26.3.2008 रोजी माननीय गृहमंत्र्यांना पत्र दिलेले आहे. त्यावर त्यांनी बैठक आयोजित करावी असा शेरा लिहिलेला आहे. ही बैठक हे अधिवेशन संपण्यापूर्वी आयोजित करुन या मागण्यांवर निर्णय व्हावा अशी विनंती करते. धन्यवाद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : भिवंडीतील कालेर येथील गोदामाला लागलेली आग

**मु. शी.** : भिवंडीतील कालेर येथील गोदामाला लागलेली आग याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, भिवंडीत कालेर येथे गोदामाला भयानक आग लागून दुर्दैवी घटना घडली आहे. मुंबईतील मज्जिद बंदर येथे सुध्दा आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. भिवंडीत आणि मुंबईतील भायखळा, धारावी व अन्य ठिकाणी अशा घटना घडलेल्या आहेत. भिवंडी येथील गोदामाला आग लागण्याची ही पहिली वेळ नाही. सभापती महोदय, गोदामांमध्ये कोणते साहित्य ठेवावे याबाबत असलेल्या अटी व नियमांचे पालन केले जात नाही. अतिशय ज्वालाग्रही पदार्थ व रसायने ठेवण्यात येतात. परिणामी न फुटलेल्या बॉम्बप्रमाणे तेथे परिस्थिती असते. हे रसायने व ज्वालाग्रही पदार्थ कधी फुटतील याची शाश्वती नसते. या परिसरातील लोकांच्या जीविताला कायम धोका असतो. पुरेशी अग्निशमन यंत्रणा असल्याशिवाय गोदामांना व रेस्टॉरंटना परवाना देऊ नये असे धोरण आहे. परंतु त्याची कडक अंमलबजावणी होत नाही. निष्पाप जनतेच्या जीविताचे संरक्षण होईल यादृष्टीने शासनाने कार्यवाही करावी, या घटना टाळण्याच्या दृष्टीने कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे. धन्यवाद.

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन मंगळवार, दिनांक 15 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 11 वाजता पुन: भरेल. सकाळी 11 ते 1 वाजेपर्यंत अर्ध्या तासाच्या चर्चेकरिता विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 4 वाजून 4 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 15 एप्रिल, 2008 रोजीच्या सकाळी 11 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही